# ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३

**धनगरगाथा**
**रामचंद्र वरक**



## स्मृतिप्रकाशाच्या उजेडात

''धनगर हा निसर्गाला देव मनणारा समाज आहे. निसर्गाच्या सान्निध्यात त्याचे जीवन संपन्न होत असते. पशुपालन हा त्याचा व्यवसाय असल्याने डोंगरदऱ्यात त्याला राहावे लागते. त्यामुळे निसर्गातील पंचमहाभुतांवर तो श्रद्धा ठेवतो. निसर्गाची पूजा करतो. धरतीला आई आणि आभाळाला बाप मानतो. त्याची जडणघडण या सर्व निसर्गाच्या सान्निध्यात होते असते.''

आपण आणि आपला समाज याविषयी तपशीलाने खोलात जाऊन शोध घेण्याची आवश्यकता ही अनेक कारणाने सिद्ध होते. यात केवळ समाजाचा अहंकार असण्याचे कारण नाही कारण आहे ते त्याचा इतिहास समजून घेण्याचा. 'समाज' या शब्दाविषयी अनेक प्रवाद आहेत, असू शकतात, पुढेही राहतील. परंतु या प्रत्येक समाजाचा मोठा समूह आपल्या रचनेत मानाचे स्थान अधिग्रहित करून अढळ स्थानी स्थापित झालेला आहे आणि तो कुणालाही नाकारता येणार नाही. ललित लेखनातून प्रतिबिंबित होणारे समाजदर्शन आणि केवळ समाजदर्शन म्हणून केलेले शोधलेखन यात नक्कीच मोठा फरक आहे. असे शोधलेखन नक्कीच अभ्यासकांना उपयुक्त ठरते. असाच एक शोध रामचंद्र वरक यांनी घेतला आहे, 'धनगरगाथा' या नावाच्या पुस्तकातून.

रामचंद्र वरक हे लोककला आणि लोक साहित्याचे अभ्यासक आहेत. आयएनटी सारख्या संस्थेशी जोडलेले आहेत. 'लोकमानसातील पारंपरिक कोळीगीते', 'जलदर-वृंदा' ही त्यांची लोकसाहित्याला वाहिलेली पुस्तके यापूर्वी प्रकाशित झालेली आहेत. 'कोकणातील दशावतारी नाट्य' या माहितीपटाची संकल्पना, लेखन व दिग्दर्शन त्यांचेच आहे. त्याच प्रवासातील पुढचा टप्पा म्हणजे हे 'धनगरगाथा' पुस्तक.

धनगर हा समाज आपल्याला परिचित आहे. शेळ्या-मेंढ्या दिसल्या की आपल्याला त्याची पटकन ओळख पटते. सतत उन्हातान्हात राबणारा, काटक, कणखर, रानावनाशी जोडलेला, आपले जग आणि आपले काम यात रमलेला! रामचंद्र वरक त्याची ओळख या पुस्तकातून करून देतात. खोलवर जाऊन त्यांनी केलेला अभ्यास आणि या समाजाची मुळे शोधून काढण्याचा केलेला प्रयत्न खरोखरच स्तुत्य म्हणायला हवा. सातवाहन, होयसाळ, मौर्य, पल्लव, राष्ट्रकुट, यादव, कदंब, कुरूब, भोज, शिलाहार, आदि राजघराणी ही भारतवर्षाची शिल्पकार आहेत. त्यांचा स्वतःचा अमिट असा ठसा आजही कायम आहे. ही क्षत्रिय राजवंशीय परंपरा होळकर घराण्यापर्यंत येते. ही सगळी राजवंशांची घराणी धनगर होती. यातून चातुर्वर्णांचा विचार करता धनगर कुठल्या वर्गात मोडतात हा प्रश्न आपोआपच निकालात निघतो. लेखकाने धनगर हे क्षत्रिय आहेत असे अनुमान सप्रमाण मांडले आहे. राज्यभिषेकाचा अधिकार फक्त क्षत्रियांनाच असतो आणि वरील सर्व राज्यकर्ते हे राज्यभिषिक्त राज्यकर्ते होते. संसदभवनाच्या प्रवेशद्वाराशी जो पुतळा बसविण्यात आलेला आहे, तो चंद्रगुप्त मौर्य यांचा आहे, यातच सारे आले.

लेखकाने धनगर या शब्दाची उत्पत्ती दिलेली आहे. धन हा शब्द 'धेनू' या शब्दापासून आलेला, म्हणजे गोधनापासून हा 'धन अधिक आगर' असे याचे रूप आहे. सणवार, चालीरिती, रुढी, परंपरा प्रत्येक समाजाच्या वेगवेगळ्या असतात. प्रसंगानुरूप त्यांचे साजरेपण अनुसरले जाते. त्याचाही शोध लेखकाने घेतलेला आहे. एकच गोत्र आणि कूळ असेल तर विवाहसंबंध होत नाहीत. विवाहप्रसंगी मंगलाष्टके म्हटली जातात, ती खास धनगर शैलीतील 'गणू' असतात. या विधींसाठी समाजातील काही घराण्यांना पौरोहित्याचा मान दिलेला असतो. ते लग्न लावतात. पुनर्विवाहाची प्रथा आहे, त्याला 'पाट लावणे' असे नाव आहे. या पुनर्विवाह केलेल्या दांपत्याला देवपूजेचा किंवा कन्यादानाचा अधिकार नसतो. लग्नापूर्वी मृत्यू झाल्यास त्या मृतदेहाचे दहन करण्यापूर्वी रूईच्या झाडाशी लग्न लावले जाते. समाजाच्या स्वतःच्या काही प्रथा, परंपरा आहेत. कुणी त्यांचा भंग केला तर त्यासाठी निर्णय घेणारी धनगर जातपंचायत आहे. वादविवाद सोडविणे, दंड आकारणे किंवा बहिष्कार घालणे, अशा शिक्षा देण्याचा अधिकार या पंचायतीला आहे.

धनगर समाजात असलेल्या पोटजातींचा तपशील यात दिलेला आहे. पूर्वी त्यांची बारा गोत्रे होती आणि त्यांची विभागणी साडेतीन पोटजातीत केलेली होती. अहिर, हटकर, आणि म्हसकर या पूर्ण जाती तर खुटेकर ही अर्धी जात. अलीकडे त्यांची संख्या तेवीस झाली आहे. ती नावे इथे दिलेली आहेत. खंडोबा हे कुलदैवत तर प्रत्येकाच्या कुलदेवता वेगवेगळ्या आहेत. गाणी, खेळ, कलाप्रकार, चालीरिती, पेहराव, आहार, भाषा, अशा सर्व घटकांचा वेध या पुस्तकातून घेतलेला दिसून येतो.

लेखकाने अतिशय तपशीलवार असा शोध घेतलेला आहे. हा शोध भाषेच्या पांडित्यात अडकलेला नाही. सहज सोपी आणि ओघवती. आपण काही वेगळे मांडतो आहोत, असा अभिनिवेश नाही. विषयाची मांडणी सुटसुटीत आणि समर्पक अशी केलेली आहे. आवश्यक तेथे फोटो दिलेले आहेत. गाणी दिलेली आहेत. महत्त्वाचे म्हणजे व्यवहारात असलेल्या बोली भाषेचे अर्थासह परिशिष्ट सोबत जोडले आहे तसेच वेगवेगळ्या राज्यात धनगर समाजाला ज्या नावांनी ओळखले जाते, त्यांचा तक्ताही जोडलेला आहे. कुणाही समाजसंशोधकाला पथदर्शक ठरावे, असे हे लेखन आहे.

पुस्तकाचे मुखपृष्ठ सजवले आहे सतीश भावसार यांनी. पेहराव, देहयष्टी आणि व्यवसाय यांच्या सोबत भंडाऱ्याचा हळदी रंग, यांचा सुंदर संगम झालेला आहे.

**मूल्य १५० रुपये  सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान

**स्वल्पविराम**

**ज्ञानराज पाटकर**




**फिरूनी नवा जन्मेन मी!**

अन्न, वस्त्र आणि निवारा या व्यतिरिक्त माणसाला जगण्यासाठी आणखी कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते, असा प्रश्न विचारला तर? तर अशा आवश्यकतांची भलीमोठी यादी समोर येईल. ती प्रत्येकाची आवड, गरज आणि स्तरानुसार भिन्न देखील असू शकेल. अर्थात यात वावगे असण्याचे कारणही असू नये परंतु या यादीत या दोन आवश्यकतांची नावे असतील का, सुदृढ शरीर आणि सुदृढ मन? सर्वकाही सुजलाम सुफलाम आहे, कुबेर हात जोडून उभा आहे, उणीव मात्र आहे ती सुदृढ शरीर आणि सुदृढ मनाची, चालेल? कोडी घालण्यासाठी हा प्रश्न विचारीत नाही. या सुदृढतेच्या व्याख्येला अपवाद ठरण्याची शक्यता ज्यांच्यावर ओढवते, त्यांच्या नजरेतून या प्रश्नाकडे पाहिले तर त्याचे महत्त्व आपोआप लक्षात यायला वेळ लागणार नाही. 'स्वल्पविराम' नावाचे हे पुस्तक या प्रश्नाकडे आपले लक्ष वेधून घेते.

ज्ञानराज पाटकर हे आयआयटी इंजिनिअर, कलावंत. नाटक, मालिकांतून अभिनय केलेले, लेखक असलेले, असे एक उमदे व्यक्तिमत्त्व! सर्वकाही मनासारखे जगणे सुरू असताना एका आजाराच्या विळख्यात सापडतात, त्याचे नाव किडनीदोष. या एका आजाराने जगण्याच्या व्याख्या कशा बदलतात, याचे अनुभव म्हणजे हे पुस्तक. किडनीदोष निर्माण झाल्यानंतर पाटकर या आजाराला कसे सामोरे जातात, त्यावर कशी मात करतात, याचे वर्णन म्हणजे पुस्तक. परंतु तेवढेच सांगण्यासाठी त्यांनी हा लेखनप्रपंच केलेला आहे, असे मात्र नक्कीच नाही. ही गोष्ट खरी आहे, आपले अनुभव इतरांना सांगितले तर आपल्या दुःखाची तीव्रता कमी होते. मन हलके होते. परंतु पाटकरांचा हेतू तेवढा संकुचित नाही. दुःख हलके करण्याचा आहे, पण तो स्वतःचे नाही, इतरांचे. स्वतः जे अनुभवले ते इतरांच्या वाट्याला येऊ नये, अथवा आलेच तरी त्याची तीव्रता सौम्य असावी, ही त्यामागची तळमळ आहे. स्वतःच्या दुःखाकडे त्यांनी आजारी माणसाच्या नजरेने पाहिलेले नाही. आठवड्यातून तीन-तीन वेळा डायलेसिस, सूज आलेल्या पायांतून पाझरत राहणारे पाणी, पाण्याचा संचय अंगात झाल्याने वाढलेले वजन, तरीही पाटकर स्वतः कार चालवत उपचारासाठी दवाखान्यात येतात. डॉक्टरांशी हसतखेळत गप्पागोष्टी करतात. वातावरण प्रसन्न ठेवतात. इतकेच नव्हेतर उपचारानंतरचे आयुष्य पुन्हा नव्याने पूर्वीप्रमाणे त्याच उत्साहाने सुरू ठेवतात. या सगळ्या प्रवासात कुठेही हारल्याचा ओरखडा मनावर नाही, ना मनाचा तोल ढळलेला. जगण्याला आपल्या पावलावर पाऊल ठेवायला लावणारे खंबीर मन पाटकरांकडे आहे, तेही हसतमुखाने, हेच यातून दिसून येते.

पाटकर किडनी ट्रान्सप्लांट या विषयी अनुभव कथन करतात, तसा या प्रक्रियेतील कायदेशीर, वैद्यकीय बाबींवरही प्रकाश टाकतात. ऑपरेशन करण्याइतक्याच महत्त्वाच्या या बाबी आहेत. त्या पूर्ण केल्या तरच ऑपरेशन थिएटरच्या टेबलापर्यंतचा प्रवास करता येतो. याच्या जोडीला किडनीची कार्ये, किडनीविकारांना कसे दूर ठेवता येईल, या विकारांची कारणे, घ्यावयाची काळजी, असे किडनीमाहात्म्यही त्यांनी सांगितले आहे. या काळात पत्नी शुभदा, बहीण गौरी, गौरीच्या सासरकडील मंडळी, मुलगी ऋचा, मुलगा रसेश यांच्याविषयी तर तपशील आहेच परंतु या काळात देवदूतासारखी धावून आलेली आणखीही काही मंडळी आहेत, ती जगण्याला खांब देण्याचे काम करतात. त्यांच्या देण्याच्या गुणधर्माविषयी लिहिताना पाटकर म्हणतात, 'माझ्या आजारपणात मी ह्या मानवधर्माचा प्रत्यय वारंवार घेतला!'

किडनीविषयी जनजागृती करण्याचे काम पाटकर करतात. त्यांच्यातला कलावंत केवळ स्वतःच्या अंगी असलेल्या कलाप्रेमाची मशागत स्वतः साठी करीत नाही, तिचा उपयोग या आजारग्रस्तांना जागरूक करण्याचे, आधार देण्याचे काम करतो. 'नर्मदा किडनी फाऊंडेशन'शी ते स्वतःला जोडून घेतात. 'नवजीवन' नावाचे पुस्तक लिहितात. 'जीवनदान' पथनाट्याचे प्रयोग करतात. 'जिते है शानसे' हे नाटक सादर करतात.

आत्मकथन म्हटले की त्यात येणाऱ्या तपशिलांची साखळी किती लांब असेल याला मर्यादा नसते परंतु पाटकरांनी स्वतःला एका विशिष्ट अशा मर्यादेत ठेवलेले आहे, रंगमंचावर सादर करावयाच्या कलाकृतीसारखे. कुठेही पाल्हाळ वा फापटपसारा नाही. नेमकेपण जपण्याचा हा स्तुत्य प्रयत्न म्हणावा लागेल. त्यांची ओघवती शैली तर मोहात पडावी अशी आहे, प्रसन्न. तिला विनोदाची झालर आहे. प्रकरणांना लेखांसारखे स्वरूप दिलेले असून समर्पक अशी त्यांनी शीर्षके दिलेली आहेत. प्रत्येक लेख आटोपशीर, म्हणजे अवघा तीन-चार पानांचा. सगळ्यांत लक्षात राहणारी गोष्ट म्हणजे लेखांचा शेवट. कवितेच्या ओळींनी वा गझलेल्या शेराने शेवट केलेला आहे. लेख संपला तरी त्या ओळी मनात तशाच रुंजी घालीत राहतात. आपली किडनी एकदातरी तपासून पाहण्याची आवश्यकता आहे, असे पुस्तक वाचल्यानंतर प्रत्येकाला जाणवेल आणि तसे झालेतर या पुस्तकाचा हेतू साध्य झाला असे म्हणता येईल.

या पुस्तकाचे मुखपृष्ठ अनिल दाभाडे यांनी सजवलेले आहे. 'किडनी शाबूत तर आनंदी जगणे, तेव्हा तिची काळजी घ्या,' हा संदेश हे मुखपृष्ठ देते.

**मूल्य १२५ रुपये सवलतीत ७५ रुपये**

# ग्रंथपान



**कथा विविधा**
**ज्योती अळवणी**



### इंद्रधनू कथांचे

ज्योती अळवणी यांचा हा पहिलाच कथासंग्रह, 'कथाविविधा'. मोजून सात कथा असलेला. रहस्य, गूढ, सामाजिक, राजकीय, विज्ञान, भावनिक आणि पौराणिक, अशा सात वेगवेगळ्या छटा असलेल्या कथा. इंद्रधनूत सात रंग असावेत तशा. पहिल्याच प्रयत्नात असे विविधांगी लेखन करणाऱ्या लेखिका स्वतःच्या कथेविषयी मनोगतात व्यक्त होतात त्या अशा, 'मला माझ्या स्त्रीजन्माचा आदरयुक्त अभिमान आहे. शिवाय अनेक वर्षे भारतीय स्त्रीशक्तीचं काम केल्याने या अभिमानाला विचारांची बैठक मिळाली आहे. त्यामुळे माझ्या कथांमधील मध्यवर्ती व्यक्तिमत्त्व स्त्रीचंच असतं; हे तुम्हाला माझ्या कथा वाचताना नक्कीच जाणवेल.'

अळवणी यांनी मनोगतात स्पष्ट केल्याप्रमाणे कथा वाचताना त्यांचे वेगळेपण जाणवतेच. शिवाय स्त्री ही प्रत्येक कथेत मध्यवर्ती व्यक्तिरेखा असल्याचेही दिसून येते. त्यांची पहिलीच कथा 'रेडवाईन' प्रेमाची उत्कट तितकीच निर्मळ पातळी कशी असू शकते, याचे चित्रण करते. प्रेम आणि वाईन यांच्यातले साम्य व्यक्त करताना त्या लिहितात, 'रेड वाईनमध्ये एकूणच एलिगन्स आहे, नाजूकपणा आहे,वाईन घेताना ती कधी संपूच नये असं सारखं वाटत असतं. तसंच आपल्या नात्याचं... भेटलो की तो संपूच नये असं वाटत. रेड वाईन म्हटलं की एक शांत संध्याकाळ...मावळतीचा सूर्य किंवा एखादी पौर्णिमेची रात्र आठवते. समोर अथांग समुद्र... जो आपल्या दोघांनाही आवडतो.... रेड वाईनचा लाल रंग; तू असलीस की सगळं गुलाबी होतं नं. हा गुलाबी रंग पण त्या लाल रंगात मुरला आहे. अजून एक,रेडवाईनची चव बराच वेळ रेंगाळते ...तुझ्या आठवणीसारखी...सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे रेडवाईनला एस्पायरी डेट नसते... उलट ती जितकी जुनी, तेवढीच तिची चव मुरते...तिचा एलिगन्स वाढतो आणि रंग गहिरा होत जातो.'

'लालीची गोष्ट' ही कथा म्हणजे चिखल आणि कमळाची कथा. चिखलात उमलेले कमळ म्हणजे लाली. या चिखलात ती कशी शोभून दिसेल, याचे मनोरथ रचणारी कोठेवाली अम्मा, याच चिखलात स्वतः रूतलेली असूनही आता हे आयुष्य लालीच्या नशिबी नको म्हणून तिला बाहेर ढकलणारी लालीची माई आणि यासाठी मदत करणारा तिचा भाऊ रंगा, जो स्वतः हेच आयुष्य स्वीकारतो परंतु लालीला मदत करतो. लालीलाही सापडलेली वाट सरळ नाहीच. तरीही... अनेक व्यक्तिरेखांना स्वतंत्र असा आयाम देणारी ही कथा शेवटपर्यंत श्वास रोखायला लावते.

'राज की समाज...कारण! (?)' ही कथा ग्रामीण राजकारणावर प्रकाश टाकते. गावोगावी राजकारणाची बेटे असतात आणि ती एकाच कुटुंबाच्या मालकीची असतात. या बेटांना वेढा देणारा गाव हा जणू तालावर नाचणारा, प्रसंगी डोळे झाकून अन्याय पाहत राहणारा समाज असतो. परंतु हे बेट उद्‌ध्वस्त करणारा शिलेदार कधीतरी येतोच. तशी आण्णा आणि त्याचा मुलगा उदय यांच्या या बेटाला उद्‌ध्वस्त करण्यासाठी सुगंधा येते आणि कृष्णासारखी मागे राहून शैलाला निवडणुकीच्या मैदानात पुढे उभी करते.

'श्य...जपून बोल!' ही वेगळी कथा आहे. एका वाड्यात रात्री मुक्कामासाठी आलेल्या मैथिली, अवनी, मंजू, अभी, वर्धा, राजन यांना जे अद्‌भूत अनुभव येतात, त्याची ही गूढकथा आहे हे यातल्या रामूकाकाचे वाक्य कायम लक्षात राहावे असे आहे, 'बरं...जसं तुम्ही म्हणाल तसं जी.'

'डोळे' ही कथा मोठा पट घेऊन आलेली दीर्घकथा होय. राजघराण्याची पार्श्वभूमी असलेली ही कथा अनेक आवर्तातून साकार होत जाते. 'खिडकी पलीकडील जग' या कथेने गौरीचे जग उभे केलेले आहे. ही सुद्धा दीर्घ कथा म्हणावी अशी कथा आहे. 'तो व ती' ही महाभारताचे सार सोबत घेऊन आलेली कथा. यात कृष्ण आहे तोच्या रूपात आणि तिच्या रूपात आहेत त्याची प्रेयस राधा, बहीण सुभद्रा, सखी द्रौपदी, आत्या कुंती, आणि आठ पत्नी... रुक्मिणी, सत्यभामा, जांबवंती, मित्रविंदा, सत्या, लक्ष्मणा, भद्रा, कालिंदी. या प्रत्येकीच्या मनातले भावभावनांचे कल्लोळ आणि मध्यभागी असलेला कृष्ण, असे या कथेचे स्वरूप आहे. एक वेगळा प्रयोग म्हणजे ही कथा. तिच्यातून लेखिकेच्या दृष्टिकोनाची आणि चिंतनाची कल्पना येते.

लेखिका सामाजिक कार्याशी निगडित आहेत. समाज आणि सामाजिक भान यांच्याशी त्यांचे जोडले जाणे त्यामुळे स्वाभाविक म्हणावे लागेल. परंतु हे भान जेव्हा साहित्यातून व्यक्त होते तेव्हा त्याचे स्वरूप वैश्विक होते. लेखिकेच्या या लेखनातून त्याची जाणीव अधिक दृढपणे व्यक्त झालेली दिसून येते. कथांची पातळी आणि स्तर भिन्नभिन्न आहेत, तशा त्यातल्या व्यक्तिरेखा आपापल्या स्तरावर तितक्याच ठळकपणे चित्रित झालेल्या आहेत. व्यक्तिरेखांच्या भोवती असलेला समाज, वास्तव, भाषा, यातून एक संपूर्ण आकृतिबंध तयार होतो, त्यासाठी आवश्यक असते ती योग्य ते भान राखण्याची. या कथा त्याचा प्रत्यय देतात आणि त्यातूनच लेखिकेच्या पुढील वाटचालीची ग्वाही देतात. मधु मंगेश कर्णिक यांची सुंदर प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे.

पुस्तकाची निर्मिती आणि मांडणी यात वेगळेपण दिसून येते. तसेच मुखपृष्ठ. अनंत खासबारदार यांनी रंगांचा सुंदर आविष्कार पेश केला आहे, शीर्षकाच्या अंतरंगाशी एकरूप होणारा. सुंदर!

**मूल्य २५० रुपये  सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

**सुंदर माझी शाळा**

**गणेश घुले**




**डोळ्यांत अंजन घालणारी सुंदर शाळा!**

निसर्गाने थेट जर पैसे दिले असते
पैशाचेही वाटप मग समान झाले असते

बालसाहित्याविषयी असणारी आस्था सर्वत्र दिसून येते. मात्र तसे सकस आणि दाणेदार साहित्य तुलनेत फारसे आढळत नाही, असा एक सूर अलीकडच्या काळात ऐकू येतो आहे. त्याला काही अपवाद नाहीत असे नाही परंतु त्यांचे प्रमाण पुरेसे नाही, ही सत्यता नाकारता येत नाही. या सत्यतेला अपवाद करणारा बालकवितासंग्रह उपलब्ध झाला आहे, त्याचे नाव आहे, ‘सुंदर माझी शाळा.’ ‘सुंदर’ या शब्दाला न्याय देणारा असा हा संग्रह आहे हे निर्विवाद! या संग्रहातील कवितांचा मनोरंजन हा स्थायिभाव आहेच, परंतु त्या केवळ मनोरंजन करीत नाहीत, जाता जाता त्या डोळ्यांत अंजन घालायला देखील विसरत नाहीत.

गणेश घुले यांचा हा बालकवितासंग्रह आहे. यातील सर्व कविता या गेय स्वरूपात आहेत. चालीवर सहज म्हणता येतील अशा. ही चाल अंगभूत आहे. आपण वाचत असताना ती लय आपली सोबत करीत राहते. लय, नाद यांचा गोडवा सांभाळायचा तर शब्दांची मांडणी देखील त्याच लयीत आणि क्रमाने व्हावी लागते. त्यासाठी अनेकदा जुळवाजुळवी करून तो हेतू साध्य करण्याचा प्रयत्न अनेकजण करतात. त्यामुळे त्या कविता चैतन्य निर्माण करण्याऐवजी निर्जीव तरी होतात किंवा त्यांच्यातला कृत्रिमपणा ओरखडे ओढताना जाणवतो. गणेश घुले यांच्या या संग्रहातील कवितांमध्ये अशी ओढाताण नाही, कृत्रिमपणा नाही. अगदी सहज उमलत जाण्याऱ्या कळीसारख्या या कविता उमललेल्या दिसतात. त्यांच्यातले नितळपण फुलांच्या पाकळ्यांसारखे रेशमी आहे. शब्द सहजसुंदरतेच्या रसात न्हाऊन आलेली आणि प्रसन्न मुद्रेने कवितेच्या परडीत बागडत असलेली ताजी टवटवीत फुलेच आहेत, असा आनंदमय भास होत राहतो.

शाळा हे या संग्रहाच्या बागडण्याचे स्थान आहे. शाळेशी जोडलेल्या अनेक कविता यात आहेत. पूर्वी असलेली शाळा, शिक्षक, फळा, अभ्यास आता राहिलेले नाहीत. सगळे स्वरूपच बदलून गेले आहे. या दोन्ही काळाशी अनुरूप अशा कविता यात आहेत. कवी या बदलत जाणाऱ्या, अवतीभवती घडणाऱ्या घटनांकडे सजगपणे पाहत असल्याचे दिसून येते. आता विद्यार्थीच सरांना विनवणी करीत आहे, ‘सर, असे शिकवा की, टीव्हीसारखी पुस्तकाची गोडी लागली पाहिजे.’ परीक्षा आणि सुट्टी या परस्पर विरोधी असलेल्या शाळा नावाच्या नाण्याच्या दोन बाजू. परंतु घरात देखील अशाच दोन बाजू असतात, आई आणि बाबा यांच्या रूपात. बाबा म्हणजे परीक्षा आणि आई म्हणजे सुट्टी. सरांची छडी ही जशी शिक्षा देणारी असते, तशी संस्कार करणारीही असते. शाळेच्या चौकटीत हुशार आणि ‘ढ’ यांची विभागणी आलीच. परंतु ‘ढ’लाही काही म्हणायचे असते. वास्तविक कुणीही ‘ढ’ नसतोच. त्याला भाबडा प्रश्न पडतो, इतर हुशार मुलांसारखेच सर्वकाही करायची तयारी आहे, तरी सगळे आपल्याला ‘ढ’ का म्हणतात? कवितांमधून झाडी, वेली, पाऊस असे कितीतरी विषय मुलांच्या भोवती फेर धरतात. इथे पाऊस येतो रिमझिम पावलांनी. त्याचे येणे किती सुखद असते पाना –फुलांसाठी, झाडांसाठी, सगळ्यांसाठी. यातली नाजूक सर कवीच्या कल्पनेतून येते, ‘रिमझिम पाऊस आला छान, हिरव्या पिकांची भागली तहान.’ सुंदर कल्पना तर अनेक आहेत. त्यातलच एक, ‘पानाआडून लाजणारी कळी म्हणजे झाडाच्या गालावरची खळी.’

या संग्रहातल्या काही कविता तर अंतर्मुख होऊन स्वतःकडे पाहायला लावतात. महिलांना मंदिरात ‘प्रवेशबंदी’ हा विषय सध्या खूपच संवेदनशील झालेला आहे. या विषयाकडे एक बाळ आपल्या आईला समोर उभे राहून विचारते, ‘आई, तुलाच जर मंदिरात जाता येत नसेल, तर मग देव त्याच्या आईला कसा भेटत असेल?’ भ्रूणहत्या हा आणखी एक विषय. ही हत्या करू नको म्हणून मुलगीच आईला वचन देते, ‘आई जन्मा आधी माझा प्राण घेऊ नको, तुला अभिमान वाटेल अशी मी वागेन. फक्त मला आई कशी दिसते ती पाहू दे.’ झाडही असेच सांगते मुलाच्या स्वप्नात येऊन, माझी कत्तल करू नका. झाडाविषयीच्या कवितांमधून रंजन होते तसा संदेशही येतो, झाडे लावा! मोबाईलने घरातला संवाद कुलुपबंद केला आहे. तेव्हा बाळच म्हणते, ‘पुढच्या जन्मी मला मोबाईलचा जन्म दे, म्हणजे आईबाबाच्या हातात सतत राहीन.’ पाणी हा प्रश्न आहेच. मामाच्या गावाचे वर्णन करताना आताचे चित्र वेगळे आहे. मामाची सुगरण बायको आता पाण्यासाठी वणवण करते आहे.

या संग्रहातील सर्वच कविता सुंदर आहेत. मनाची पकड घेणाऱ्या आहेत. आशयाचा आवाका मोठा ठेवलेल्या, तरी उद्देशाच्या कुंपणाच्या आवारात मनसोक्त खेळायला सोडलेल्या. एक बांधीव अनुभव देणाऱ्या. कुठल्याही वयातील वाचकाला त्यांच्या प्रेमात पडायला लावणाऱ्या. प्रत्येक घरातील पालकांनी स्वतः आनंद घेत आपल्या पाल्यांना म्हणून दाखवाव्यात अशा या कविता आहेत. काही शब्द सहजपणे कवीच्या मातीतून येतात. ताण, हिव, खोपा, सुधरत, बारका, सासवणी, पेंडवलता. हे शब्द त्या कवितेचा मृद्‌गंध सर्वदूर पसरविण्यात मदत करतात. तीच गोष्ट चित्रांची. प्रत्येक कवितेला चित्रांची जोड देऊन सजवलेले आहे. ही चित्रे देखील रंगीत, ठसठशीत, बोलकी, प्रसन्न दरवळ पसरवणारी, कवितेसारखीच परिपूर्ण. मांडणी देखील उत्तमप्रकारे केलेली आहे. चित्रे, मांडणी आणि मुखपृष्ठ यांचे किमयागार आहेत पुंडलिक वझे. या पुस्तकाची निर्मिती अतिशय सुबकपणे करण्यात ‘ग्रंथाली’ने कुठलीही कसर ठेवलेली नाही.

**मूल्य १०० रुपये सवलतीत ६० रुपये**

# ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

**शिवाची शक्ती**

**शिल्पा जितेंद्र खेर**




**हिमालयाएवढी तिची सावली**

राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती आणि अभिमान यांनी भारावून टाकलेले, त्या नात्यात गुंफलेले दोन शब्द आहेत सैनिक, सैन्यदल. आपली अस्मिता, आपली जाज्ज्वल्यता पूर्णपणाने जोपासण्याची प्रेरक शक्ती म्हणजे हे दोन शब्द! सैनिक आणि सैनिक दल हा प्रत्येकाचा श्वास आहे, त्यांच्याविषयी वाटणारा आदर, प्रेम, जिव्हाळा आपल्या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग म्हणता येईल, इतके आपण त्यांच्याशी समरस झालेलो आहोत. तीच समरसता शिल्पा खेर त्यांच्या लेखनातून व्यक्त करीत आलेल्या आहेत. आतापर्यंतचे त्यांचे बहुतेक लेखन हे सैनिक, राष्ट्रप्रेम यांच्या धाग्यांनी गुंफलेले दिसून येते. 'सत्यमेव जयते', 'सोल्जर इन मी भाग १ व भाग २', 'जस्ट बिलिव्ह', 'ए मेरे वतन के लोगो' या त्यांच्या कादंबऱ्या यापूर्वी प्रकाशित झालेल्या आहेत. त्याच मालिकेतील पुढचा भाग म्हणजे 'शिवाची शक्ती' ही कादंबरी होय. 'भाग्यश्री फाउंडेशन' या संस्थेच्या संस्थापक असून तिच्यामार्फत करीत असलेल्या विविध शैक्षणिक व सामाजिक कार्यातूनही त्यांचे समाजप्रेम आणि राष्ट्रप्रेम दिसून येते.

सैनिकी कामगिरीवर गेलेला वीर सुखरूप परत येईल की, तिरंग्यात लपेटून येईल याविषयी अनिश्चितता. कधी कुठला प्रसंग येईल, याचा नेम नाही. परंतु या अनिश्चिततेला कायम आपल्या मुठीत ठेवणारा, धैर्याने पुढे जाणारा, मातृभूमीसाठी सर्वस्व अर्पण करायला तयार असणारा सैनिक वेगळाच असतो. साहस, धाडस, पराक्रम, शौर्य यांनी परिपूर्ण असलेल्या सैनिकाची आणखी एक शक्ती वेगळी असते, तिचे नाव सौभाग्यवती, अर्धांगिनी, पत्नी, सहधर्मचारिणी, पार्वती! पतीच्या सोबत असू दे अथवा मागे असू दे, ती मनाने, कर्तव्याने कायम त्याच्या हृदयात असते. ती त्याची पत्नी असते, त्याच्या मुलांची माता असते, कुटुंबाची देखपाल करणारी कुटुंबप्रमुख असते आणि तरीही ती सैनिकाची शक्ती असते. या स्त्रीला आपल्या पतीविषयी काय वाटते, भवितव्याबाबत काय वाटते, त्याच्याशी विवाह करण्यात चूक झाली का, खरे सुख मिळते का, की पश्चाताप होतो, असे अनेक प्रश्न सैनिकाच्या पत्नीसोबत येतात. या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम लेखिकेने केलेले आहे. सैनिकी पेशा वेगळा आहे, वातावरण सतत दडपणाचे आहे, अशा माणसाशी नाते जोडलेल्या स्त्रीचे प्रश्न पूर्णपणे वेगळे आहेत. ते समजून घेण्याचा, त्यामागील मानसिकता समजून घेण्याचा हा प्रयत्न आहे. त्यासाठी लेखिकेने सर्वोच्च पदे भूषविलेल्या, १९६२,१९७१ च्या युद्धात सहभागी झालेल्या, कारगील युद्धाचा अनुभव घेतलेल्या आणि युरी हल्ल्याच्या जखमा अंगावर बाळगलेल्या वीरांच्या, त्यांच्या धिरोदात्त पत्नींच्या मुलाखती घेतलल्या आहेत. यात दोघांचाही सहभाग असला तरी प्रामुख्याने दुसऱ्या शक्तीवर सगळे लक्ष केंद्रित केलेले आहे. मेजर जनरल अशोक तासकर यांच्या पत्नी सुहासिनी तासकर, मेजर जनरल शशिकांत पित्रे यांच्या पत्नी मीरा पित्रे,मेजर सुभाष गावंड यांच्या पत्नी उर्मिला गावंड, विंग कमांडर निखिला पामकर, उरीच्या अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेले मेजर कुणाल गोसावी यांच्या पत्नी उमा गोसावी, कॅप्टन मैत्रेयी दांडेकर, कॅप्टन सुरेश वंजारी यांच्या पत्नी सुनीता वंजारी, गोळीबारात कायमचे पॅराप्लेजिक झालेले मीन बहादूर थांपा यांच्या पत्नी गीता थापा, अशा तेरा मुलाखती आहेत. शौर्य, प्रेम, आपसातले नाते, विश्वास, या गोष्टी यातून कळतात.

अनेक शंका, प्रश्न, गैरसमजुती यांना इथे छेद मिळतो. सैनिक सगळ्यांना आपले कुटुंब मानतात. सैनिकाच्या पत्नीचा सन्मान सैन्यात सर्वोच्चस्थानी असतो. कुठल्याही सैनिकी समारंभात पत्नीसोबत असणे आवश्यक असते. प्रथम भोजन करण्याचा मान महिलांना दिला जातो. कितीही मोठा अधिकारी असू दे, सैनिकाची पत्नी कार्यालयात आली तर तो उठून उभा राहतो. सैनिकाप्रमाणेच त्याच्या वैयाक्तिक दप्तरात पत्नीविषयी देखील नोंद केली जाते. मागे राहिलेल्या पत्नीचा सर्वतोपरी सन्मान राखला जातो. तसा पतीइतकेच राष्ट्रप्रेम, शिस्त, गणवेश यावर या स्त्रिया प्रेम करतात. साहस, कणखरपणा त्यांच्या अंगी आपोआपच येतो. आपला निर्णय चुकला असे त्यांना कधीही वाटत नाही. उलट अभिमान वाटतो. पतीच्या सुखात त्याही तितक्याच सुखी असतात. महत्त्वाचे म्हणजे तिची शक्ती ही त्याची शक्ती असते, म्हणूनच तो खऱ्या अर्थाने त्याचे कर्तव्य बजावण्यास पुढे होतो, हे सारे कळते ते हे पुस्तक वाचल्यानंतर.

शिल्पा खेर यांच्या लेखनात असलेला ओघवता प्रवाहीपणा वाचकाला खिळवून ठेवणारा आहे. कथानक फुलवत नेण्याची हातोटी त्यांना साधलेली आहे. विषयाशी नाते जुळले की लेखनाशीही नाते जुळते, याचा अनुभव हे लेखन देते. विषयाचा सखोलपणा, त्याच्याशी असलेले भावनिक आणि कर्तव्याचे पैलू, यांचा शोध घेण्याचा प्रयत्न तर स्तुत्यच म्हणायला हवा. पाण्याच्या पृष्ठभागावर दिसणाऱ्या हिमनगापेक्षा पाण्याच्या आत असलेला हिमनग मोठा असतो, त्याचा तळ शोधण्याची जिज्ञासा आणि प्रयत्न या लेखनातून कल्पकतेने आणि तितक्याच परिश्रमपूर्वक केलेला दिसून येतो.

'रणांगणात किंवा चकमकीच्या वेळी शत्रूचा सामना करताना आपल्या शरीराच्या बाजूने बंदुकीची गोळी सपकन् जाते तेव्हा स्वतःची लायकी क्षणात कळून येते. मग मी कोणीतरी श्रेष्ठ आहे किंवा मी कुणीच नाही, असे विचार मनात येत नाहीत.' 'जर तुम्हाला किंगसाईज आयुष्य जगायचं असेल, आयुष्याचा आनंद घ्यायचा असेल , ॲडव्हेंचर तुम्हाला आवडत असेल, तर फौजीशी लग्न नक्की करा.' यासारखी वाक्ये बरेच काही शिकवून जातात.

या लेखनामागची प्रेरणा आणि ध्यास या विषयी लेखिकेने मनोगतात मन मोकळे केलेले आहे. सुप्रसिद्ध लेखिका प्रतिभा रानडे यांची सुंदर अशी प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. हळवा आणि कणखर या दोन तटांचा सुंदर संगम काळजापर्यंत पाझरत जावा, असे मनोरम मुखपृष्ठ चित्रकार सतीश भावसार यांनी सजवले आहे.

**मूल्य ३५० रुपये सवलतीत २५० रुपये**

# ग्रंथपान

**मोराची बायको**
**किरण येले**




**रंग पिसाऱ्याचे**

हा आहे सात कथांचा इंद्रधनुषी कथासंग्रह; प्रेमाचा, भावनांचा, नात्यांचा, जगण्यांचा, संवेदनांचा, फसगतीचा आणि खूप काही असूनही त्यापलीकडच्या विचारांचा. हा संग्रह घेऊन आले आहेत किरण येले. 'बाईच्या कविता' या काव्य संग्रहाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केलेले कवी. नाट्य चळवळीतले कलाकार आणि 'प्लॅटफार्म नं. ९'चे नाटककार. 'लक्ष्य', 'शुभंकरोती' सारख्या टीव्ही मालिकांचे लेखक. त्यांच्या या ओळखीच्या नावाखाली अधोरेखिताची ठसठशीत रेष ओढणारा संग्रह म्हणजे 'मोराची बायको'.

'मोराची बायको' हे शीर्षक याच नावाच्या कथेवरून घेतलेले आहे. कुतूहल निर्माण करणारे हे शीर्षक केवळ संग्रहाची उत्कंठा वाढवत नाही, तर प्रत्येक कथा त्याचा प्रत्यय देते. कथा वाचून झाल्यावर उत्कंठा शमते खरी, परंतु वेगळीच हूरहूर, पोकळी निर्माण होते, नजरेसमोर मनातल्या आंदोलनांचे मोठी आवर्तने भिरभिरू लागतात, पोकळीतल्या खळाळाचे उंचावरून झेपावणारे प्रपातासारखे आवाज वेढून टाकतात. कल्पना आणि वास्तव यांच्या पातळ्या नेहमीच वेगवेगळ्या असतात, प्रत्येक घटकागणिक त्या बदलत जातात. भास –आभास, जळ –मृगजळाचा हा खेळ म्हटला जातो. त्या खेळाला एका पातळीवर आणणे कठीणच किंवा अपवादात्मक. त्यासाठी लेखकाजवळ केवळ प्रतिभा असून चालत नाही, त्या प्रतिभेला बळ देणाऱ्या प्रातिभ सामर्थ्याची जोड असावी लागते. किरण येले यांच्याकडे हे सामर्थ्य आहे. 'तू मला शोधत येशील तेव्हा सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळतील' आणि ' मनातलं चित्र बाहेर शोधू नये आणि दिसलं तरी जुळवून पाहू नये.' ही दोन वाक्ये आहेत. त्याचं उदाहरण एखाद्या पर्वताची दोन शिखरे असावीत अशी. ज्यांची कधीच भेट होत नाही तशी ती त्या पर्वतापासून दूरही करता येत नाहीत. या सूत्रावर आधारलेली 'मोराची बायको' ही कथा उभी आहे. प्रत्येकाच्या मनात त्याच्या स्वप्नाचे रंगीत पीस असते. या पिसावरून त्या पक्षाचा शोध घेणारे मन प्रत्येकाजवळ असते. पण त्याच्या शोधाच्या ध्यासाचा प्रवास प्रत्येकालाच झेपतो असे नव्हे. त्यात यशापशाचे, ऊनसावलीचे अनेक खाचखळगे असू शकतात. किरण येले या कथेत 'ती'चा हा प्रवास रेखाटतात तेव्हा मन थक्क होते.

या संग्रहातील प्रत्येक कथा ही खणखणीत नाणे आहे. स्वतंत्र अवकाश असलेले. स्वतःचा पूर्ण परीघ असलेले. 'साईन आऊट' या कथेत केंद्रस्थानी आहे आदित्य. त्याच्याभोवतीचा परीघ म्हटला तर त्याचे ऑफीस, रस्ता आणि घर. या परिघात इतर पात्रे आहेत मृदुला, यम्ना, स्वाती, प्रतिभा, जयंती, चंद्रमाला, शेजारच्या शर्माकाकू आणि जो. ही सगळे पात्रे त्यांच्याभोवती आहेत ती त्यांच्या जगण्याच्या दृष्टिकोनातून कॅलिडोस्कोपच्या मिती दाखवणारी. एकात एक मिसळलेली, जशी घोड्यांच्या चित्रात कुणाचे पाय कोणते हे ओळखता येऊ नये अशी. ही कथा वाचत असताना आपण रंगमचांवरचे एक नाटक अनुभवत आहोत, असे वाटत राहते. नात्याच्या आवर्तात 'साईनइन' झालेला नायक एकटा साईनआऊट नाही, कथा वाचून झाल्यावर आपणही साईनइनच्या वेदना अंगभर झेलत गरगरत राहतो, 'आऊट' झाल्यासारखे.

राजन आणि तनयच्या दरम्यानच्या व्यासात टोललंबकासारखी सापडलेल्या रजनीची कथा म्हणजे 'अवशेष'. ओढ ही मनाची असते की शरीराची? मनाला आवर घातला तो योग्य की अयोग्य? ती शोध घेतेय स्वतःचा, स्वतःच्या वागण्याचा आणि त्याचवेळी तिच्यासमोर असलेल्या व्यासाच्या टोकांवरील दोन ध्रुवांचा. 'कोपऱ्यातलं टेबल' या कथेतला सरोळकर म्हणजे आगीच्या धगीत होरपळलेल्या झाडाच्या सावलीतले रोपटे. त्याची सावली झाडासोबत करपून जाते, सोबत त्याचे जगणे करपून गेल्यासारखे होते. त्याला दिसत राहते ती सतत सर्वत्र धग, त्यालाच होरपळून टाकणारी. तिच्यापासून दूर पळू पाहतो. वेगळ्या वातावरणात जगणाऱ्या माणसांची मानसिकता वातावरणाशी कशी निगडित राहते, याचे यथार्थ असे वर्णन ही कथा करते. 'ती आणि ती' या कथेत समाज,संस्कार, वय यांच्या वळणात सापडलेल्या तिला कळत नाही, इतरांचे वागणे आणि आपल्या मनात येणारे विचार हे संवादी असतात की विसंवादी? वयाच्या चाळिशीतही सुंदर असूनसुद्धा वरुण आपल्याला का सोडून गेला? दोन जणांशी संबंध असणाऱ्या सईशी त्याने संबंध जोडले. का?

'अमिबा आणि स्टील ग्लास', 'मांदळकरबाई' या कथाही तितक्याच उत्तम आहेत. या सर्व कथांची संवादी शैली काव्यासारखी मनाचा ठाव घेत जाते. कथांना दिलेली शीर्षके मैलाच्या दगडासारखी अचूक आणि नेमकी असल्याची साक्ष देतात.

किरण येले यांच्या कथा या दृश्यमितींचा प्रत्यय देतात. प्रतिमांच्या बेटांशी बांधून ठेवतात. विचारांची आवर्तने मानसशास्त्राच्या विविध सूत्रांच्या पातळींची ओळख करून देतात. उत्कट अनुभवांची संयमीत अनुभूती देतात. अवतीभवतीच्या निरीक्षणांचे परिवर्तन विचारदर्शनातून घडवतात. स्त्री–पुरुष यांच्या जगण्याच्या संदर्भांना त्यांच्या नजरेतून वाचकांपर्यंत पोहोचवतात. एखाद्या विषयाकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनतून किती खोलवर जाऊन पाहता येते, याची जाणीव करून देतात. एक चांगला कथासंग्रह वाचल्याचे भरभरून समाधान देतात. वाचकाच्या मनावर कायम कोरला जाईल असा हा कथासंग्रह आहे, मोराच्या बहुरंगी आकर्षक पिसासारखा. नवीन कथालेखकांनी अभ्यासाचा संदर्भ म्हणून या कथासंग्रहाकडे पाहायला हवे.

मनाचे विविध कप्पे म्हणजे एक निबिड अरण्य. त्यात आशेचा, अपेक्षेचा, भासाचा, आनंदाचा एक सुंदर मनोहारी पिसाऱ्याचा मोर नाचत असतो. तेच नेमके मुखपृष्ठावर हळुवारपणे अलगद उतरवले आहे कल्पक चित्रकार सतीश भावसार यांनी.

**मूल्य १८० रुपये सवलतीत ११० रुपये**



# ग्रंथपान

**माध्यमरंग**
**रविराज गंधे**



**दूरचे जवळून होणारे दर्शन**

'अहो! इतक्या थोड्या वेळात पुस्तकांच्या सर्व वैशिष्ट्यांसह सुंदर अन् नेमका परिचय तुम्ही कसा करता? पूर्वी तुम्ही कुठल्या मासिकात वा दैनिकात संपादक म्हणून काम करीत होता का?' राजहंस प्रकाशनाचे दिलीप माजगावकर यांनी हा प्रश्न रविराज गंधे यांना विचारला होता. या प्रश्नाला दोन कारणे होती. एक कौतुक आणि दुसरे कामातले नेटकेपण. 'अमृतवेल' हा साहित्य विषयक कार्यक्रम त्यावेळी दूरदर्शनवर चांगलाच लोकप्रिय होता. स्वतः रविराज गंधे तो सादर करीत. लेखक, त्याची साहित्यकृती आणि इतर बाजारात आलेली पुस्तके यांचा परिचय, असे त्याचे स्वरूप होते. विविध वृत्तपत्रांतून सुंदर असे सदर लेखन केलेले आहे. विविध महाविद्यालयात व्याख्याता म्हणून काम केलेले आहे. दूरदर्शनवर तीस वर्षाहून अधिक काळ कार्यक्रम निर्माता, संवाद लेखक, संवादक, अशी भरीव कामगिरी पार पाडलेली आहे. त्यांच्या या भरीव कामगिरीचा अनेक सन्मानांनी त्यांचा गौरव केलेला आहे.

भारतात प्रथम दूरदर्शन सुरू झाले तो दिवस होता १५ सप्टेंबर १९५९. आजमितीस सर्व वाहिन्यांसह ही संख्या झाली ८५७. भारतातील पहिल्या दूरदर्शन केंद्रावरील पहिला कार्यक्रम पु.लंनी तयार केलेला प्रसारित झाला होता. दूरदर्शनचा स्वतःचा एक सुवर्णकाळ होता. मराठी बातम्यांचा खात्रीशीरपणा तर आजही टिकून आहे. बातम्या देणारे निवेदक हे प्रेक्षकांच्या गळ्यातले ताईत होते. रामायण –महाभारताच्या प्रक्षेपणाच्यावेळी रविवारी रस्ते ओस पडत. या संगळ्यांचे रविराज साक्षीदार आहेत.

दूरदर्शन हे दृश्य आणि श्राव्य असे संवादाचे माध्यम आहे. मनोरंजनाबरोबरच उद्‌बोधन करणे, माहितीसाक्षर करणे हा त्याचा उद्देश आहे, जो सकारात्मकेतेशी जोडलेला आहे. त्याचा वापर स्थळकाळानुसार, विषयानुसार परिस्थितीचे गांभीर्य ओळखून करायचा असतो. काय दाखवायचे त्यापेक्षा काय दाखवणे अनिष्ट आहे, याचे भान राखायचे असते. साधा विषय मेकअपचा. तो सर्व ठिकाणी सारखाच करायचा नसतो, त्यालाही औचित्याचे भान असावे लागते. कार्यक्रमाचे स्थळ, विषय, भावभवना यानुसार तो करावा लागतो. त्यामुळे तिथे काम करणाऱ्याकडे स्वतःचे कौशल्य आणि प्रभुत्व असणे आवश्यक बाब ठरते. मुलाखत घ्यायची असेल तरी, तिची तयारी करावी लागते. ती कशी, याचे जगजीतसिह, नाना पळशीकर यांच्या मुलाखतीचे तपशील देत त्यांनी स्पष्ट केले आहे. दूरचित्रवाणी – दृश्यकला– साहित्यमूल्य या प्रकरणात त्यांनी अनेक नामवंत साहित्यिकांच्या साहित्यावर सादर झालेल्या कार्यक्रमांचे स्मरण करून दिलेले आहे. 'तमस', 'हमलोग', 'यात्रा', ' भारत एक खोज' या सारख्या गाजलेल्या मालिका, यांच्या बरोबरच मराठीत जयवंत दळवी, यांची 'आव्हान', 'ना.धों. ताम्हणकरांचा 'गोट्या', चि.वि. जोशींचा 'चिमणराव गुंड्याभाऊ', गो.नी. दोंडेकराची 'पडघवली' अशा अनेक उत्तम साहित्यकृतींवर आधारलेल्या गाजलेल्या मालिकांचे संदर्भ दिले आहेत. 'शरदाचं चांदणं', 'प्रतिभा आणि प्रतिमा'च्या आठवणी ताज्या केल्या आहेत. त्यात साहित्यावर आधारित कार्यक्रमांना कसे प्राधान्य असते, हे यातून दिसून येते. परंतु त्याचपेळी साहित्याचा आणि वाचनसंस्कृतीचा प्रसारही त्यातून साधण्याचा स्तुत्य प्रयत्न होता, हे अधोरेखित होते.

रविराज गंधे यांची वाणी जितकी मृदू आणि रसाळ आहे, तितकीच त्यांची लेखणी. वाचत असताना जणू ते आपल्याशी समोर बसून संवाद करीत आहेत असे वाटत राहते, दूरदर्शनवरील कार्यक्रमाप्रमाणे. स्टुडिओ ते आऊटडोअर; कॅमेरा, रेकार्डिंग ते सुंदर असा सुसंवाद यांचे त्यांना आलेले अनुभव, त्यांनी केलेली आतापर्यंतची मुशाफिरी, ही एका युगाची साक्ष आहे. ती अदभुत आहे तशी तितकीच रम्य आहे. एका ओळखीच्या परंतु अनोळखी अंतरंगाची ही सफर आहे. हातात हात घालून फेरफटका मारावा, तशी त्यांनी या विश्वाची ओळख सोप्या पद्धतीने करून दिलेली आहे. एक चांगला निवेदक, संवादक, मार्गदर्शक एक चांगला लेखकही असू शकतो, त्याचा गोड अनुभव हे पुस्तक देते. या माध्यमावरील संदर्भांची ओळख करून देते. त्यांच्यासोबत कुणी कुणी सहकारी म्हणून काम केले, त्यांच्याविषयी देखील स्नेहभावाने लिहिले आहे.

माध्यमातील माणूस ही संकल्पना अतिशय रम्य आणि तितकीच भूरळ घालणारी. तिचा पाठलाग करणाऱ्यांची संख्या मोठी, तितकीच दमछाक करणारी. काहींना यश येते, नाही असे नाही. परंतु त्यांची संख्या बोटावर मोजण्याइतपतही भरत नाही. याची कारणे अनेक असू शकतात, त्यापैकी एक आहे मार्गदर्शन. कुठल्याही स्पर्धेत यश मिळवायचे तर मार्गदर्शनाला (गाईड) पर्याय नसतो. 'माध्यमरंग' हे पुस्तक म्हणजे एकप्रकारचे गाईड म्हणता येईल, संदर्भासहित अनुभवांनी समृद्ध असलेले. ते मार्गदर्शकाची उणीव नक्की भरून काढील. या पुस्तकातील लेखकाचे अनुभव हे या क्षेत्रात येऊ पाहणाऱ्यांसाठी उपयुक्त ठरतीलच तसे या माध्यमाविषयी कुतूहल असणाऱ्यांनाही अंतरंगात डोकावल्याचे समाधान देईल, असा विश्वास वाटतो.

पुस्तकाची मांडणी करताना मुद्दाम विषयवार अशी प्रकरणे दिली आहेत. सोबत फोटो आहेत. मात्र यात लेखकाची अलिप्तताही लक्षात यावी अशी आहे. माध्यम एके माध्यम, इतकाच विषय मर्यादित ठेवलेला आहे, त्यात स्वतःच्या चरित्राचे अंश, वा स्वतःचे मोठेपण दाखवण्याचा कुठेही प्रयत्न केलेला नाही. त्यामुळे पुस्तकाचे शीर्षक खऱ्या अर्थाने सार्थ ठरते.

सतीश भावसार यांनी या पुस्तकाचे मुखपृष्ठ सजवले आहे. माध्यमांचे जे विविध पर्याय आज उपलब्ध झालेले आहेत आणि ज्यांनी संपूर्ण समाजमनावर गारूड केल्यासारखा प्रभाव टाकलेला आहे, त्याचे दर्शन मुखपृष्ठावर होते.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**कॅनव्हास**

**डॉ. स्मिता दातार**




**कथारंग**

'कॅनव्हास' हा डॉ. स्मिता दातार यांचा नवा लघुकथासंग्रह ग्रंथालीने प्रकाशित केला आहे. यात एकूण सोळा कथा आहेत. कथासंग्रह वाचताना प्रत्येक कथेचे वेगळेपण लक्षात येते. 'एक निर्णय असाही' या कथेतील ओंकार आणि गार्गी. सुशिक्षित, सुस्थितीत असलेले जोडपे. परंतु वंशवेल रूजवण्यात अपयशी. तसे अनेक पर्याय समोर असतात, तरीही ते वेगळा पर्याय स्वीकारतात. 'आपलंच मूल हवं, हा अट्टाहास न धरता एखाद्या संस्थेला पैसे देऊन काही मुलांच्या शिक्षणाचा भार उचलू. नाहीतरी हल्ली मुलं आईबाबांच्या सोबत असतात कुठं?' एक वेगळा विचार ही कथा समोर ठेवते. 'एक चमेली के मंडवेतले' ही एक निखळ आणि नितळ संबंधाची कथा आहे, कुतूहल, प्रेम आणि जिव्हाळा, यांची अलवार गुंफण असलेली. अलका आणि मधुकर या दोघांची. सहचराशिवाय जगणाऱ्यांची. राहुल आणि मिष्ठीच्या दृष्टीने आजीआजोबांची. काटे आणि फुले यांच्या सलगीची.

'कॅनव्हास' ही कथा एका चित्रकाराची, लहान शालेय मुलांना चित्र काढायला शिकवणाऱ्याची, कुलदीप उर्फ केडीची. तो एकटा आहे, अविवाहित. शिक्षकाच्या मायेने, पितृवात्सल्याने मुलामुलींना केलेले स्पर्श हे विकृतीचे लक्षण ठरवून सोसायटी त्याच्या विरोधात उठते. त्यावेळी होणाऱ्या मानसिक यातना कलाकारासाठी किती क्लेषकारक असतात, त्याचे वर्णन ही कथा करते. मनाचा होणारा कोंडमारा मोकळा करण्यासाठी जवळ कुणी नाही. एक ताई आहे तीही दूरदेशी. तिच्याजवळ तो स्वतःचे मन मोकळे करतो ई मेलच्या माध्यमातून. ही कथा फुलत जाते ती याच ई मेलच्या तंत्राने. हळुवारपणे केलेले वर्णन अंतर्मुख करते. यातले कुलदीपच्या तोंडी आलेले वाक्य त्याची अवस्था व्यक्त करण्यास पुरेसे आहे,'माझं असं झालंय ना, कॅनव्हासवर कोणीतरी काळ्या रंगाचे शिंतोडे उडवलेत आणि मला चित्र काढायला सांगितलंय.' 'सौदा' ही कथा वेगळे रूप घेऊन येते. एक मोठा पट असलेली ही कथा म्हणावी लागेल. ती गुंफलेली आहे, राधिका या व्यक्तिरेखेभोवती. फारसे शिक्षण नसलेल्या राधिकाचा नवरा दीपक एक दिवस तिला सोडून घराबाहेर निघून जातो. उदरनिर्वाहासाठी तिला आपले गर्भाशय भाड्याने देण्याची वेळ येते. विचित्र दैवयोग असा की, गर्भाशय ज्यांना भाड्याने घ्यायचे आहे, ते अतिश्रीमंत दांपत्य दीपेन चौधरीचे आहे आणि हा दीपेन म्हणजेच तिचा एकेकाळचा तिला सोडून गेलेला नवरा दीपक आहे. दुसरे लग्न करून तो तिच्यासमोर खरेदीदार म्हणून उभा आहे. नात्याची ही गुंतागुंत आणि मानसिक पातळीवरचा संघर्ष यातून ही कथा एका वेगळ्याच पातळीवर जाऊन उभी राहते.

इतरही कथा मनाला स्पर्शून जाणाऱ्या आहेत. जगण्याच्या विविध स्तरांचे दर्शन घडवतात. 'ती' ची गोष्ट, पिंडदान, शिनेमा शिनेमा, हॅपी ॲनिवर्सरी, आयसीयूच्या खिडकीतून, अशा वेगवेगळ्या आशयांच्या कथा कायमच्या लक्षात राहाव्यात अशा आहेत.

'कॅनव्हास' हा डॉ. स्मिता दातार यांचा पहिलाच लघुकथांचा संग्रह. त्यामुळे त्यातले अल्लडपण लक्षात येणारे आहे. परंतु पुढच्या मोठ्या प्रवासाची ग्वाही ठरावी, अशा या कथा आहेत. कथांचा आकार लहान आहे, लघुकथा शोभाव्यात असा, परंतु त्यांचा आवाका मोठा आहे. एखादा अनुभव चपखलपणे पकडणे अवघड असते, तो सहजपणा लेखिकेकडे आहे. आपल्याला जे सांगायचे आहे, जे भावले आहे, त्याचे वर्णन त्या सहज सोप्या शैलीत व्यक्त करतात. अनअलंकृत शैली म्हणावी अशी. मुळातच सुंदर असणाऱ्याला अलंकारांची गरज ती काय, असे म्हणतात, त्याचा प्रत्यय देणारी ही शैली आहे. या कथांमागे जगण्याचे सूत्रही आहे. आपल्या भवतालचा समाज, घडणाऱ्या घटना, व्यक्तिरेखा, यांचे निरीक्षण करण्याची, त्यानुसार त्यांचे कथेत मांडणी करण्याची कलाही त्यांनी आत्मसात केलेली दिसून येते. स्वतः डॉक्टर असल्याने पेशंटसाठी कौशल्य पणाला लावतात, तितकेच कौशल्य कथालेखनात त्यांनी दाखवलेले आहे. काही वाक्ये त्या इतक्या सजपणे लिहून जातात की, कथा आणि त्या व्यक्तिमत्त्वाचे संपूर्ण चित्र नजरेसमोर उभे राहते. काही वाक्ये पहा, 'सियाचेन ग्लेशियर खरी तर हिमनदीच ती; पण न वाहता बर्फ होऊन पडलेली परशुरामाची अहिल्याच जणू.' 'आपण दोघी झाडाच्या तुटलेल्या फांद्या... एकत्र राहिलो तर मोळी बनेल.' 'आईचा स्पर्शसुद्धा मुलांच्या भावनिक वाढीसाठी महत्त्वाच असतो, असं तिचं शास्त्र सांगायचं.' 'करमणूक पुरुषाला लागते, आणि बाईला नाही?'

एक स्तुत्य असा हा प्रयत्न आहे, चटकन मनाची पकड घेणारा. या आपल्याच कथा आहेत, असा अनुभव वाचकाला देणारा कथासंग्रह, असे याचे वर्णन करता येईल.

सुप्रसिद्ध कथालखिका, मोनिका गजेंद्रगडकर यांची सुंदर अशी प्रस्तावना लाभली आहे. त्यांनी कथांचे विश्लेषन तर केले आहेच, परंतु लेखिकेच्या प्रयत्नांचे कौतुक देखील केले आहे, काही सूचना केल्या आहेत. या सूचना केवळ दातार यांच्यासाठीच आहेत, अशा नव्हेत; तर कथालेखन करणाऱ्या प्रत्येकासाठी त्या मार्गदर्शक ठराव्यात.

सतीश भावसार स्वतः उत्तम चित्रकार आहेत. चित्रकाराच्या हातात असलेली रंगाची प्लेट आणि लेखिकेच्या हातात असलेली कथांची प्लेट यांचे नाते समानच ठरते. रंगांच्या प्लेटवर मांडून ठेवलेले विविध रंग, आणि कथांमधील व्यक्तिरेखांच्या स्वभावांतील विविध रंग यातही साम्यच असते. कॅनव्हास हा रंगांनी चितारलेला असतो, जीवनही एक कॅनव्हासच आहे, विविध घटना, व्यक्तिरेखांनी रंगलेला. हे समान नाते सांगणारे सूचक असे मुखपृष्ठ भावसार यांनी सजवलेले आहे.

**मूल्य १३० रुपये   सवलतीत ८० रुपये**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**आभाळ झेलण्याचे दिवस**

**संजय कृष्णाजी पाटील**



**आभाळ कवेत घेऊ पाहणारे काही**

चौफेर लेखन म्हणजे काय? ते करता येते का? असेल तर ते कसे? या प्रश्नांची एकत्रित उत्तरे हवी असतील, तर त्यांचे उत्तर आहे, ‘आभाळ झेलण्याचे दिवस’ हे पुस्तक. हे पुस्तक वेगवेगळे अनुभवही देते तसा एकत्रितही देते, थोडक्यात कथा, लेख आणि समीक्षात्मक रसग्रहण, असा तिपेडी वेणीचा हा गोफ आहे, रेशमी, मजबूत, सशक्त, एकजीव!

संजय कृष्णाजी पाटील हे आपल्याला यापूर्वी अनेकवेळा, अनेक ठिकाणी, अनेक रूपात भेटलेले आहेत. मुळात एक कलंदर कवी मनाचा माणूस. नाटकावर भरभरून जीव ओवाळून टाकणारा. प्रकटीकरणाला रसरसून दाद देणाऱ्या सिनेमाच्या माध्यमाने झपाटलेला. कलेवर, साहित्यावर मनापासून प्रेम करणारा, प्रतिभेचे वरदान लाभलेला कलासक्त प्रतिभावान माणूस. शेवटी दैनंदिन व्यवहारातला एक प्रशासकीय अधिकारी. लेखक, नाटककार, पटकथा-संवाद लेखक, कवी-गीतकार, निर्माता अशा वेगवेगळ्या रूपात असलेले संजय पाटील अनेक गौरव पुरस्कारांनी सन्मानित झालेले आहेत, नव्हे, पुरस्कार त्यांच्यासमोर हात जोडून उभे आहेत, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

‘जोगवा’ चित्रपटाला सहा राष्ट्रीय पुरस्कारांसह अठ्ठेचाळीस पारितोषिके प्राप्त झालेली आहेत. खूप गाजलेला, कौतुक झालेला हा चित्रपट आपण सगळ्यांनीच पाहिलेला आहे. त्याने भारावलो देखील. पडद्यावर दिसणाऱ्या चित्रपटाचे रूप आपण पाहिले, त्याच्या पाठी असलेली पराकाष्ठा आपणास माहीत असण्याचे कारण नाही. परंतु ती समजली तर ‘खरे अंतरंग’ समजून येईल. त्यासाठी ‘मंतरलेला जोगवा’ हा लेख वाचायला हवा. कलेने झपाटलेला कलावंत माणूस जिद्दीने पेटला तर किती परिश्रम घेऊ शकतो, कोणत्या मानापमानाच्या, तडजोडीच्या कातळाशी टक्कर घेत राहतो,याचे चित्रण या लेखात आहे, जे चित्रपटाइतकेच सुरस आणि जिद्दीची चिकाटी दर्शविणारे आहे.

पाऊस सगळ्यांनाच आवडतो. त्यात बागडण्यासाठी वयाने लहानच असले पाहिजे असे बंधन नाही. पाऊस पाहताना सगळेच अंतर्बाह्य त्यात चिंब होतात, त्याच्याशी समरस होतात. परंतु एक जबाबदार अधिकारी जेव्हा कर्तव्याची जाणीव ठेवून पावसाकडे पाहतो, तेव्हा तो सगळ्यांसाठी या कोसळणाऱ्या नभाला प्रार्थना करतो. जांभूळपाड्यातले क्लेशकारक अनुभव आणि बालपणी घेतलेले पावसातल्या मस्तींचे अनुभव यांना जोडणारा ‘आभाळ झेलण्याचे दिवस’ हा लेख अंतर्मुख करतो.

‘अंगबीणात चाफा’ या लेखातून लेखक बालपणापासूनचा पट उभा करतात तो ‘आई’ नावाच्या दीपस्तंभाला समोर ठेवून. आई म्हटले की प्रेम, जबाबदारी, संस्कार, खंबीरपणा अशा अनेक गोष्टी आल्याच. पण ती जेव्हा उत्तम वाचक असते, नाटक-सिनेमा या कलांचा आस्वादी आनंद इतरांत भिनवते, तेव्हा मुलांच्या ठायी कलेच्या कारंज्याचे तलाव निर्माण होणारच. आज आपण जे आहोत, त्याचे श्रेय आईकडे जाते ही कृतज्ञतेची आंतरिक ओली भावना लेखक जपतात, तेव्हा त्या माऊलीचे कलासक्त मन किती मोठे असेल याची कल्पना येते.

‘रणांगण’ या कादंबरीने मराठी वाचकाला झपाटून टाकले, याला एक काळ गेला. तरीही तिचे गारुड आजही कायम आहे. या कादंबरीने आपल्याला कसे झपाटून टाकले, याचे वर्णन लेखकाने केले आहे. या कादंबरीतील सौंदर्यस्थळे कोणती आहेत, त्यांना अधारेखित केले आहे. परंतु इतकेच नाही, लेखक स्वतः त्या व्यक्तिरेखांच्या भावनांशी पूर्णपणे समरस होऊन हॅर्टाला ‘माझ्या लाडक्या पोरी’ अशी आर्त साद घालतात. या कादंबरीविषयी लिहिताना लेखक लिहितात, ‘तेव्हा समुद्राचे रणांगण झाले होते. आज जगण्याच्या अंगणात समुद्राने रणांगण मांडू नये म्हणून मी वेळीच माझ्या वर्तमानाला जागे करणे गरजेचे आहे.’ ‘लस्ट फॉर लालबाग’ या कादंबरीविषयी तितक्यात तन्मयतेने लिहिले आहे. लेख आणि रसग्रहण असे अकरा ललितलेख पहिल्या भागात आहेत. लेखकाची सजग संवेदना आणि भारावलेपण यांचा आनंदमय अनुभव हे लेख देतात.

पुस्तकाच्या दुसऱ्या भागात दहा कथा आहेत. कथा ही जशी घटनाप्रधान असते तशी ती व्यक्तिप्रधानही असते. लेखक यांच्याकडे या दोन्ही नजरेने पाहतात. त्यामुळे घटना, त्याभोवतीचे वातावरण इतक्या चपखलपणे उभे करतात, की आपण एखादी चलचित्रपटकृती पाहत आहोत, असे वाटत राहते. या सगळ्याच कथा भावणाऱ्या आहेत. यातली ‘लख्ख चांदण्यामधला जख्ख म्हातारा’ ही कथा खिळवून ठेवणारी आहे. ‘सुखदेव ’ या व्यक्तिरेखेभोवती गुंफलेली ही कथा जगण्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर जाताना वाचकालाही सोबत घट्ट बिलगून बसते. गावाहून स्वप्ने घेऊन शहरात आलेला सुखदेव गुत्ते,बार, कंडोम यांच्यात कुजत गेला. तो शेवटी स्वतःविषयी सांगतो, ‘बाबा, तू म्हातारा न हुता मेलास आनि मी मातुर तुला आठवत आठवत म्हातारा झालो.’

‘भांगा’ या कथेतले ‘याल तर हसाल, न याल तर फसाऽल’ या वाक्याने सगळी कथा व्यापून टाकलेली आहे. यातल्या प्रत्येकाच्या वागण्याच्या, बोलण्याच्या तऱ्हा वेगवेगळ्या आहेत. त्यांच्या जगण्याच्या कल्पना वेगळ्या आहेत. ते सारे लेखकाने अतिशय ताकदीने उभे केल्याने कथेला वेगळे परिमाण लाभले. इतरही कथांमध्ये असेच वेगवेगळेपण ठासून भरले आहे, ज्यातून त्यांची परिणामकारकता उठून दिसते. तसे लेखकाचे कसदारपणही लक्षात येते.

लेखकाकडे विषयाकडे चहूबाजूंनी पाहण्याची कला आहे. मन संवेदनशील आहे. विषय सजीव करताना त्याची परिणामकारकता कशी पक्की होईल, याची हुन्नर अंगी ठासलेली आहे. त्यामुळे त्यांचा लेख असो, समीक्षा असो, गीत किंवा कथा असो, परिपूर्ण आनंदी समाधानाचा अनुभव देतात.

सतीश भावसार यांचे मुखपृष्ठ शीर्षकाशी नाते सांगणारे आहे.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**




# ग्रंथपान

**पुस्तकचोर**
**विनता कुलकर्णी**




**चोरी, युद्ध, शब्द**

'पुस्तकचोर' हा ऑस्ट्रेलियन लेखक मार्कस झुसॅक यांनी लिहिलेल्या 'द बुक थीफ' या कादंबरीचा अनुवाद आहे. न्यूयार्क टाइम्सने दिलेल्या वृत्तानुसार सर्वाधिक खपाच्या पुस्तकांच्या यादीत हे पुस्तक पाचशेहून अधिक आठवडे आघाडीवर होते. त्याचे जगातल्या तीस भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. अशा पुस्तकाचा मराठीत अनुवाद केला आहे तो अमेरिकास्थित विनता कुलकर्णी यांनी. त्या अमेरिकेत विद्यापीठात प्राध्यापक असून विपुल असे लेखन त्यांनी केलेले आहे.

पुस्तकचोर या कादंबरीची नायिका आहे लीझल मेमिंगर, दहा ते चौदा वर्षे वयाची. ती म्युनिकपासून जरा लांब असलेल्या 'मोल्किंग' या गावी दत्तक पालक हुबरमान या कुटुंबाकडे येते, आई असूनही अनाथ म्हणून. हे कुटुंबही गरीब, कसेबसे उदरनिर्वाह करणारे. त्यामुळे त्यांची वस्तीही गरीब असलेल्या हिमेल भागातली. लीझलला वाचता येत नाही अशा काळात तिला एक बर्फात पडलेले पुस्तक सापडले, तिच्या मृत भावाचे दफन करण्याच्या प्रसंगी, 'थडग्यासाठी खोदकाम करणाऱ्याचे माहितीपुस्तक'. तेव्हापासून पुस्तकाच्या वेडाने ती झपाटली जाते. शाळेत प्रगती यथातथा असून देखील तिचे पुस्तकाचे वेड वाढतच जाते, इतके की ती त्यासाठी मेयरच्या घरातून पुस्तकांची चोरी करू लागते. तशी मोजकीच पुस्तके चोरलेली आहेत. परंतु त्यांचे वेगळेपण, त्यांचे कथानक यांचे धागेदोरे हे कादंबरीच्या खोडाभोवती गुंफलेले आहेत, एकरूप झालेले आहेत.

या कादंबरीचा काळ आहे तो १९३९ ते १९४२. हिटलर आणि दुसऱ्या महायुद्धाचा. ज्यूंचा विरोध आणि त्यांची छळछावण्यांकडे रवानगी, युद्ध, बॉम्बहल्ले, या पार्श्वभूमीवर ही कादंबरी उभी आहे. लीझलचे पालक म्हणजे रोझा व हान्स हुबरमान. गरीबीशी सामना करीत जगणारे. रोझा लोकांचे कपडे धुणे, इस्त्री करणे ही कामे करते. युद्धामुळे पुढे ते काम बंद पडते. हान्स एक रंगकाम करणारा. ऑकर्डियन वाजवणारा. जेमतेम कमाई असलेला. त्याचा मुलगा आणि मुलगी वेगळे राहतात. मुलगा फ्यूररचा समर्थक, युद्धावर जातो. हान्स स्वतः फ्यूररच्या पक्षाचा कार्यकर्ता नाही. त्याला तो आवडतही नाही. तरी देखील तो त्या पक्षाचे सभासदस्यत्व मिळावे म्हणून अर्ज करतो. त्यामुळेच त्याच्यावर विद्रोही म्हणून कारवाई होत नाही. हिटलर ज्यूंचा द्वेषी आहे, हे माहीत असूनही तो मॅक्स नावाच्या ज्यू तरुणाला स्वतः घरात आश्रय देतो, सर्व धोका पत्करून.

कादंबरी लीझलच्या भावविश्वाला समृद्ध करीत पुढे जाते. तिचे वय लक्षात घेता कुटुंबाची असलेली बेताची परिस्थिती, शाळा, मित्र, खेळ, चोऱ्या, आजूबाजूचा परिसर, या परिघात ती कशी वावरते, याचे वर्णन कादंबरीत बालसुलभ तरलतेने येते. परंतु दुसरी बाजू आहे ती तिच्या मानसिकतेची. ही बाजू अतिशय समर्थपणे पुढे येते. समजूतदारपणा आहेच परंतु अपमानाच्या गोष्टी समोर येतात तेव्हा ती कुठेही तडजोड करीत नाही. त्याचा प्रतिकार करण्यासाठी पुढे सरसावते. मारामारी करणारे मित्र असू देत, नाहीतर धुण्यासाठी कपडे देणारी मेयरची पत्नी असू देत. युद्धकाळात बॉम्बहल्ल्याच्या वेळी तळघरात जमलेल्यांना पुस्तक वाचून दाखवते. तिचे भावनिक विश्व लहान असले तरी ते विशाल आहे. स्वतः कृश प्रकृतीची असलेली ती हलाखीने कृश झालेल्या आजारी मॅक्सची काळजी घेते. दोघांनाही एकमेकांचा लळा लागतो. परिस्थिती खूप अवघड होते तेव्हा तो हुबरमनचे तळघर सोडून जातो. पुढे छळछावणीकडे जाणाऱ्या ज्यूंच्या कळपात तो रस्त्यातून जाताना दिसतो तेव्हा गर्दीतही लीझल त्याला ओळखते, त्याला भेटण्यासाठी आत शिरते, पोलिसांचा मार खाऊनही पुन्हा-पुन्हा आत शिरते.

या कादंबरीत अनेक व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. त्या प्रत्येकीचा ठसठशीतपणा नजरेत भरणारा आहे. उत्कंठा सतत वाढत जावी, अशा प्रसंगांची केलेली गुंफण वाचकाला खिळवून ठेवण्यात कमालीची यशस्वी ठरली आहे. प्रखर ज्यूविरोध सर्वत्र असताना मॅक्सला घरात आश्रय देणे, मित्र रुडीने चुंबनांची केलेली मागणी, पक्ष सदस्यत्वासाठी हान्सने केलेला अर्ज, युद्धावर रवानगी, या घटना कादंबरीशी खिळवून ठेवतात. उत्कट बिंदू येतो जेव्हा लीझल मृत रुडीचे चुंबन घेण्यासाठी वाकते तेव्हा.

कांदबरीची रचना काहीशी वेगळ्या पद्धतीने केलेली आहे. कथन निवेदन पद्धतीचा अवलंब असून तिचा निवेदक आहे साक्षात यमराज. वाचकांशी संवाद करीत तो कथानक पुढे घेऊन जातो. कधी स्वतःविषयी सांगत जातो. मूळ लेखकाने लिहिलेली साहित्यकृती ही वातावरण, पार्श्वभूमी, व्यक्तिरेखा यामुळे परदेशी असल्याची खात्री देते. ती तशीच ठेवण्यातही औचित्य आहे, वाचकांच्या सोयीसाठी, कथानकाची मागणी म्हणून! परंतु विनता कुलकर्णी यांनी हा अनुवाद केला आहे, असे न वाटता ती मूळ मराठीतील साहित्यकृती आहे, असेच वाटावे इतकी अस्सलपणे अनुवादित झालेली आहे. हे असे अस्सलपण लेखिकेकडे असलेल्या प्रतिभेच्या हुकमतीची साक्ष ठरते. कुठेही मूळ कथानकाला धक्का न लावता जे सादर केलेले आहे, त्याला तोड नाही. भाषेचा डौल उत्तमपणे सांभाळलेला, तो अनुवादाचे स्मरण झाकोळून टाकणारा आहे. कथानकाला असलेली वेगळी शैली कुणालाही भुरळ घालणारी असून, तिच्यात कुठेही अन्य भाषिक शब्दांना स्थान मिळालेले नाही. जर्मन भाषेच्या शब्दांची अपरिहार्यता आहेच, परंतु ती शब्दार्थ रूपात दिल्याने आणि कथानकाशी नक्षीकामाइतकी बेमालूम कोरलेली असल्याने, कथानक आणखी वरच्या उंचीवर पोहोचते. यातला जाणवणारा विशेष असा की, लेखिकेचे वास्तव्य परदेशात असूनही त्यांच्या मराठीच्या अस्सलपणाला कुठे धक्का लागलेला नाही.

अनिल दाभाडे यांनी मुखपृष्ठ सजवलेले आहे ते दोन रंगात, लाल आणि काळा. लाल रंग दाखवतो रक्तरंजित पार्श्वभूमी, जी हिटलरच्या कारवायांनी रंगलेली आणि काळाकुट्ट रंग अंधार दाटलेल्या आयुष्याचा. यात उचललेले देह, सायकलवरून केलेल्या फेऱ्या, ॲकॉर्डिनचे सूर आणि अंधारलेल्या आयुष्याचे चार शब्द, यांच्या प्रतिमा. या सगळ्याच्या मध्ये आहे पुस्तक. अंगावर शहारा आणणारे मुखपृष्ठ पुस्तक वाचून झाल्यानंतरही प्रभावाचा गडदपणा अधिकच गहिरा करत जाते, खोल जखमेसारखे!

**मूल्य ६०० रु. सवलतीत ३६० रु.**

# ग्रंथपान

**घातसूत्र**
**दीपक करंजीकर**



## जगाला वेठीला धरणारे काळेपहाड

'घातसूत्र' हे आघातसूत्र आहे. एकतर वाचायला घ्यावे तर भार न पेलणारा. विषय असे की, एकापाठोपाठ एकेक धक्के देणारे, विचाराच्या, कल्पनेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविणारे. कुठे आहोत आपण, कुठल्या जगात वावरतो आहोत, याचा पुन्हा-पुन्हा विचार करायला लावणारे पुस्तक. हे कपोलकल्पित तर नव्हे, दुसऱ्या ग्रहावरील तर या घटना नाहीत, अशा विचित्र प्रश्नांच्या खोल दरीत भिरकावून देणारे हे पुस्तक. आणि वाचून थकल्यावर एवढाच अनुभव येतो, एक निःशब्द काळोखी शांत पोकळीचे आवर्तन आपल्या भावेती भिरभिरत आहे आणि तिच्यात बधीर झाल्यासारखे निश्चल आडवे झालेले आहोत, ऑपरेशन टेबलावर पडल्यासारखे.

इंग्लंड ते न्यूयॉर्क या प्रवासाला निघालेली महाकाय टायटॅनिकने चौदा एप्रिल एकोणीसशे बाराला चौदाशे प्रवाशांसह समुद्रात समाधी घेतली, ही घटना जगातला कुणीही विसरू शकत नाही. वरवर अपघात वाटणारी ही घटना, खरेच अपघाताच्या कसोटीवर घासून पाहिली तर, तिच्या उत्तराचे होकायंत्र आश्चर्यकारकरित्या नकारार्थीकडे टोक वळवते. हे कसे शक्य आहे, असा भाबडा प्रश्न कुणाच्याही मनात येऊ शकतो. परंतु फेडरल बँकेला होणारा विरोध, नुकसान भरपाईचा विमा, नवीन जहाजाच्या बांधणीचा अवाढव्य खर्च, अशा वास्तववादी संदर्भांना पाहिल्यानंतर हे भाबडेपण देखील टायटॅनिकसारखे लाटांच्या तडाख्यात सापडल्याशिवाय राहात नाही. मुळात बुडाली ती 'टायटॅनिक' नसून 'ऑलिम्पिक' होती, असे संदर्भासह पुढे येते तेव्हा सारे आकाश गरगरा भोवती फिरायला लागते. तीच गोष्ट ९/११ ची. सगळ्यांच्या नजरेला वर्ल्ड टॉवरच्या दोन उत्तुंग इमारती कोसळताना दिसल्या. आणि सगळी संशयाची क्षेपणास्त्रे लादेनकडे रोखली गेली. परंतु हल्लेखोरांत एकाही अरबाचा समावेश नाही. ऐंशी देशाचे साधारण पाचशे विदेशी नागरिक यात मारले गेले, यात ज्यू नागरिकांचा समावेश नाही. असे तब्बल तीस पुरावे लेखकाने सादर केलेले आहेत, संशय आणि वास्तवाचा पट उलगडून दाखवण्यासाठी!

सीआयए हे गुप्तहेर खाते आहे, हे मूळ उद्देश हरवलेले खाते आहे. लादेन हा एके काळचा सीआयएचा हस्तक. एन्रॉन एक भ्रामक वास्तव, इराण-इराक, सद्दाम-अयातुल्ला, यांच्या भोवतीचे राजकारण, तेलावर मालकी प्रस्थापित करण्याचे डाव, जहाज व्यवसायाची साखळी, आर्थिक व्यवहाराच्या नाड्या आवळणारे वॉलस्ट्रीट, जगाच्या कारभारावर नियंत्रण मिळवणारी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, फेडरल बँक, अशा कितीतरी घटनांची ही मालिका आहे.

या सगळ्या घातसूत्रांचे खेळिये आहेत रॉथशिल्डस, जे.पी. मॉर्गन, रॉकफेलर, किसिंजर, बुश, सारखे मोजके हाताच्या बोटांच्या संख्येपलीकडे जाणार नाहीत इतकेच लोक. परंतु त्यांनी जणू जग वेठीला धरले आहे. सत्तेसाठी थंड डोक्याने, थंड रक्त ठेवून, धूर्तपणे, कुटिलपणे, वाटेल ते करायची तयारी असलेले हे खेळिये. सत्ता ही सामर्थ्यातून येते. सामर्थ्य समृद्धीतून येते. समृद्धी सोने, तेल, जहाज, वॉलस्ट्रीट आणि हवेतून येणारा पैसा, यातून येते. हे सूत्र समोर ठेवून कुटिलपणे ही सगळी क्षेत्रे या मंडळींनी यशस्वीपणे आपल्या ताब्यात ठेवलेली आहेत. जगात ज्या राजकीय, आर्थिक, ऐतिहासिक घटना घडत आहेत, त्यापाठी धागे पकडून असलेले हात या मंडळींचे आहेत. हिटलर, मुसोलिनी, रशिया, ब्रिटन, जपान यासारख्यांना मदत करून युद्ध भडकते ठेवण्यात यशस्वी खेळी खेळली गेली. युद्ध असेल तर युद्ध शस्त्रास्त्रे अधिक लागतात. यातून शस्त्रास्त्रांचा मोठा व्यापार करता येतो. प्रचंड नफा कमवता येतो, हे त्यापाठचे आणखी एक सूत्र. आणि अशा अनेक सूत्रांत एक गोंडस सूत्र आहे 'वन वर्ल्ड!'

विषयांचा आवाका सामान्य वाचकाच्या आवाक्या बाहेरचा. त्यातले संदर्भ विश्वास ठेवायला शंभरदा हलवून सोडणारे, अविश्वासाला काळोखाच्या पिंजऱ्यात कोंडून ठेवायला लावणारे. काळाची व्याप्ती सनावळ्यांसह आहे, कर्ते करविते कोण आहेत, त्यांची जंत्री आहे, त्यांचे फोटो दिलेले आहेत. इतकेच नव्हे तर जिथून संदर्भ घेतले त्यांची भलीमोठी यादीच सोबतीला आहे. तरीही अविश्वास ठेवणार? पुस्तकाचा आकार, वजन यापलीकडचे आकारमान आणि वजन असलेले षड्यंत्र ही पृथ्वी नावाचा ग्रह सांभाळतो कसे, याचेच नवल वाटावे. एवढी अफाट माहिती संकलित करणे म्हणजे कोळशाच्या खाणी उकरण्यासारखे आहे हो हे काम. कुठलाही शब्द संदर्भाच्या कोंदणाबाहेरचा नाही. हे सारे स्मरणात ठेवायचे, त्यांची संगती जुळवायची, त्यांची कालानुक्रमे मांडणी करायची, कुठलाही संदर्भ दुसरीकडे जाता कामा नये, निसटता कामा नये, त्यांच्यात उणीव राहता कामा नये, जे द्यायचे ते परफेक्ट, पूर्ण, समाधान देईल इतके परिपूर्ण. हे येरागबाळ्याचे काम नव्हे. जे घडले ते अपघाताने वा नैसर्गिकपणे नाही, याचा कर्ताकरविता वेगळाच आहे, अशा ज्याची खात्री झाली, अशा दीपक करंजीकरांचा हा ऐवज वाचकांना नुसता अंतर्मुख करणार नाही, प्रत्येक घडणाऱ्या घटनेमागे एक घातसूत्र आहे अशी नवी दृष्टी देईल, असा विश्वास वाटतो.

करंजीकरांची भाषा प्रगल्भ आहे. ती बोजड नाही. आंतरराष्ट्रीय विषय असले तरी इंग्रजीचे कुठेही स्तोम नाही. जे सांगायचे आहे, त्याला अधिकाधिक स्पष्ट आणि सहज आकलन होईल याची दक्षता घेण्यातले त्यांचे कसब वाखाणावे तितके थोडे म्हणावे लागेल. या लेखनाला नुसते संशोधनच नाही, तर त्याला सूत्रात्मक चिंतनाची जोड आहे. 'घटनाक्रम', 'सूत्रधार' आणि 'संरचना' अशा तीन भागात पुस्तकाची मांडणी विभागली आहे. जागतिक घडामोडींचे चिकित्सक अभ्यासक आणि पत्रकार कुमार केतकर, कादंबरीकार रंगनाथ पठारे यांच्या साक्षेपी प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेल्या आहेत. त्यांनी केलेले मूल्यमापन म्हणजे करंजीकरांच्या प्रतिभेला दिलेली शाबासकीची मोहोर म्हणता येईल.

सतीश भावसार यांनी अतिशय सुरेख मुखपृष्ठ सजवले आहे. पृथ्वीलाच कठपुतळीसारखे खेळवणारे खेळिये येथे आहेत, हे त्यांनी मार्मिकपणे दाखवलेले आहे.

**मूल्य ८०० रु. सवलतीत ५०० रु.**




# ग्रंथपान




**पुस्तकचोर**
**विनता कुलकर्णी**

## चोरी, युद्ध, शब्द

'पुस्तकचोर' हा ऑस्ट्रेलियन लेखक मार्कस झुसॅक यांनी लिहिलेल्या 'द बुक थीफ' या कादंबरीचा अनुवाद आहे. न्यूयार्क टाइम्सने दिलेल्या वृत्तानुसार सर्वाधिक खपाच्या पुस्तकांच्या यादीत हे पुस्तक पाचशेहून अधिक आठवडे आघाडीवर होते. त्याचे जगातल्या तीस भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. अशा पुस्तकाचा मराठीत अनुवाद केला आहे तो अमेरिकास्थित विनता कुलकर्णी यांनी. त्या अमेरिकेत विद्यापीठात प्राध्यापक असून विपुल असे लेखन त्यांनी केलेले आहे.

पुस्तकचोर या कादंबरीची नायिका आहे लीझल मेमिंगर, दहा ते चौदा वर्षे वयाची. ती म्युनिकपासून जरा लांब असलेल्या 'मोल्किंग' या गावी दत्तक पालक हुबरमान या कुटुंबाकडे येते, आई असूनही अनाथ म्हणून. हे कुटुंबही गरीब, कसेबसे उदरनिर्वाह करणारे. त्यामुळे त्यांची वस्तीही गरीब असलेल्या हिमेल भागातली. लीझलला वाचता येत नाही अशा काळात तिला एक बर्फात पडलेले पुस्तक सापडले, तिच्या मृत भावाचे दफन करण्याच्या प्रसंगी, 'थडग्यासाठी खोदकाम करणाऱ्याचे माहितीपुस्तक'. तेव्हापासून पुस्तकाच्या वेडाने ती झपाटली जाते. शाळेत प्रगती यथातथा असून देखील तिचे पुस्तकाचे वेड वाढतच जाते, इतके की ती त्यासाठी मेयरच्या घरातून पुस्तकांची चोरी करू लागते. तशी मोजकीच पुस्तके चोरलेली आहेत. परंतु त्यांचे वेगळेपण, त्यांचे कथानक यांचे धागेदोरे हे कादंबरीच्या खोडाभोवती गुंफलेले आहेत, एकरूप झालेले आहेत.

या कादंबरीचा काळ आहे तो १९३९ ते १९४२. हिटलर आणि दुसऱ्या महायुद्धाचा. ज्यूंचा विरोध आणि त्यांची छळछावण्यांकडे रवानगी, युद्ध, बॉम्बहल्ले, या पार्श्वभूमीवर ही कादंबरी उभी आहे. लीझलचे पालक म्हणजे रोझा व हान्स हुबरमान. गरीबीशी सामना करीत जगणारे. रोझा लोकांचे कपडे धुणे, इस्त्री करणे ही कामे करते. युद्धामुळे पुढे ते काम बंद पडते. हान्स एक रंगकाम करणारा. ऑकर्डियन वाजवणारा. जेमतेम कमाई असलेला. त्याचा मुलगा आणि मुलगी वेगळे राहतात. मुलगा फ्यूररचा समर्थक, युद्धावर जातो. हान्स स्वतः फ्यूररच्या पक्षाचा कार्यकर्ता नाही. त्याला तो आवडतही नाही. तरी देखील तो त्या पक्षाचे सभासदस्यत्व मिळावे म्हणून अर्ज करतो. त्यामुळेच त्याच्यावर विद्रोही म्हणून कारवाई होत नाही. हिटलर ज्यूंचा द्वेषी आहे, हे माहीत असूनही तो मॅक्स नावाच्या ज्यू तरुणाला स्वतः घरात आश्रय देतो, सर्व धोका पत्करून.

कादंबरी लीझलच्या भावविश्वाला समृद्ध करीत पुढे जाते. तिचे वय लक्षात घेता कुटुंबाची असलेली बेताची परिस्थिती, शाळा, मित्र, खेळ, चोऱ्या, आजूबाजूचा परिसर, या परिघात ती कशी वावरते, याचे वर्णन कादंबरीत बालसुलभ तरलतेने येते. परंतु दुसरी बाजू आहे ती तिच्या मानसिकतेची. ही बाजू अतिशय समर्थपणे पुढे येते. समजूतदारपणा आहेच परंतु अपमानाच्या गोष्टी समोर येतात तेव्हा ती कुठेही तडजोड करीत नाही. त्याचा प्रतिकार करण्यासाठी पुढे सरसावते. मारामारी करणारे मित्र असू देत, नाहीतर धुण्यासाठी कपडे देणारी मेयरची पत्नी असू देत. युद्धकाळात बॉम्बहल्ल्याच्या वेळी तळघरात जमलेल्यांना पुस्तक वाचून दाखवते. तिचे भावनिक विश्व लहान असले तरी ते विशाल आहे. स्वतः कृश प्रकृतीची असलेली ती हलाखीने कृश झालेल्या आजारी मॅक्सची काळजी घेते. दोघांनाही एकमेकांचा लळा लागतो. परिस्थिती खूप अवघड होते तेव्हा तो हुबरमनचे तळघर सोडून जातो. पुढे छळछावणीकडे जाणाऱ्या ज्यूंच्या कळपात तो रस्त्यातून जाताना दिसतो तेव्हा गर्दीतही लीझल त्याला ओळखते, त्याला भेटण्यासाठी आत शिरते, पोलिसांचा मार खाऊनही पुन्हा-पुन्हा आत शिरते.

या कादंबरीत अनेक व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. त्या प्रत्येकीचा ठसठशीतपणा नजरेत भरणारा आहे. उत्कंठा सतत वाढत जावी, अशा प्रसंगांची केलेली गुंफण वाचकाला खिळवून ठेवण्यात कमालीची यशस्वी ठरली आहे. प्रखर ज्यूविरोध सर्वत्र असताना मॅक्सला घरात आश्रय देणे, मित्र रुडीने चुंबनांची केलेली मागणी, पक्ष सदस्यत्वासाठी हान्सने केलेला अर्ज, युद्धावर रवानगी, या घटना कादंबरीशी खिळवून ठेवतात. उत्कट बिंदू येतो जेव्हा लीझल मृत रुडीचे चुंबन घेण्यासाठी वाकते तेव्हा.

कांदबरीची रचना काहीशी वेगळ्या पद्धतीने केलेली आहे. कथन निवेदन पद्धतीचा अवलंब असून तिचा निवेदक आहे साक्षात यमराज. वाचकांशी संवाद करीत तो कथानक पुढे घेऊन जातो. कधी स्वतःविषयी सांगत जातो. मूळ लेखकाने लिहिलेली साहित्यकृती ही वातावरण, पार्श्वभूमी, व्यक्तिरेखा यामुळे परदेशी असल्याची खात्री देते. ती तशीच ठेवण्यातही औचित्य आहे, वाचकांच्या सोयीसाठी, कथानकाची मागणी म्हणून! परंतु विनता कुलकर्णी यांनी हा अनुवाद केला आहे, असे न वाटता ती मूळ मराठीतील साहित्यकृती आहे, असेच वाटावे इतकी अस्सलपणे अनुवादित झालेली आहे. हे असे अस्सलपण लेखिकेकडे असलेल्या प्रतिभेच्या हुकमतीची साक्ष ठरते. कुठेही मूळ कथानकाला धक्का न लावता जे सादर केलेले आहे, त्याला तोड नाही. भाषेचा डौल उत्तमपणे सांभाळलेला, तो अनुवादाचे स्मरण झाकोळून टाकणारा आहे. कथानकाला असलेली वेगळी शैली कुणालाही भुरळ घालणारी असून, तिच्यात कुठेही अन्य भाषिक शब्दांना स्थान मिळालेले नाही. जर्मन भाषेच्या शब्दांची अपरिहार्यता आहेच, परंतु ती शब्दार्थ रूपात दिल्याने आणि कथानकाशी नक्षीकामाइतकी बेमालूम कोरलेली असल्याने, कथानक आणखी वरच्या उंचीवर पोहोचते. यातला जाणवणारा विशेष असा की, लेखिकेचे वास्तव्य परदेशात असूनही त्यांच्या मराठीच्या अस्सलपणाला कुठे धक्का लागलेला नाही.

अनिल दाभाडे यांनी मुखपृष्ठ सजवलेले आहे ते दोन रंगात, लाल आणि काळा. लाल रंग दाखवतो रक्तरंजित पार्श्वभूमी, जी हिटलरच्या कारवायांनी रंगलेली आणि काळाकुट्ट रंग अंधार दाटलेल्या आयुष्याचा. यात उचललेले देह, सायकलवरून केलेल्या फेऱ्या, ॲकॉर्डिनचे सूर आणि अंधारलेल्या आयुष्याचे चार शब्द, यांच्या प्रतिमा. या सगळ्याच्या मध्ये आहे पुस्तक. अंगावर शहारा आणणारे मुखपृष्ठ पुस्तक वाचून झाल्यानंतरही प्रभावाचा गडदपणा अधिकच गहिरा करत जाते, खोल जखमेसारखे!

**मूल्य ६०० रु.   सवलतीत ३६० रु.**




# ग्रंथपान

**घातसूत्र**
**दीपक करंजीकर**




**जगाला वेठीला धरणारे काळेपहाड**

'घातसूत्र' हे आघातसूत्र आहे. एकतर वाचायला घ्यावे तर भार न पेलणारा. विषय असे की, एकापाठोपाठ एकेक धक्के देणारे, विचाराच्या, कल्पनेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविणारे. कुठे आहोत आपण, कुठल्या जगात वावरतो आहोत, याचा पुन्हा-पुन्हा विचार करायला लावणारे पुस्तक. हे कपोलकल्पित तर नव्हे, दुसऱ्या ग्रहावरील तर या घटना नाहीत, अशा विचित्र प्रश्नांच्या खोल दरीत भिरकावून देणारे हे पुस्तक. आणि वाचून थकल्यावर एवढाच अनुभव येतो, एक निःशब्द काळोखी शांत पोकळीचे आवर्तन आपल्या भावेती भिरभिरत आहे आणि तिच्यात बधीर झाल्यासारखे निश्चल आडवे झालेले आहोत, ऑपरेशन टेबलावर पडल्यासारखे.

इंग्लंड ते न्यूयॉर्क या प्रवासाला निघालेली महाकाय टायटॅनिकने चौदा एप्रिल एकोणीसशे बाराला चौदाशे प्रवाशांसह समुद्रात समाधी घेतली, ही घटना जगातला कुणीही विसरू शकत नाही. वरवर अपघात वाटणारी ही घटना, खरेच अपघाताच्या कसोटीवर घासून पाहिली तर, तिच्या उत्तराचे होकायंत्र आश्चर्यकारकरित्या नकारार्थीकडे टोक वळवते. हे कसे शक्य आहे, असा भाबडा प्रश्न कुणाच्याही मनात येऊ शकतो. परंतु फेडरल बँकेला होणारा विरोध, नुकसान भरपाईचा विमा, नवीन जहाजाच्या बांधणीचा अवाढव्य खर्च, अशा वास्तववादी संदर्भांना पाहिल्यानंतर हे भाबडेपण देखील टायटॅनिकसारखे लाटांच्या तडाख्यात सापडल्याशिवाय राहात नाही. मुळात बुडाली ती 'टायटॅनिक' नसून 'ऑलिम्पिक' होती, असे संदर्भासह पुढे येते तेव्हा सारे आकाश गरगरा भोवती फिरायला लागते. तीच गोष्ट ९/११ ची. सगळ्यांच्या नजरेला वर्ल्ड टॉवरच्या दोन उत्तुंग इमारती कोसळताना दिसल्या. आणि सगळी संशयाची क्षेपणास्त्रे लादेनकडे रोखली गेली. परंतु हल्लेखोरांत एकाही अरबाचा समावेश नाही. ऐंशी देशाचे साधारण पाचशे विदेशी नागरिक यात मारले गेले, यात ज्यू नागरिकांचा समावेश नाही. असे तब्बल तीस पुरावे लेखकाने सादर केलेले आहेत, संशय आणि वास्तवाचा पट उलगडून दाखवण्यासाठी!

सीआयए हे गुप्तहेर खाते आहे, हे मूळ उद्देश हरवलेले खाते आहे. लादेन हा एके काळचा सीआयएचा हस्तक. एन्रॉन एक भ्रामक वास्तव, इराण-इराक, सद्दाम-अयातुल्ला, यांच्या भोवतीचे राजकारण, तेलावर मालकी प्रस्थापित करण्याचे डाव, जहाज व्यवसायाची साखळी, आर्थिक व्यवहाराच्या नाड्या आवळणारे वॉलस्ट्रीट, जगाच्या कारभारावर नियंत्रण मिळवणारी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, फेडरल बँक, अशा कितीतरी घटनांची ही मालिका आहे.

या सगळ्या घातसूत्रांचे खेळिये आहेत रॉथशिल्डस, जे.पी. मॉर्गन, रॉकफेलर, किसिंजर, बुश, सारखे मोजके हाताच्या बोटांच्या संख्येपलीकडे जाणार नाहीत इतकेच लोक. परंतु त्यांनी जणू जग वेठीला धरले आहे. सत्तेसाठी थंड डोक्याने, थंड रक्त ठेवून, धूर्तपणे, कुटिलपणे, वाटेल ते करायची तयारी असलेले हे खेळिये. सत्ता ही सामर्थ्यातून येते. सामर्थ्य समृद्धीतून येते. समृद्धी सोने, तेल, जहाज, वॉलस्ट्रीट आणि हवेतून येणारा पैसा, यातून येते. हे सूत्र समोर ठेवून कुटिलपणे ही सगळी क्षेत्रे या मंडळींनी यशस्वीपणे आपल्या ताब्यात ठेवलेली आहेत. जगात ज्या राजकीय, आर्थिक, ऐतिहासिक घटना घडत आहेत, त्यापाठी धागे पकडून असलेले हात या मंडळींचे आहेत. हिटलर, मुसोलिनी, रशिया, ब्रिटन, जपान यासारख्यांना मदत करून युद्ध भडकते ठेवण्यात यशस्वी खेळी खेळली गेली. युद्ध असेल तर युद्ध शस्त्रास्त्रे अधिक लागतात. यातून शस्त्रास्त्रांचा मोठा व्यापार करता येतो. प्रचंड नफा कमवता येतो, हे त्यापाठचे आणखी एक सूत्र. आणि अशा अनेक सूत्रांत एक गोंडस सूत्र आहे 'वन वर्ल्ड!'

विषयांचा आवाका सामान्य वाचकाच्या आवाक्या बाहेरचा. त्यातले संदर्भ विश्वास ठेवायला शंभरदा हलवून सोडणारे, अविश्वासाला काळोखाच्या पिंजऱ्यात कोंडून ठेवायला लावणारे. काळाची व्याप्ती सनावळ्यांसह आहे, कर्ते करविते कोण आहेत, त्यांची जंत्री आहे, त्यांचे फोटो दिलेले आहेत. इतकेच नव्हे तर जिथून संदर्भ घेतले त्यांची भलीमोठी यादीच सोबतीला आहे. तरीही अविश्वास ठेवणार? पुस्तकाचा आकार, वजन यापलीकडचे आकारमान आणि वजन असलेले षड्यंत्र ही पृथ्वी नावाचा ग्रह सांभाळतो कसे, याचेच नवल वाटावे. एवढी अफाट माहिती संकलित करणे म्हणजे कोळशाच्या खाणी उकरण्यासारखे आहे हो हे काम. कुठलाही शब्द संदर्भाच्या कोंदणाबाहेरचा नाही. हे सारे स्मरणात ठेवायचे, त्यांची संगती जुळवायची, त्यांची कालानुक्रमे मांडणी करायची, कुठलाही संदर्भ दुसरीकडे जाता कामा नये, निसटता कामा नये, त्यांच्यात उणीव राहता कामा नये, जे द्यायचे ते परफेक्ट, पूर्ण, समाधान देईल इतके परिपूर्ण. हे येरागबाळ्याचे काम नव्हे. जे घडले ते अपघाताने वा नैसर्गिकपणे नाही, याचा कर्ताकरविता वेगळाच आहे, अशा ज्याची खात्री झाली, अशा दीपक करंजीकरांचा हा ऐवज वाचकांना नुसता अंतर्मुख करणार नाही, प्रत्येक घडणाऱ्या घटनेमागे एक घातसूत्र आहे अशी नवी दृष्टी देईल, असा विश्वास वाटतो.

करंजीकरांची भाषा प्रगल्भ आहे. ती बोजड नाही. आंतरराष्ट्रीय विषय असले तरी इंग्रजीचे कुठेही स्तोम नाही. जे सांगायचे आहे, त्याला अधिकाधिक स्पष्ट आणि सहज आकलन होईल याची दक्षता घेण्यातले त्यांचे कसब वाखाणावे तितके थोडे म्हणावे लागेल. या लेखनाला नुसते संशोधनच नाही, तर त्याला सूत्रात्मक चिंतनाची जोड आहे. 'घटनाक्रम', 'सूत्रधार' आणि 'संरचना' अशा तीन भागात पुस्तकाची मांडणी विभागली आहे. जागतिक घडामोडींचे चिकित्सक अभ्यासक आणि पत्रकार कुमार केतकर, कादंबरीकार रंगनाथ पठारे यांच्या साक्षेपी प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेल्या आहेत. त्यांनी केलेले मूल्यमापन म्हणजे करंजीकरांच्या प्रतिभेला दिलेली शाबासकीची मोहोर म्हणता येईल.

सतीश भावसार यांनी अतिशय सुरेख मुखपृष्ठ सजवले आहे. पृथ्वीलाच कठपुतळीसारखे खेळवणारे खेळिये येथे आहेत, हे त्यांनी मार्मिकपणे दाखवलेले आहे.

**मूल्य ८०० रु.   सवलतीत ५०० रु.**

# ग्रंथपान

**चार सख्य चोवीस**
**संपदा जोगळेकर-कुळकर्णी**
**हर्षदा बोरकर, सोनाली लोहार,**
**निर्मोही फडके**



**अभिव्यक्तीची मेखला**

कथा साहित्यात अनेक अभिनव असे प्रयोग केले जातात. ज्यातून काही वेगळे अभिजात हाती येते, त्याला वाचकांची उंदड पसंती लाभते, तेव्हा तो प्रयोग यशस्वी झाला असे समजले जाते. असाच एक प्रयोग म्हणजे 'चार सख्य चोवीस' हा कथासंग्रह. हा प्रयोग केला आहे चार लेखिकांनी मिळून. खरे तर हे आश्चर्यच म्हणायला हवे. आपापली स्वतंत्र चूल न मांडता, स्वतःचे श्रेष्ठत्व राखून न ठेवता, ईर्षा-स्पर्धा या जळमटांना थारा न देता एकत्र आल्या सख्यत्वाने, हिरिरीने. एक कथासूत्र समोर ठेवले. ज्याचा आरंभ समान आहे. मात्र कथा पुढे पूर्णत्वास न्यायची ती प्रत्येकीने आपापल्या कल्पकतेनुसार. कल्पकता यासाठी की ज्यात कल्पना, कौशल्य आणि प्रतिभेचा कस दिसून येईल. त्यासाठी एक मानसशास्त्रज्ञ आणि एक कृत्तिका अशा दोन व्यक्तिरेखांची योजना केलेली आहे. मानसशास्त्रीय उपचारासाठी आलेली कृत्तिका चार रूपात समोर येते. म्हणजे अनेक वाटा फुटलेल्या रस्त्याच्या मुखाशी आणून सोडले आहे, पुढचा मार्ग प्रत्येकीने स्वतंत्रपणे शोधायचा आहे, इच्छितस्थळी पोहोचणारा. छान असा हा प्रायोगिक प्रयत्न आहे, रंगभूमीवर शोभून दिसावा असा. 'आणखी एक नारायण निकम' या नाटकाची, 'राशोमान' नावाच्या चित्रपटाची आठवण यावी, असा हा प्रयोग आहे, कुतूहल निर्माण करणारा, लेखिकांच्या कल्पकतेची साक्ष देणारा. वाचून झाल्यावर समाधान देणारा आणि वेगळे काही खूप दिवसांनी वाचनात आले, याचा आनंद देणारा.

नेहमी गोड चॉकलेट देणारा गोड काका व्यवहारिक पातळीवर येतो तेव्हा त्याने दिलेले चॉकलेट गोडपणाला पारखे ठरते. ही हुरहुर. एकेकाळी वैभवाच्या सिंहानावर विराजमान झालेल्या वत्सलाबाई त्यावरून पायउतार होतात त्या सुनेमुळे नव्हे, स्वतःच्या अपेक्षांच्या ओझ्यामुळे. म्हातारपणातले बालपण मतलबापुरते असू नये, याचे डोळसपण. दोनवेळेस सिझरियन पोटावर झालेले असताना कुटुंबनियोजनाचे ऑपरेशन वसुधानेच करावे, का? हा अलगदपणे उसवलेला टाका. एकटेपणाचे शल्य स्तोत्र -भजनांनी साफ होत नाही,ती सांदिकोपऱ्यातल्या आठवणींसारखी तिथेच राहतात, हे अचलाचे मनोगत. चूक कुणाची याची उत्तरे न सापडणारी, रेहाना शेख आणि सुभाषिणी दातार यांच्यातले सख्य, प्रेम आणि चेहऱ्यावरचा हिजाब. वाट्याला येणारे दुसरेपणाचे ओझे. अशा विविध अंगांना कवेत घेणारा हा कथासंग्रह आहे. अशा स्वतंत्र वीस कथा या संग्रहात आहेत. तर शेवटच्या भागात एकाच कथासूत्रावर आधारलेल्या चार कथा आहेत, चौघींच्या चार.

संपदा जोगळेकर, या अभिनयाची उत्तम जाण असलेल्या अभिनेत्री म्हणून परिचित आहेत तशा त्या कल्पक आणि प्रयोगशील दिग्दर्शिका आणि लेखिका म्हणून देखील परिचित आहेत. सध्या रंगभूमीवर गाजत असलेले 'चि.सौ.का. रंगभूमी' हे नाटक याची साक्ष देते. हर्षदा बोरकर या लेखिका आणि नृत्य-नाट्य दिग्दर्शिका म्हणून सर्वज्ञात आहेत तशाच उत्तम निवेदिका म्हणूनही ख्याती पावलेल्या आहेत. भाषा-साहित्य यांच्या अभ्यासक आणि संशोधक, संपादक निर्मोही फडके या व्याख्यात्या म्हणूनही नावाजलेल्या आहेत. सोनाली लोहार स्तंभलेखिका, ऑडिऑलॉजिस्ट अँड स्पिच लँग्वेज पॅथॉलाजिस्ट आहेत. अशा या चारचौघी, आपापल्या क्षेत्रात नावलौकिक संपन्न असलेल्या लेखिकांचा हा अभिनव कथासंग्रह त्यांच्याइतकाच स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची झळाळी घेऊन आलेला आहे. त्यांची प्रत्येकीची भाषाशैली, लेखनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, समाजशास्त्र आणि मानसशास्त्र यांची प्रगल्भ जाणीव, यातून लेखनाला कलात्मक उठाव देण्याची सहजता, वेगवेगळी आणि स्वतंत्र तंत्रांची परिणामकारकता यातून ठळकपणे दिसून येते. कथांचा बाज हा लघुकथेचा आहे, परंतु त्यांच्या आशयाचा आवाका मोठा असून थेट वाचकाला भिडणारा आहे. त्यांचे भावविश्व अनोखे आहे. मनाच्या तळाचा शोध हे या कथासंग्रहाचे खास वैशिष्ट्य म्हणता येईल. त्याला गढूळ उथळपणापासून अलिप्त ठेवून नितळपणाचा स्पर्श आहे. आपल्याला जे सांगायचे आहे, त्याची निश्चित अशी जाण ठेवून नेमकेपणाने ते मोजक्या शब्दात व्यक्त केलेले आहे. कथाबीजाचे हळुवारपणे बहरत जाणे ही सहज वाटणारी प्रक्रिया आनंददायी आणि प्रसन्न वाटते ती त्यात असलेल्या संवादीपणामुळे. काही कथा आत्मनिवेदनात्मक आहेत तर काही त्रयस्थ, तर काही फ्लॅशबॅकपद्धतीने. कथेचा शेवट हा महत्त्वाचा भाग असतो. तो मनाशी रुंजी घालत राहणारा असेल फुलाच्या गंधासारखा, तर ती कथा वाचल्याचा आनंद वाचक जपून ठेवतो. अशी कथा सशक्त असल्याची ग्वाही ठरते. या संग्रहातील या कथा त्या कसोटीवर सशक्त तर आहेतच, परंतु त्या लेखिकांच्या कसदार लेखनभविष्याचीही ग्वाही देतात.

शब्दमाध्यम आणि दृश्यमाध्यम यांच्यावर सारखीच सर्वमान्य हुकूमत असलेले चंद्रकांत कुलकर्णी यांची 'चारचौघींचा सृजनसोहळा!' या शीर्षकाखाली असलेली प्रस्तावना मुद्दाम वाचावी अशी आहे. लेखिकांनीही आपली सृजनशील भूमिका मनोगतात मांडली आहे.

या पुस्तकाचे अतुल जोशी यांनी सजवलेले मुखपृष्ठ अतिशय देखणे झालेले आहे. कुठेही रंगाचा बडेजाव नसूनही आकर्षक आणि कथासूत्राशी सुसंगत ठरले आहे. आत प्रत्येक कथेला पूजा रायबागी यांनी आशयसंपन्न अर्कचित्रासारखी फ्रेम देऊन उठावदारपणे सजवले आहे. त्यामुळे रेषा आणि शब्द यांची एक छानशी मैफील सजल्याचा अनुभव येतो.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**

## डायरी एका चंद्राबाईची
**डॉ. द.ता. भोसले**




**अमावस्येपूर्वीच्या कला**

प्रत्येकाचे आयुष्य ही एक कादंबरी असते आणि उगवणारा प्रत्येक दिवस हे तिचे पान असते, असे सुप्रसिद्ध आणि तितकाच लोकप्रिय इंग्रजी लेखक शिडने सेल्डन याला त्याच्या वडिलाने सांगितलेले हे वाक्य, जेव्हा सिडने सेल्डन आत्महत्या करायला निघाला होता. हे वाक्य काही सिडनेपुरते मर्यादित समजण्याचे कारण नाही. प्रत्येकाच्या आयुष्यात उगवणारा प्रत्येक दिवस काहीतरी घेऊन आलेला असतो, त्याच्या आयुष्याच्या कादंबरीचे पान म्हणून त्यात भरत घालीत असतो. फक्त प्रश्न असतो, आपण त्याच्याकडे किती डोळस आणि संवेदशीलतेने पाहतो. पूर्वी असा समज होता की, सटवाई जन्मलेल्या बाळाच्या कपाळावर त्याचे भाग्य लिहून जाते. हा समज खराखोटा, हा भाग अलाहिदा. परंतु जगणारा प्रत्येकजण त्याचे भाग्य दररोज अनुभवत असतो, उगवणाऱ्या दिवसाला सामोरे जात असतो, हे नाकारता येत नाही. 'डायरी एका चंद्राबाईची' ही कादंबरी अशीच प्रत्येक पानावर तिचे ठसठशीत नाव कोरून आलेली. जगण्याची प्रत्येक कला अनुभवत आली आहे. हे अनुभवणे कलेकलेने सुखाकडे घेऊन जाते की खाईकडे, हे वाचकांनी ठरवायचे आहे. या जगण्याला स्वतः समजून घेणे, त्याच्या भलेबुरेपणाचे धागे जुळवून ठेवणे, आणि त्यांची संगती लावून शब्दबद्ध करणे, हे काम सोपे नाही. हे काम कुणाला पथदर्शक ठरू शकते, कुणाला 'जगलेला तो माणूस' समजून घेण्यास उपयुक्त ठरू शकते. मात्र हे निश्चित, असे लेखन स्वांत सुखाय नसून आपली नाममुद्रा मागे ठेवणारे अक्षय जीवनमुद्रा ठरते. ही जीवनमुद्रा कोरण्याचे अवघड काम केले आहे सुप्रसिद्ध लेखक डॉ. द.ता. भोसले यांनी.

चंद्रमौळीत चंद्रकलेसारखी रूप घेऊन जन्माला आलेली सुकोमल चांदणी ही चंद्रमौळीत कधी मावत नाही. तिच्या आईबापांच्या जीवाला घोर लावायला कारण मात्र नक्की ठरते. त्यांच्या नजरेत आनंदाचे चांदणे फुलवण्याऐवजी दुःखाचे काजळ पेरण्याचेच काम करते. इतरांच्या डोळ्यांना मात्र सुखद लालसेचे अंगण भासते, हक्काचे. असेच आणि असेच चंद्राच्या जीवनात घडते. जन्मापासून ही परवड सुरू होते ती अखेरपर्यंत पाठ सोडत नाही. आईच्या वाट्याला जे आले तेच जन्मसिद्ध हक्कासारखे चंद्रासोबत येते. यात फसवणूक, छळ, अपमान, मानहानी, शारीरिक छळ, क्लेष अशी सर्वकाही गरळ सोसण्यालाही पर्याय नाही. तरीही जगण्यातली अपरिहार्यता टाळता येत नाही. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या तडजोडी टाळता येत नाहीत, अगदी शरीराचा बाजार मांडण्यापर्यंत. हे सारे सहन करूनही त्यावर मात करते ती माणूस म्हणून जगण्याची धडपड.

चंद्रा ही एक व्यक्तिरेखा आहे. ती स्वतःची कहाणी स्वतःच्या शब्दात मांडते, डायरीच्या स्वरूपात. यात तिच्या आईच्या वाट्याला आलेले भोग, आईबापाची होणारी परवड, त्यांची अगतिकता, लुबाडणारा–फसवणारा– मगरूर –तालेवारांपुढे संसाराचे तीनतेरा वाजतात. त्यातून जन्माला आलेली चंद्रा तोच धागा पुढे घेऊन जगते. चंद्राचा जगण्याचा मोठा परीघ हा तिचा राहत नाही, तो भोग वाट्याला आलेल्या स्त्रीच्या व्यथेचा परीघ होतो. सर्वसामान्य स्त्रीसारखं सर्वसामान्य आयुष्य जगण्याची इच्छा असणाऱ्या चंद्राच्या आयुष्याचे पोतेरे होते. केवळ तिच्या आईला आणि तिला लाभलेले रूप, हे त्याचे मूळ. सोबत बापू नावाची व्यक्तिरेखा आहे, जो स्वतःच्या घरापासून दुरावला आहे आणि चंद्राच्या आश्रयाला विसावला आहे. परंतु हे विसावणे तिच्यावर अत्याचार करण्यासाठी नव्हेतर तिला मदत करण्यासाठी, तिचे जगणे सावरण्यासाठी. दिनेश नावाचा मुलगा आहे, जो आईच्या या वागण्याचा तिरस्कार करून दूर राहतो. यात त्याची होणारी कुचंबणा वेगळीच. चंद्रा, चंद्राची आई लाखाबाई, बापू आणि दिनेश यांच्याभोवती गुंफलेले हे कथानक. परंतु रखमा, तारामती, शांताबाई आहेत, तशा पारू, सपना, मुन्नी, आऊसाहेब या व्यक्तिरेखा आहेत. या प्रत्येकीच्या जगण्याला वेगवेगळे परिमाण आहेत, कंगोरे आहेत. यात येणारी पुरुषी व्यक्तिरेखा या समाजाच्या वासना, ढोंगीपणा आणि फसवणुकीने करणारे शोषण, यांचे ते प्रतिनिधीत्व करतात.

एका वाक्यात सांगायचे तर देहाच्या व्यापारात सापडलेल्या एका रूपवतीची ही कहाणी आहे. जी तनाने सुंदर आहे तशी मनाने. परंतु हे सुंदरपण टिपले जाणे सुद्धा तितकेच सुंदर झाले आहे, ते लेखकाच्या संवेदनशील लेखणीमुळे. विषय जितका नाजूक तितकीच नाजूकपणे त्याची वीण विणलेली आहे. कुठेही त्याचा धागा उणा पडून ही वीण न्यून करण्यात धजावलेला आहे, असे आढळत नाही. नाजूकपणाचाही एक तोल असतो आणि तो तितकाच सक्षमपणे सावरून धरावा लागतो. तोल बिघडला तर ती संपूर्ण कलाकृतीच बेडौल होण्याची शक्यता असते. परंतु लेखकाने यासाठी आवश्यक असणारे सर्व कौशल्य पणाला लावलेले दिसून येते. केवळ एका वारांगनेची कलाकृती आपल्याला वाचकांच्या समोर ठेवायची आहे, असा अल्पहेतू यात नाही. हेतू आहे तो असे जगणे ज्यांची अपरिहार्यता ठरलेली आहे, त्यांच्या मनाचा वेध घेणे, त्याला तपासून पाहणे, त्या मनाची वाचा फोडणे. ही दबलेली मनाची वाणी लेखकाने अतिशय संयमाने, कुशलतेने आणि तितक्याच संवेदनशीलतेने वाचकांच्या समोर उजागर केली आहे. यातली जागोजागी आलेली वाक्ये वाचताना याची प्रचिती येते. ही प्रचिती तत्वज्ञानाच्या सूत्रांना स्तब्ध करते. लेखक पुरुष असूनही एका स्त्रीच्या अंतःकरणाला इतक्या खोलवर जाऊन तळ शोधू पाहते, हे लेखक म्हणून अचंबित करणारे आहे.

सतीश भावसार यांनी अतिशय देखणे मुखपृष्ठ या पुस्तकाला दिलेले आहे. शीर्षक, आशय आणि संगती यांचा रम्य असा मेळ साधला आहे.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

**नाही फिरलो माघारी**
**मोहन शिरसाट**




**नाही फिरलो माघारी**

मी कविता का लिहितो? असा प्रश्न कवीला विचारणे तसे अवघड असते. परंतु कवीलाच या प्रश्नाचे उत्तर ठाऊक असेल तर सगळे प्रश्नच निरुत्तर होतात. मोहन शिरसाट त्यांच्या मनोगतात या प्रश्नाचे उत्तर स्वत: देतात आणि आपल्या कविता लेखनाची प्रेरणा वाचकासमोर मुक्त करतात. ही प्रेरणा शोषणऐवजी कल्याणाची. असमानतेच्या भिंती गळून पडण्याची, शेतकरी–कष्टकरी–श्रमिकांच्या घामाची सन्मान करण्याची, संघर्षाला सम्यकतेची धार येण्याची, यातून हेही स्पष्ट होते. बऱ्याचदा लेखक कुठलीही भूमिका न घेता लेखन करतात. परंतु मोहन शिरसाट हे भूमिका घेऊन लेखन करणारे कवी आहेत. अशी ठाम भूमिकेचा पाया मजबूत असणाऱ्या कवीला कधी त्याच्या भूमिकेपासून माघारी फिरण्याचा प्रश्नच येत नाही. आणि तेच त्यांनी आपल्या कवितासंग्रहाला शीर्षक बहाल केले आहे, 'नाही फिरलो माघारी.'

मोहन शिरसाट यांची एकूण कविता कशी आहे याविषयी डॉ. महेंद्र भवरे यांनी अतिशय समर्पकपणे नोंद केली आहे, 'आजच्या काळाची दुखरी नस' नेमकेपणाने पकडणारी ही कविता आहे.' या विधानाचा प्रत्यय त्यांची कविता वाचत असताना पदोपदी येतो. समाजात असलेल्या भेदाभेदाच्या ओझ्याखाली एक समाज पूर्णपणे दाबला गेला, त्याचा कोळसा झाला, जसा मातीच्या उच्च दाबाने जमिनीखाली गाडले गेलेल्या जंगलाचा कोळसा होतो. ही शोकांतिका आजही थांबलेली नाही. म्हणून शोषिताने कायम दाबून राहावे हे कवीला मान्य नाही. कोळसा ही ज्वलनशील आहे तसा हिऱ्याचा गर्भही याच कोळशाच्या गर्भाशयात असतो. तुम्ही या हिऱ्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, असा इशाराच या कवितेतून कवी देत आहे.

सण म्हटला की सगळीकडे आनंदाला उधाण आलेले असते. त्याचे साजरेपण तर डोळ्यांची पारणे फेडणारे असते. परंतु त्याचवेळी एक वर्ग असाही असतो की, जो आंब्याचे डहाळे विकायला घेऊन बसलेला असतो त्या दिवशी अपेक्षा हीच की किमान त्या दिवशी तरी काही हाती येईल. ही आस म्हणजे 'पोटाशी उगवलेली अवस' जिच्यासाठी रात्ररात्र जागं रहावं लागते. श्रम करावे लागतात. दोन स्तरावर असणारा हा सण कवीला पूर्वीही दिसत होता आणि आजही ते चक्र बदलले नाही, ही खंत डोळ्यांत दुखरे अंजन घालणारी आहे.

शेतकऱ्याची अवस्था हा असाच संमातर विषय. राबराब राबायचं आणि आशा लावून बसायचं तेव्हा हातात काहीच उरत नाही. एकतर पाणी पावसाचा भरवसा नाही. जे पिकेल त्याला बाजारात भाव नाही. अशावेळी कवी लिहितो, ''त्यातलं त्याच लागते जिरायला, पीकच खाऊन टाकते पिकाला.''

आपला समाज, आजचे वास्तव हे जीवाची तगमग करायला लावणारे जगणे आहे. यात जितके–आत शिरावे, तितके दाहक अनुभव वाट्याला येतात, त्यांची दाहकता ही कोंडून टाकणारी, प्रचंड घुसमट करणारी आहे. अंगाची लाहीलाही व्हावी, आत ठासून भरलेली वाफ रटरटत राहावी असे वारंवार जाणिवांवर प्रहर होत आहेत.

कधी थांबणार हे सारे अशी अगतिकता यातून पुढे येते, जे आजुबाजूला दिसत आहे तेच घरात दिसत आहे. डोळ्यांत स्वप्न घेऊन आपल्या लेकरांना कुशीत घेणारी माय ही कुणा एकाची माय राहात नाही. ती सगळ्या करपलेल्या जीवनाचे प्रतिनिधित्व करते.

''तू भाकरी थापताना शेकून घेतलंस स्वत:ला चुलीवर
मीठ मिरच्यांचं आयुष्य वाटून घेतलं पाट्यावर

तीच गत बापाची. राबराब राबणारा बाप, यंत्रमानवा–सारखा झाला, सगळ्या भावनांना कोंडून मुलांच्या स्वप्नासाठी झिजत राहिला. त्याच्याविषयी कवी लिहितात,

तू अंगावरच्या चिंध्यात आमच्या भविष्याच्या स्वप्नाचं धन लपवलंस
ओझं उन्हाचं दडवलंस अन आम्हाला घडवलंस
म्हणून आमच्या आयुष्याचं सोनं झालं.

शेतात राबणारा भाऊ, पोटातल्या नाळेच्या भुकेचा निबरपणा हातात उतरलेला लंगोटीयार, हे सगळेजण आप्त वाटतात, परंतु डोळसपणे पाहिले तर अवतीभोवती प्रत्येकाचा बा, माय, भाऊ, लंगोटीयार हे आपलेच असतात. स्त्रीवर अत्याचार करणे हा जणू पुरुषत्वाचा अधिकार समजणारा वर्ग, पिडितेचा आक्रोश कधी समजून घेणार आहे की नाही. तिला मन, भावना असतात याची जाणीव सजग ठेवणार आहे की नाही? एकाच मातीची लेकरे असूनही आपसात दरी का? जातीपातीच्या भिंती कधी तुटणार आहेत की नाही? असे प्रश्न कवी वाचकांसमोर ठेवतात. खैरलांजी, फुलन, बोधिवृक्ष, बाबासाहेब, पाणी, स्वप्नाळू मुलगी अशा अनेक कविता आहेत, ज्या अंतर्मुख करतात.

मोहन शिरसाट हे आश्वासक कवी आहेत. जे दिसतं त्याचा भेद करून नवीन काही सकारात्मक रुजेल असा आशावाद व्यक्त करतात. त्यांच्या व्यक्त होणाऱ्या भावना या जिवंत माणसाची नाळ तपासून पाहतात. संस्काराच्या नावाखाली जे चाललं आहे त्याचा भेद करून पाहतात. विषयाविषयीची जाण आणि भान असलेला हा कवी आहे. त्यांच्या कवितेत उद्याची बिजे आहेत. कसदारपणाची देण त्यांना लाभलेली आहे. त्यामुळे उद्याचा कवी असे मोहनचे नाव निश्चित सांगता येईल.

मुखपृष्ठ आणि आतील रेखाटने ही कवितासंग्रहाला साजेशी झालेली आहेत.

**मूल्य १३० रु.   सवलतीत ८० रु.**




# ग्रंथपान

**हरवलेल्या कवितांची वही**
**संजय कृष्णाजी पाटील**




**भान हरवलेल्या वर्तमानाविषयी**

एक कवितेचे पुस्तक जरासे निवांतपणे हातात घेतले. सहज नजर टाकावी, काय आहे कवितेत, ते पहावे असा माफक आशावाद. मध्येच पान उघडले, 'रुढीबाज ढोलांचं कातडं' ही कविता हाताशी आली. वाचताना एका ओळीशी ठेचकाळलो, 'अगोदरच अंधार करून ठेवला की मग उजेडाला नाकारण्याचं पाप मस्तकी नको' ही ती ओळ आणि तिला जोडून शेवटची ओळ आली, 'बाकी दाभोळकर बिभोळकर भाडमें गए साले सब.' मन कावरेबावरे झाले. वास्तवाच्या जाड कातड्याने पार कवेत घेऊन जीव जाईपर्यंत गुदमरून टाकल्यासारखे वाटायला लागले. कुठे आहोत आपण? काय चालले आहे आपल्या आजूबाजूला? आणि या सगळ्याचे आपण एक भाग आहोत, डोळ्यांवर पट्टी बांधून जगणारे. चट्‌कन कवी आणि कवितासंग्रहाचे नाव पाहिले. संजय कृष्णाजी पाटील हे कवी आणि कवितेचे नाव सापडले, 'हरवलेल्या कवितांची वही'.

संजय पाटील यापूर्वी अनेकदा भेटलेले, वेगवेगळ्या रूपात लेखक, कवी, दिग्दर्शक, नाटककार, चित्रपटाशी जोडलेला. नुकताच 'लेझीम खेळणारी पोरं' हा कवितासंग्रह वाचलेला होता तोही नजरेसमोर उभा राहिला. वास्तवाला भिडणारा, संवेदनशील मन असलेला, कलेची उत्तम जाण असलेला, अभिरुचीसंपन्न कवी त्याचवेळी मनात घर करून राहिला होता. लेख, समीक्षा आणि कथा असा त्रिमिती असलेले पुस्तकही वाचलेले होते. त्यातून त्यांच्या जाणिवा, नेमकेपणा, भवताल टिपण्याची वेगळी आरपार दृष्टी प्रत्ययास आली होती. त्यामुळे 'हरवलेल्या कवितांची वही' कवितासंग्रह जागरूकपणे वाचायला घेतला. वाचत–वाचतच राहिलो आणि शेवटी बधीर झाल्यासारखा सुन्नपणे बसून राहिलो. हे सारे काय काय वाचले आपण... कवितेतून हे मांडता येऊ शकते? एक प्रचंड असा कोलाज नजरेसमोर उभा राहिला. अनेक मिती, प्रतिमा, प्रतिबिंबे, त्याचा गडद करडा रंग, कधी मातीत थिजलेल्या रक्तासारखा तर कधी मातीतून उगवून आलेल्या दगडफुलासारखा. सुंदर लखलखते चांदणेमहाल पाहत असताना मध्येच स्वत:च्या अस्तित्वाला पुसत जाणारी उल्केची रेष दिसावी, कधी बहरलेल्या ताटव्यात आडदांड सांडाने हैदोस घालावा. एक, अनेक... कविता, कविता आणि कविताच, काय लिहिलेय संजय पाटील यांनी!

पुन्हा पुन्हा कवितेच्या ओळी मस्तकावर प्रहार करीत असल्याचा भास होत राहतो. 'सैतान तुझ्या आत्म्याला चिरशांती देवो' या कवितेत एका भीषण वास्तवाला पुढे ठेवतात, ''जेवढ्यांना आजपर्यंत बॉम्बस्फोटांमध्ये उडवलेस त्यांच्या गंगाभागीरथी विधवा माऊलींचे काय?' दहशतवाद्यांना जात नसते म्हणतात, त्यांना मनही नसते, जे घडते त्याच्याशी त्यांचे कुठलेच नाते नसते. परंतु ज्यांचे जळते त्यांचे काय? हा प्रश्न केवळ दहशतवादाचा नाही, तो आपल्या सगळ्यांचा आहे. त्याकडे आपण कोणत्या नजरेने पाहत राहणार आहोत?''

शेतकऱ्यांचा प्रश्न असाच, वारा 'अनाथ' वेश घेऊन वावरतो आहे आणि ढगांचा पत्ता नाही. पंचक्रोशीत पाणी नावाचं गाव नाही. शासकीय संवेदना तर वेगळ्याच पातळीवर असलेल्या. कोरड्या सहानुभूतीचा पाझर दाखवत अडचणींचा डोंगर उभा करणाऱ्या. त्याच त्याच चक्रात फिरत राहणाऱ्या. कुणालाच कुणाचे सोयरसुतक नसावे. साध्य महत्त्वाचे. साधन कसलेही असो विकृत स्वरूपाचे, अशी आजची परिस्थिती. बेगडी स्वरूपाची. जिथे फुलपाखरेच स्वत:वर हद्दपारीची वारंट बजावत आहेत. मूल्यांचा ऱ्हास, स्वत:पुरते पाहणारे जग, बांधिलकी वाऱ्यावर सोडून जगण्याची वृत्ती त्यामुळे आपसातला संवादच हरवला आहे असे चित्र सर्वत्र दिसत आहे. अशा परिस्थितीत कवीला प्रश्न विचारला जातो,

असे संवेदना हरपून बेशुद्धावस्थेत जगायचे
होते तर मुळात कवी म्हणून जन्मालाच का
आला मित्रा?

या संग्रहात असलेल्या कवितांची विभागणी तीन भागांत केलेली आहे, 'लेझीम नंतरच्या कविता', 'हरवलेल्या कवितांची वही' आणि 'आई गेल्यानंतरच्या कविता'. आईंचा कलासक्त संस्कार कवीवर आहे. त्या संस्कारांची धुळाक्षरं या कवितांमधून हळुवारपणे गिरवलेली आहेत. तीन भागातील या कविता वेगवेगळेपण लेवून आलेल्या आहेत. हे वेगळेपण त्यांच्या शीर्षकांमधून सुद्धा व्यक्त झालेले आहे. समाज, व्यक्ती, प्रशासन, बळीराजा, आई अशा विविध विषयांना कवीने कवितेतून व्यक्त केले आहे. यातील अनेक कवितांना स्वत:चा ताल आणि लय आहे. त्यात उपहास, विरोधाभास, टोकाचा थेटपणा आहे. तसा सयमसुद्धा आहे. परंतु या सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यातले काव्य कुठे विसरले जात नाही. 'आभाळपाडवा', 'जन्मनागवा', 'अवसमिठी', 'ढगबळ', 'कर्मभेगा', 'रानभैरी', 'प्रलयपिंगा' असे अनेक नवे शब्द ही कविता देते. कविता नुसतीच प्रहार करीत नाही तर जगण्याचा सकारात्मक प्रदेशही दाखवत जाते. खरेतर या संग्रहातील कवितांचा आवाका पाहिल्यानंतर प्रत्येक कवितेचा स्वतंत्रपणे समीक्षा आस्वाद घ्यायला हवा, इतकी ताकद या कवितेत आहे.

डॉ. प्रभा गणोरकर या ज्येष्ठ कवयित्री आणि समीक्षक यांची प्रस्तावना आणि सतीश भावसार यांचे मुखपृष्ठ व मांडणी या पुस्तकाला लाभलेली आहे.

**मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**

# ग्रंथपान

**हिंदुस्थानी रागदारी संगीतातील सुवर्णयुगाचे मानकरी**
**रमेश वाघमारे**




### कस्तुरीसारखा अमूल्य ठेवा

'हिंदुस्थानी रागदारी संगीत' हा एक अमूल्य ठेवा आहे, कस्तुरीसारखा. या संगीताचा काळाविषयी आणि त्याचे असलेले मानकरी, यांच्याविषयी कुतूहल आणि अभिमान नसलेला माणूस हिंदुस्थानी असू शकत नाही. किराणा, जयपूर, इंदोर, मेहर अशी प्रस्थापित घराण्याची घरंदाज परंपरा, तानसेनपासून किशोरी आमोणकर यांच्यापर्यंत असलेले मोजकेच परंतु अस्सल घरंदाज दिग्गज. त्यांचा ताल, ठुमरी, ख्याल, बंदिश, आलापी, जोड, झाला यांच्याशी असलेला आंतरिक संबंध. सगले काही और म्हणावे असे. या सगळ्यांची ओळख असणारा दर्दी, रसिकवर्गही आगळावेगळाच म्हणावा लागेल. ज्यांना यात गती आहे, नुसता 'सा' स्वर कानावर पडताच ज्यांच्या चित्तवृत्ती उसळून येतात, असे कानसम्राट वेगळेच. यात एक आहेत डॉ. रमेश वाघमारे रसिक, संगीतप्रेमी, संगीतावर निरलस प्रेम करणारे, मैत्रिणींना हजेरी लावणे इतकेच नाहीतर त्यांचे आयोजन करणे, या दिग्गजांची खातीर करणे, यातही रस असणारे डॉ. वाघमारे, संगीताचे चाहते, या क्षेत्रातल्या मान्यवर दिग्गजांचे चाहते, प्रसंगी आश्रयदाते असलेले डॉ. वाघमारे उच्चविद्याविभूषित असून, परदेशस्थ भारतीय असून, संगीताचा झरा त्यांनी अखंड प्रवाही ठेवलेला आहे. तसे ते भाग्यवानही म्हणायला हवेत. संगीताचा केवळ ध्यास जोपासला नाही, तर या दिग्गजांचा सहवास देखील त्यांनी अनुभवलेला आहे. नातेसंबंध असावा इतका घनिष्ट स्नेह जोपासला आहे. प्रत्यक्ष त्यांचे अनुभव, प्रसंग, जीवनक्रम समजून घेण्याची संधी लाभली आहे. आणि त्यातूनच 'सुवर्णयुगाचे मानकरी' हा ग्रंथ साकारला आहे. हा केवळ ग्रंथ नाही तर तो हिंदुस्थानी रागदारी संगीताचा सुवर्णकाळ उभा करणारा दस्तऐवज म्हणता येईल. हा काळ अनुभव आणि अनुभूतीवर आधारलेला आहे. प्रत्येक हिंदुस्थानी संगीतप्रेमी, रसिकासाठी मोठा खजिनाच म्हणता येईल. हे युग हा ग्रंथ वाचत असताना साक्षात नजरेसमोर उभे राहते. तो राग, त्याचे सादरीकरण, सादर करणारी विभूती, एका सुंदर जगात सोबत घेऊन जाते. हा अनुभव प्रत्येकाच्या वाट्याला यावा असे हे लेखन आहे. त्या त्या कलाकाराची खास बैठक व्यक्त करणारी, त्यांच्या निष्ठेची, रियाजाची आणि संगीतावरील अकलंकित प्रेमाची, ध्यासाची महती प्रत्येक पृष्ठावर उलगडत जाणारे लेखन आहे. एखादी बैठक, जमून गेली असे. शेवटी श्रोते सांगतात, तसे जमून गेलेले हे लेखन आहे, असे वाचून झाल्यानंतर वाटत राहते.

एकूण चोवीस दिग्गज कलावंतांवरील हे लेख आहेत. प्रत्येकाविषयी भरभरून लिहिलेले आहे. जन्मापासून ते उच्च स्थानावर विराजमान होईपर्यंतचा हा थक्क करणारा आहे. पं. भीमसेन जोशी, पं. रविशंकर, पं. जसराज, उस्ताद बडे गुलाम अली खाँ, भारतरत्न बिस्मिला खाँ, झाकीर हुसेन, कुमार गंधर्व, किशोरी अमोणकर, पं. शिवकुमार शर्मा, प्रभा अत्रे, पं. हरिप्रसाद चौरसिया, सौ. मालिनी राजूरकर, उस्ताद अमजदली खाँ, पं. वसंतराव देशपांडे, पं. विश्वमोहन भट, पं. रामनारायण, गंगुबाई हनगल, सुलतान खान, उस्ताद अमीर खाँसाहेब, अन्नपूर्णा शंकर, पंडित गिरिजादेवी आणि केसरबाई ही ती दिग्गज मंडळी आहेत. आपापल्या क्षेत्रात कलेचा अमीर असा ठसा उमटवलेली. या प्रत्येकाच्या नावाअगोदर लेखकाने खास बिरुदावली बहाल केलेली आहे. भारताचा विसाव्या शतकातील तानसेन, विश्वसंगीताचा प्रणेता, शहनाईनवाझ, तबलानवाझ, आफताब-ए-सितार, गानसरस्वती, स्वरमयी गानपंडिता, सारंगीचा अखेरचा सूर, सारंगीचे सुलतान, विराणी, छन्दोवती. या विशेष बिरुदावलीने त्या त्या कलावंताची खरी पारख वाचकांसमोर ठेवली आहे, रत्नपारखीसारखी.

लेखकाला संगीताची उत्तम जाण असल्याची उदाहरणे प्रत्येक लेखात पदोपदी आढळतात. यमन, शुद्ध यमन, शुद्ध कल्याण, मियाँमल्हार, हिंदोल-बहार, भूप, मालकंस, शुद्धसारंभ अशा अनेक रागांविषयी वाद्यावरील बोलाविषयी ते सहजपणे टप्पे उलगडून दाखवितात. त्यांचे वेग आरोह-अवरोह, वेळा याविषयी सांगतानाच तो तो प्रसंग कसा भावला, त्याचे वर्णन त्यांनी केले ते, वाचताना, संगीतश्रोता कसा असावा, याची मूर्तिमंत जाणीव संचारत जाते. उस्ताद झाकीर हुसेन यांच्याविषयीचे उदाहरण पहा, 'झाकीरचे तबल्यावर थैमान सुरू झाले. ढगांच्या गडगडहाटासारखा रौद्र आवाज काढत, मधूनच डग्यावर 'घु' असा छतापर्यंत आवाज घुमवीत व शेवटी शंकराच्या डमरूसारखा टणत्कार करत तो विद्युल्लतेच्या वेगाने असा काही समेवर आला की, श्रोत्यांनी हर्षभराने टाळ्यांचा कडकडाट केला.'

साक्षात बालाजी-भगवान विष्णूचे संगीतसाधनेमुळे दर्शन झालेले. शहनाई-नवाझ भारतरत्न बिस्मिल्ला खाँ म्हणतात, ''संगीतातील सात स्वर व पाच वक्री स्वर ही माझी प्रार्थना (नमाज) आहे. शहनाई माझी कुराण आहे. संगीत हेच संसारातील एकमेव सत्य आहे.''

लेखकाची भाषा संगीतासारखीच मंत्रमुग्ध करणारी आहे. तिला नाद आहे, वेग आहे आणि तितकीच अनुभूतीसंपन्न आहे. त्यांचे हे लेखन म्हणजे संगीतप्रेमी माणसांसाठी जतन करून ठेवावा असा ठेवा आहे. प्रत्येकाने तो आपल्या संग्रही ठेवावा इतका उत्तम आणि तितकाच मौल्यवान आहे. आणखी संदर्भ व वेबसाईट दिल्याने त्यात मोठी भर पडली आहे. प्रदीप म्हापसेकर यांनी अतिशय सुंदर मुखपृष्ठ बहाल केले आहे. प्रत्येक कलावंताची भावमुद्रा तरलपणे टिपलेली आहे. त्याकडे पाहतानाच सर्व सूर सजीव झाल्यासारखे आपल्याभोवती रुंजी घालू लागतात.

**मूल्य ३५० रु.   सवलतीत २१० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**परिमळामाजि कस्तुरी**
**डॉ. सिसिलिया कार्व्हालो**




**परिमळाचा कोश**

'सुखा-समाधानानेच जीवनाला पूर्णत्व येते असं नाही. दु:खवेदनांनीदेखील जीवनातील या जीवनाचे पूर्णत्व जोखता येते. शून्यातून जसे आपण विश्व निर्माण करू शकतो, तसेच आपण आपल्या स्वत:ला शून्यावर नेऊन ठेवले तर खऱ्या अर्थाने आपण 'पूज्य' झालेलो असतो. विश्वाचा आकार शून्यासारखाच आहे म्हणून तर विश्व, सृष्टी सौंदर्याने ठासून भरलेले आहे.' (८२)

'परिमळामाजि कस्तुरी' हा लेखसंग्रह डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांचा; नुकताच 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेला. हाती घेतला आणि 'वाचत सुटलो' अशी अवस्था झाली. हे लेख 'सकाळ'मध्ये वर्षभर सलगपणे प्रकाशित झालेले आहेत. त्यांचा आकार त्यामुळे छोटेखानी म्हणता येईल असा परंतु वाचत असताना आकारमान लक्षात येतच नाही. लक्षात येतो तो आवाका. लेखिकेचे वाचन, अभ्यास, चिंतन, दृष्टिकोन आणि त्यातली तरलता. यामुळे हा संग्रह कधी वाचून झाला हे कळत नाही, परंतु त्यातली कस्तुरी त्यानंतरही आपल्या मनाच्या गाभाऱ्यात दरवळत राहते. लेख वृत्तपत्रीय स्वरूपाचे आहेत म्हणजे रकाने पूर्ण करण्यासाठी लिहिलेले आहेत, असे अजिबात नाही. एक सकारात्मक दृष्टिकोन समोर ठेवून जे-जे उत्तम देण्याचा हा प्रयत्न आहे. आणि तो पूर्णपणे यशस्वी झालेला आहे याची प्रचिती हे लेख देतात. तसेच वेगळे काही सकस असे वाचनात आले याचे समाधानही देतात.

डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांचा प्रथम परिचय आहे तो कवयित्री म्हणून 'उन्मेष', 'अंतर्यामी', 'सूर्य किरणात आला', 'पंख', 'दारातल्या रांगोळीचे रंग', 'माणूस उकरून काढावा लागतोय' हे त्यांचे कवितासंग्रह. याशिवाय 'ललित गद्यसंग्रह', 'कथासंग्रह', 'संशोधनात्मक', 'चरित्रात्मक', 'आस्वादनपर', 'बालवाङ्मय, संपादन, अनुवाद असे विविधांगी विपुल लेखन त्यांनी केलेले आहे. मराठी साहित्यविश्वात स्वत:चे अढळ असे स्थान निर्माण केलेले आहे. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण लेखनामुळे त्यांचे लेखन इतरांहून वेगळे असते, हे विधान एक वाचक म्हणून ठामपणे करता येते.

'मूलकंद' या लेखात नजिम हिकमत यांची नज्म दिलेली आहे. जी आपल्याला अंतर्मुख होऊन विचार करायला प्रवृत्त करते. लॉर्ड इमर्सनचा संदर्भही खूप रम्य म्हणावा असा आहे. तो निसर्गाला परमेश्वराचं हस्ताक्षर समजतो. रवींद्रनाथ टागोरांचं उदाहरण समोर ठेवून लेखिका लिहितात, 'एखाद्या छोट्याशा गोष्टीचा अर्थ इतरांनी कोणी सांगण्यापेक्षा जेव्हा स्वत:ला कळेल, तेव्हा 'जीवन कळले हो' असं म्हणता येईल.

'यशाचं गमक' हा लेख 'द मंकी इ सोल्ड हिज फेरारी' या रॉबिन शर्मा लिखित कादंबरीचा संदर्भ घेऊन साकारलेला आहे. जुलियन हा नायक, स्वत:चे सत्त्व शोधण्यासाठी सर्व ऐहिकतेची पुटे खरवडून टाकतो. आणि ते प्राप्त झाल्यावर जे तेज आयुष्यावर पसरते, ते ध्येयाचे, यशाचे गमक असते. स्टिव्ह जॉब्स, मार्क झुबेर यांची स्वयंप्रकाशाची उदाहरणे पाच लेखांत येतात.

'सेल्फी'ची तर आता लाटच आलेली आहे. त्यावेळी जे हावभावांचे प्रदर्शन होते त्याविषयी आचार्य अत्रे यांचे वाक्य लेखिका देतात, 'अतिशयोक्तीशिवाय आपल्याला आपल्या वास्तवाची कल्पनाच करता येत नाही.'

'देखणे ते चेहरे' हा लेख तोंडावर स्कार्फ बांधून फिरणाऱ्या प्रत्येकीने वाचायला हवा. 'पेनिलोपी' या चित्रपटाचा संदर्भ आणि त्यातील नायिकेचे हिचे स्वत:विषयीचे ठाम मत वेगळा विचार देऊन जाते. बा.भ. बोरकर यांच्या कवितेच्या ओळी देत लेखिका लिहितात, 'आपल्या चेहऱ्यावरील लावण्यापेक्षा अंत:करणातील लावण्यरेखा ज्याला ओळखता आली, त्याचे सौंदर्य वर्णन करण्यास शब्द स्वत:च धावून येतील आणि तळहातावर झेललेल्या दवबिंदूत स्वत:ला न्याहाळू लागतील.'

'मूल्य' लेखात सोने, हिरे, मोती यांच्याशी तुलना करताना लेखिका भान जागे करतात, ''हव्यासापायी सर्वस्व गमावू नका. डोळसपणे भवताली पहा आणि वागणे असे असावे की, आयुष्याला सोन्याचं मूल्य प्राप्त होईल. त्यातून मिळणारे समाधान आणि सार्थकता कुठल्याही धनापेक्षा अधिक असेल.''

'ठिबकसिंचन' हा लेख आजच्या भीषण क्रौर्यावर भाष्य करतो. जालियनवाला बाग, नौखाली येथील हत्याकांडाने जणू ईश्वरावरच मात केली. आजही हे प्रकार सतत घडत आहेत. याविषयी अनेकांनी लिहिले, परंतु लेखिका आणखी वेगळा विचार मांडतात. हे सततचे रक्तपात म्हणजे पृथ्वीवर होणारे रक्ताचे ठिबकसिंचन आहे का? तसे असेल तर कोसळणारा पाऊस, वाहणाऱ्या नद्या हे निसर्गाचे अश्रू तर नव्हेत?

लेखांमध्ये कविता, सिनेमा, कादंबरी, व्यक्ती, तत्त्वज्ञान यांचे संदर्भ आलेले आहेत. प्रत्येक लेख या संदर्भांनी सजवलेला आहे. तोही चपखल, तरल आणि विचारपूर्वक, जसा सुंदर कलाकुसर केलेला गोफ हिरे-माणकांनी गुंफून सजवावा. लेखिकेच्या मांडणीत सहजता आहे, भाषेवर पकड आहे. कवीमन सतत जागृत आहे. या लेखसंग्रहाच्या शीर्षकावरूनही त्याची प्रचिती येते. प्रत्येक लेखही त्याची साक्ष देतो. एक सुंदर परिमळाचा कोश वाचकांच्या हाती दिला यासाठी लेखिका आणि प्रकाशक यांना धन्यवाद!

सतीश खानविलकर यांनी सुरेख मुखपृष्ठ या संग्रहासाठी दिलेले आहे. सागराच्या तळाशी असलेले बहुविध मोती असावेत, तसे आशयाचे मोती त्यांनी नेमकेपणाने मुखपृष्ठाला दिलेले आहेत.

**मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**

# ग्रंथपान

**नैतिक–अनैतिक**
**अर्जुन जगधने**



**फरक बिंब आणि प्रतिबिंबातला**

''जगाच्या पाठीवरील कोणत्याही देशात 'नैतिकता' ही संकल्पना अगदी प्राथमिकतेने आणि स्पष्टच सांगायचे, तर समजुतीच्या प्राथमिक पातळीवर स्त्रियांशी जोडली गेलेली दिसते. खरे तर नैतिकता ही व्यापक मूल्यसंकल्पना आहे. माणसाच्या जगण्यातील जवळपास सर्वच अंगामध्ये तिची स्वत:ची अशी एक जागा आहे, तिचे सर्वात जवळचे नाते केवळ आणि केवळ सत्याशी आहे. सत्य काय आहे आणि समोर काय येते किंवा ठेवले जाते किंवा ठेवावे की नाही याबाबत संभ्रम निर्माण होतो. यातल्या फरकावर, अंतरावर ती कृती नैतिक आहे की अनैतिक हे ठरत असते.'' 'नैतिक–अनैतिक' याविषयी प्रतिमा जोशी यांनी व्यक्त केलेले हे मत आहे.

'नैतिक–अनैतिक' हा अर्जुन जगधने यांचा कथासंग्रह 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेला आहे. यात एकूण आठ कथांचा समावेश आहे. या कथा एक सूत्र घेऊन आलेल्या आहेत किंवा असेही म्हणता येईल. एका सूत्राने या कथा गुंफलेल्या आहेत. हे सूत्र आहे नैतिक–अनैतिकतेचे. नैतिकता आणि अनैतिकतेचा संबंध अनेक अंगांनी तपासता येतो. खोटे बोलण्यापासून, खोटा मुखवटा धारण करून वागण्यापर्यंत, सोज्ज्वळतेच्या नावाखाली अनेक पातळ्यांवरील चळवळी उभ्या करायच्या आणि कार्यकर्त्यांनी त्याच सोज्ज्वळतेला पायी तुडवायचे. यातला अखेरचा टप्पा येतो तो विवाहसंस्थेच्या, परंपरेच्या रितीरिवाजांना झुगारण्याचा. यात स्त्री आणि पुरुष हा भेदही आपोआप गळून पडलेला दिसतो. या कथा वाचताना हे सगळे वातावरण गडद झालेले दिसते. संघटनात्मक कामाच्या चळवळीत एकत्र आलेले धनंजय आणि सुमित्रा जीवनसाथी म्हणून विवाहाच्या बंधनात गुंफले जातात, परंतु पुढे चळवळ बाजूला ठेवून धनंजय वेगळ्या टप्प्यावर येऊन उभा राहतो. सुमित्रा त्याच्यापासून दूर होण्याचा निर्णय घेते तेही संजयचा आधार सापडतो तेव्हा. संजय, राजन, धनंजय, अनिता आणि सुमित्रा या व्यक्तिरेखा 'नैतिकता' या कथेत भेटतात. त्यांचे वैचारिक तत्त्व आणि भावनिक विश्व या नैतिकतेभोवती गुंफलेले आहे.

'निष्ठा' या कथेतील कालिंदी विज्ञानाचे या विषयीचे अध्यापन करते. विज्ञान, त्याची उपयुक्तता, अस्तित्व, दृष्टिकोन याविषयी मनात कुठे शंका नाही; तरीही देवदर्शन, बुवा, बाबा यांच्याविषयीच्या आस्थेला आस्थेवाईकपणे स्वीकारते. यात पुन्हा श्रद्धा–अंधश्रद्धांचाही समावेश आहेच. अगदीच उदाहरण द्यायचे तर, पाळी असताना संभोग नको, याचे. अशा विज्ञान आणि अंधश्रद्धा यांच्या परिघात सापडलेल्या कालिंदीची ही कथा द्वंद्वाला छेद देत सकारात्मकतेकडे झुकते.

'रौप्यमहोत्सव' ही नारी मंच आणि त्यांचे कार्य याविषयीची तळमळ दाखविणारी कथा. निष्ठेने एखादी संस्था पंचवीस वर्ष चालवणे किती खडतर असते, त्याचे उदाहरण म्हणजे रमा. सोबत असणाऱ्या सहकारी महिलांवरील अत्याचार आणि बुरसटलेले याविषयी तावातावाने मते मांडतात, परंतु त्यांचेच स्वत:चे आचरण त्याला छेद देणारे असते. यासाठी लेखकाने दोन वाक्ये दिलेली आहेत, 'त्याची लाईफ स्टाईल बदलली फक्त पण विचारांची स्टाईल तीच राहिलीय. मेल्या दगड–धोंड्यालाही लाजवतील.' 'मध्यमवर्गीय जाणिवाच्या पुढं जाणं जमणार नाही त्यांना. पोटातलं पाणीही न हलता परिवर्तन हवंय त्यांना. मोर्चे, आंदोलन आता त्यांना परवडणार नाहीत.'

हल्ली पुरस्कारांचा पूर आला आहे. ते कसे आणि कुणाला दिले जातात हे जगजाहीर होत नाही. परंतु मिळालेल्या व्यक्तीकडे पाहून त्याची कल्पना येते. सुधीरला असा पुरस्कार मिळतो तेव्हा त्याचीच पत्नी सुजाता विरोधात आवाज उठवते. परंतु तीच 'पुरस्कार' कथेतील सुजाता एका टप्प्यावर स्वत:कडे पाहते, तेव्हा तिच्या लक्षात येते की, आपण आपली अस्मिता हरवत चाललो असून केवळ पैसे कमावण्याचं आणि मुलं काढण्याचं मशीन झालो आहोत.

मल्हार आणि क्रांती हे स्वदेशी विचारमंच अंगी रुजलेले जोडपे खूप वेगळा विचार करणारे. परंतु पुढे व्यक्तिगत आयुष्यात मल्हार–रजनीनं एकमेकांना आयुष्याचे जोडीदार म्हणून निश्चित केले तर क्रांती मल्हारपासून कायमची विभक्त कधी होता येईल याची प्रतीक्षा करू लागली. अंकिता–नागेश, प्रभाकर–सोनल, प्रताप–संग्राम, अशा आणखी व्यक्तिरेखा या संग्रहात आहेत. अपेक्षा आणि त्यांचा भ्रमनिरास, प्रामाणिकता आणि प्रामाणिकतेचे ढोंग अशा दोन पातळ्यांमध्ये वावरणाऱ्या या व्यक्तिरेखा आहेत.

अर्जुन जगधने यांच्या या कथा निवेदनात्मक पद्धतीने आलेल्या आहेत. ज्या विषयावर आधारित कथानक पुढे जाते, तेव्हा प्रत्येक पायरीवरील पाऊल दमदार आणि पुढे जाण्यास बळ देईल असे टाकलेले आहे. विषयात व्यक्तिरेखांच्या मनाचा तळ शोधण्यासाठी ते सर्व बाजूने प्रयत्न करतात. त्याच वेळी सभोवतालचा समाज, त्यांचे व्यवहार याचेही चित्रण त्यात गुंफलेले आहे. समाजात वागताना माणूस कसा वागेल, बोलेल, त्याचे निरीक्षण लेखकाने फार बारकाईने केल्याचे दिसून येते. जी मते मांडली आहेत तीही स्पष्ट आणि निर्भीड आहेत. दोन्ही बाजू मांडण्याचा स्तुत्य प्रयत्न या कथांमधून दिसून येतो. त्यामुळे विषय पूर्णपणे न्याय दिल्यासारखा परिपूर्ण होतो.

प्रतिमा जोशी यांची सुंदर प्रस्तावना या संग्रहाला लाभली आहे. लेखकाचे मनोगतही विश्लेषणात्मक आहे. कथा समजून घेण्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरते. प्रकाश आणि काळोख यांच्या मितीची कल्पकता आशयाला थेट भिडणारी आहे. मुखपृष्ठाची ही मनोरम कल्पकता स्वत: लेखकाची आहे.

**मूल्य २०० रु.   सवलतीत १२० रु.**




# ग्रंथपान

## मानवी संस्कृतीचा अर्थ

**बी.जी. वाघ**



**आपणच आपल्याला समजून घेण्यासाठी**

'ईश्वर हा शिक्षा देणारा आहे. त्याच्या शिक्षेपासून वाचायचे असेल तर धर्म वा धर्मात्म्याला शरण गेले पाहिजे. देव आणि पापी माणूस यातील माध्यम म्हणजे हा धर्म आहे. तो ज्यूंचा, ख्रिश्चनांचा, महंमदाचा किंवा हिंदूचा असेल. मूळ कल्पना तीच आहे.''

''माणूस एकतर स्वत:ला छळतो किंवा दुसऱ्याला त्यात त्याला सुख वाटते. त्याची वैज्ञानिक कारणे अनेक असतील; परंतु धर्माच्या दृष्टीने त्याचे एकच कारण आहे ते म्हणजे पाप. 'ख्रिश्चन धर्माचा आरंभच मुळ पाप या संकल्पनेपासून होतो.'

सामान्य माणसे ईश्वराला, धर्मगुरूला, धर्मग्रंथांना घाबरतात हेच धर्मसत्तेचं बळ आहे.

ईश्वर, धर्म, पाप, जातीयता, बौद्धिकता, विषमता, भौतिकता, विज्ञान, भय, मृत्यू, मृत्यूनंतरचे जीवन, नीतिव्यवस्था, असा मोठा परीघ आहे. ज्याच्या केंद्रस्थानी आहे माणूस, मानव, मानवीसमूह याचे भयगंड, क्रूरता, सभ्यता, वर्चस्व गाजविण्याची प्रवृत्ती, अस्तित्व निर्माण करण्याचा, टिकवण्याचा ध्यास. यातून इतरांवर हल्ले, कत्तल, विध्वंस करून स्वत:चे सार्वभौमत्व निर्माण करणे, विजय मिळवणे, ही तीव्र लालसा. या सगळ्या संघर्षातून निर्माण होते ते संस्कृती, इस्लामिक संस्कृती या सगळ्यांच्या मुळाशी राज्यक्रातींची मशाल आहे. ज्यू, ख्रिश्चन, अरब हे त्यांचे प्रतिनिधित्व करतात. जगभर पसरलेल्या संस्कृती नावाच्या साम्राज्यात यांचा वाटा मोठा आहे. भारतीयांना भारतीयत्वाची ओळख झाली ती इंग्रज भारतात आले तेव्हा. या पूर्वीची आक्रमणे आहेत ती अरबांची. परंतु त्यापूर्वी भारतात बुद्धकाळाचे वर्चस्व होते, ज्याची शिकवण जगभर पसरलेली आहे.

या संस्कृतीचा जन्म संघर्षातून होतो तसा त्याचा ऱ्हासही होतो तो संघर्षातूनच. जसा लोकांचा विश्वास लोकशाहीवरून ढळला की तो भांडवलशाहीला जन्म देतो.

बी.जी. वाघ यांचे 'मानवी संस्कृतीचा अर्थ' हे पुस्तक 'ग्रंथाली'ने प्रकाशित केले आहे. वरवर पाहता ते वृत्तपत्रातून प्रकाशित झालेल्या लेखांचा संग्रह आहे, असे म्हणता येते. परंतु हे लेख वाचनात एकत्रित स्वरूपात समोर येतात तेव्हा त्यांची व्याप्ती 'शोधनिबंधा'इतकी मोठी भासते. मानवी संस्कृती आज आपण पाहतो, अनुभवतो ती किती वरवरची आहे, आपली समजही किती उथळ आहे, याची जाणीव हे लेख करून देतात. विषयाच्या मुळाशी जाणे म्हणजे काय, याची जिज्ञासा इथे पूर्ण होते. एक विषय किती अंगांनी तपासला जाऊ शकतो. त्याला असणाऱ्या पैलूंची संख्या किती पारदर्शी आणि परिमाणे लाभलेली असते. याचा प्रत्यंतर प्रत्येक लेख देतो. ५९ लेख यात आहेत. त्यांच्या शीर्षकावरूनही त्यांची वैशिष्ट्ये लक्षात येतात. 'सत्यासाठी मृत्यू', 'संघर्षाचा इतिहास', 'सुख आणि स्वातंत्र्य', 'बुद्ध-येशू', 'अपूर्णतेकडून पूर्णतेकडे', 'परिभाषा स्वातंत्र्याची' ही काही त्यातली शीर्षके.

मानवी मन तपासायचे तर त्यासाठी मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, इतिहास, विज्ञान यांच्या अभ्यासाची जोड असणे आवश्यक ठरते. नुसते धनुष्य मजबूत असून चालत नाही, विविध प्रकारच्या, क्षमतेच्या बाणांचा भाताही पाठीशी असावा लागतो, तेव्हा युद्धात पाय रोवून ठामपणे जिंकण्याच्या जिद्दीने उभे राहता येते. तो भाता लेखकाच्या पाठीशी आहे. प्रत्येक लेखात आलेली नावे ही तत्त्ववेत्ता, राज्यकर्ता, लेखक, वैज्ञानिक, यांच्या कर्तृत्वाची साक्ष देणारी आहेत. त्यांची पुस्तके, आचरण, तत्त्वे ही कुणाही संशोधक वृत्तीच्या अभ्यासकाला उपयुक्त ठरावीत अशी आहेत. लेखांची परिपूर्णता या संदर्भांनी शिगोशिग दिलेली आहे. त्यात आलेली उदाहरणे, अवतरणे टिपून ठेवावीत संदर्भ म्हणून अशी आहेत.

लेखकाकडे प्रगल्भता आहे. वैचारिक पातळीवरच्या श्रेणीची आहे. त्याला व्यासंगाची जोड आहे. लिहिणाऱ्या हाताला प्रतिभेचा स्पर्श आहे. येशूचे तत्त्वज्ञान, बुद्धाचे तत्त्वज्ञान ते जसे सहज सांगून जातात तसे स्वत:चेही तत्त्वज्ञान त्या ओघात लिहून जातात, जे वाचताना संपूर्ण लेख नजरेसमोर उभा राहतो. आपला भवताल, आजची परिस्थिती उभी राहते. खूप मोठा आवाका असलेले हे लेख लिहिण्याची प्रेरणा त्यांनी त्यांच्या मनोगतात व्यक्त केली आहेत. 'सकाळ' व 'देशदूत'चे संपादक विश्वास देवकर यांनी आजचा तरुण नजरेसमोर ठेवून त्यांचे प्रबोधन करणारे लेखन असावे, अशी संकल्पना मांडली. त्या संकल्पनेला मूर्त देण्याचे चोख आणि उत्तम कर्तव्य वाघ यांनी पार पाडले आहे. हा लेखसंग्रह तरुणांसाठी उपयुक्त तर आहेच, परंतु प्रत्येक 'संस्कृती' समजून घेणाऱ्या जिज्ञासू वाचकांसाठी देखील तितकाच उपयुक्त आहे. इतकेच नव्हे तर संदर्भग्रंथ म्हणून तो संग्रही असावा, असे या ग्रंथाचे मोल आहे.

मानव आणि मानवी संस्कृती हा विषय सनातन आहे तसा सिंहावलोकन करायला भाग पाडणारा विषय आहे. तोच आशय चित्रकार सतीश भावसार यांनी मुखपृष्ठावर रेखाटलेला आहे.

**मूल्य २२५ रु. सवलतीत १४५ रु.**

## ग्रंथपान

**तीन चित्रकार**
**सतीश भावसार**




### रंगरेषेचे व्यक्तिमत्त्व साकारणारे चित्रकार

''स्त्री स्वभावाने कितीही चांगली आणि घरंदाज का असेना, जर तिच्याजवळ जगण्याचं सबळ कारण नसेल आणि कुटुंबाने तिला सांभाळून घेतले नाही, तर हा समाज तिला वेश्याव्यवसायाच्या डबक्यात भिरकावून देईल. अशा स्त्रीला मदतीचा हात देणं यापेक्षा नैसर्गिक काय असू शकतं? स्त्रीबरोबरच्या नात्यावर आपलं आयुष्य अवलंबून असतं. त्यांच्याबाबतीत कधीही आणि कुणीही हलका विचार करू नये असं मला वाटतं.''(पृ. ३९)

कलावंत केवळ बाह्य चित्रण करून कॅनव्हासला सजवीत नाही. जे दिसतं तेच आपल्या कलाकृतीतून उतरवण्याचा प्रयत्न करीत नाही. तो त्याच्यापलीकडे दिसणारे सौंदर्य चितारण्याचा प्रयत्न करतो. त्याला अपेक्षित असलेले अर्थ सजीव करण्याकडे त्याचा कल असतो. त्यासाठी त्याच्याकडे असलेली अर्थवाही सौंदर्यदृष्टी वेगळी असते. सौंदर्य आणि अर्थ यांना सजीव करणारी संवेदनक्षमता वेगळी असते. मूर्त-अमूर्त असे त्याच्यासाठी वेगळे नसते; असते ती आरपार पाहण्याची, साकारण्याची, आकार देण्याची, समजून घेण्याची वृत्ती. त्यातून समोर व्यक्ती असेल तर तिच्या अबोल मूर्तीचे केलेले निरूपण कुठल्याही तत्त्ववेत्त्याला आव्हान देणारे ठरते. ही अभिव्यक्तीची प्रतिभा दैवी स्वरूपात लाभलेले कलावंत मोजकेच, परंतु त्यांचे विश्व अफाट असते. त्यांनी व्यक्त केलेल्या कलाकृती काळाच्या पुढे असतात, चिरकाल टिकणाऱ्या स्वरूपात असतात, काळाचे आघात त्यांच्यापुढे निष्प्रभ असतात. अशा काही थोर कलावंतापैकी तीन चित्रकारांविषयी सतीश भावसार यांनी लिहिलेले आहे. हे तीनही चित्रकार आपला ठसा काळाच्या पडद्यावर उमटवून त्याच्या आड गेलेले आहेत, परंतु त्याचा ठसा अजून ठसठशीत असून तो अमीट असणार आहे. अजरामर कलाकृतींचे ते तीन कलावंत आहेत व्हॅन गॉग, अमृता शेरगील आणि प्रभाकर नाईक-साटम.

व्हॅन गॉगवरील लेखाचे शीर्षक आहे शापित एरॉस! अवघे सदतीस वर्षांचे आयुष्य लाभलेला व्हिन्सेंट व्हॅन गॉग खरा शापित कलावंत ठरला. दैवाने त्याला वरदान दिले तसा शापही दिला होती की काय, इतका निष्ठुरपणा त्याच्याबाबतीत झालेला दिसून येतो. चित्रकार म्हणून त्याच्या काळात नावारूपाला येत असलेला गॉग सरळ पोटात सुरा खुपसून आत्महत्या जवळ करतो, याला कोणते दुर्दैव म्हणायचे. प्रेम ही मानवी मनाची सर्वात उदात्त भावना तिच्यात आकंठ बुडण्याचे स्वप्न प्रत्येकाचे असते. व्हॅन गॉग त्याबाबतीत भाग्यवान म्हणायचा तसाच दुर्दैवीही! आयुष्यात अनेक स्त्रिया येऊनही साफल्यापर्यंत तो पोहचू शकलेला नाही. याची सुरुवात घरापासून झाली आणि तो सुकाणू सुटलेल्या नावेप्रमाणे प्रवाहात सापडला, स्वत:च्या शोधात ॲना कोर्नेलिया, कि व्होस, युजेन लॉयर, कॅरोलिन हॅनबिक, सिएन हुर्निक, मार्गोट बेगमन, अगोस्तीना सेगातोरी व स्टेन द ग्रुट यांच्या प्रवाहात त्याची नौका हेलकावे खात राहिली. या सगळ्यांचा तपशील फोटोसह लेखकाने दिलेला आहे. व्हॅन गॉगचे नाव ज्या अनेक कलाकृतींशी जोडलेले आहे, त्यापैकी एक आहे 'द सॉरो'. त्याचीही प्रतिमा या लेखात आहे. अप्रतिम चित्राबाबत गॉगने नमूद केले आहे, 'या कुरूप स्त्रीसारखी सुंदर सहचारिणी मला आजपर्यंत मिळाली नव्हती.'

दुसरी शापित कलावंत म्हणजे अमृता शेरगील. चित्रकार म्हणून ती जितकी श्रेष्ठ तितकीच सौंदर्यवती. पारंपरिकतेला छेद देत स्वत:ची शैली निर्माण करणारी ही चित्रकार. चित्र साकारताना वापरले जाणारे रंग आणि प्रकाशाचा करण्यात येणारा उपयोग, याविषयी तिची स्वत:ची अनुमाने होती. 'द प्रोफेशनल मॉडेल' या चित्राच्या निमित्ताने लेखक लिहितात, 'एका प्रसिद्ध मॉडेलची जी ग्लॅमरस प्रतिमा लोकांच्या डोळ्यांसमोर होती त्या कल्पनेलाच अमृताने धक्का दिला. 'मॉडेल इन ग्रीन' आणि 'मॉडेल इन ब्राऊन' या दोन चित्रांनी पॅरिसच्या कलाजगताला स्त्रीची असहाय्य 'देहबोली' शिकवली. अमृता फक्त चित्रकलेसाठी पारंपरिक दृष्टिकोन बाळगत होती असे नव्हे तर तिच्या जगण्याच्या कल्पनेतही तो दृष्टिकोन होता. अजिंठ्याच्या चित्रांनी प्रभावित झालेली अमृता नोंद करते. अजिंठ्यांच्या चित्रकारांनी काढलेल्या चित्रांतील रेषेत जोमदारपणा आणि वेग आहे. अनेक वादळांचा सामना तिने केला. नावाभोवती अनेक प्रवाद जोडले गेले. तरी ती स्वत:शी ठाम होती. तिच्याविषयी मान्यवरांनी जी नोंद केलेली आहे, त्यांची अवतरणे लेखकाने तिच्या लेखात दिलेली आहेत. एक असामान्य व्यक्तित्व असलेली महान चित्रकर्ती शांततेच्याही पलीकडे असलेल्या एका सृष्टीत निघून गेली, तीही अवघ्या वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी.

जपानच्या होक्कायडो म्युझियममध्ये जगाच्या पाठीवरील नामांकित चित्रकारांची चित्र आहेत. त्यात 'लाईफ आफ्टर डार्क' हे टेपेस्ट्रीचे चित्र साकारण्याचा मान ज्यांना मिळाला ते प्रभाकर नाईक साटम जगभर ओळखले जातात ते त्यांच्या टेपेस्ट्रीमुळे. त्यांच्यावरील लेख या लेखसंग्रहात आहे.

या तीनही कलावंतांची शैली वेगवेगळी आहे. त्यांचा असणारा प्रभाव वेगवेगळी आहे. पण मनात साठलेल्या दु:खाकडे पाहण्याची त्यांची नजर समान आहे. त्यांच्यातला दुवा साधणारा हा धागा समान आहे.

सतीश भावसार यांची ओळख आता केवळ चित्रकार/मुखपृष्ठकार इतकी मर्यादित राहिलेली नाही. बाबुराव अर्नाळकरांवरील बृहत्‌ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. लेखन चित्रदर्शी तसे माहितीने परिपूर्ण देण्यावर त्यांचा भर असतो. त्यांच्या या सकसपणामुळे दर्जेदार लेखन वाचकांच्या हाती येते. हे तीन चित्रकार त्यांच्या प्रसिद्ध चित्रांसह दिलेले आहेत, तेही आटोपशीर पण नेमक्या नोंदींसह. त्यामुळे त्याला लाभलेले संदर्भमूल्य नोंद घ्यावी असे आहे. मुखपृष्ठही त्यांची कलात्मकता व्यक्त करते.

**मूल्य २०० रु.  सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**हे प्रवासी गीत माझे**

**आत्माराम परब, नरेंद्र प्रभू**




**लडाखचा आत्मीय सखा**

'प्रत्येक वेळी वेगवेगळी माणसं, त्यांच्या समस्या, निसर्गाचा खेळ, हवामान रस्ते असे अनेक अडथळे यावर मात करत सहल यशस्वी करण्यासाठी झोकून द्यायची वृत्ती लागते. लडाखची ढगफुटी, आयत्यावेळी अडवणाऱ्या तिथल्या खिंडी, काश्मीरमधला उपद्रव, अशा अनेक समस्या असताना आजतागायत ईशा टुर्सने लडाखचा वसा सोडलेला नाही. आता जगभरात सहलींचं यशस्वी आयोजन होत असताना 'लडाख'कडे दुर्लक्ष होऊ दिलेलं नाही' लिहिताहेत नरेंद्र प्रभू म्हणजे ईशा टुर्सचा एक भाग असलेले सहकारी.

आतापर्यंत एकट्या 'लडाख'च्या सहलींचे शतक पूर्ण करणारी 'ईशा टुर्स' ही एकमेव संस्था असावी. 'लडाख'वर असलेले प्रेम, ओढ, उत्सुकता आणि यशस्वी आयोजनावर असलेला आत्मविश्वास, यामुळे या सहली यशस्वीपणे पार पडलेल्या आहेत. त्यासाठी लडाखी सरकारने, जम्मू-काश्मीर सरकारने या टुर्सच्या आयोजकांचे मनापासून शासकीय इतमामात शाही सन्मान केलेले आहेत. तिथल्या जनतेचे प्रेम लाभलेले आहे ते वेगळेच. आता असे ठामपणे म्हणता येते की, लडाख आणि ईशा टुर्स हे वेगवेगळे राहिलेले नसून, एकाच नाण्याच्या दोन बाजू नव्हे, एकच अंग आहेत. ईशा टुर्सशी जुळलेले नाते हे आताचे नसून पूर्वजन्मीचे संचित असावे, अशी भावना व्यक्त तिथली जनता करते, यातच सर्व काही आले आणि या सगळ्याचे भाग्य ज्यांना लाभले, या टुर्सचे भाग्य ज्यांनी घडवले ते आहेत आत्माराम परब!

आत्माराम परब यांनी 'ईशा टुर्स' या त्यांच्या सहली आयोजन करणाऱ्या संस्थेची स्थापना केली ती २००३ साली. माझा जन्मच जणू प्रवास पदभ्रमण आणि गिर्यारोहणासाठी झालेला आहे, असे आत्माराम परब स्वत:विषयी लिहितात, यातून त्यांची नैसर्गिक ओढ निसर्गाकडे आहे, हे यातून स्पष्ट होते. निसर्गाची ओढ, वेड, धाडस आणि झोकून देण्याची वृत्ती असणारी माणसे निसर्गाच्या सान्निध्यातच रमण्यात सर्व जीवनाचे सार्थक समजतात. इतर गोष्टी त्यांना मोह घालून अडवू शकत नाहीत. आत्माराम परब हे त्यापैकी एक. म्हणूनच उत्तम स्थैर्य देणारी कस्टम खात्याची नोकरी त्यांनी सोडली, तीही अगदी सहजपणे. ईशा टुर्सच्या अगोदरही त्यांचा हा निसर्गात रमण्याचा छंद सुरूच होता. आपल्या या छंदात आवड असणाऱ्या समानधर्मीयांना सहभागी करून घेण्यासाठी त्यांनी 'ईशा टुर्स' सुरू केली आणि त्यात ते कमालीचे यशस्वी झालेले आहेत, असे त्यांच्या आजवरच्या प्रवासावरून ठामपणे विधान करता येते.

'हे प्रवासी गीत माझे...' हे प्रवासवर्णनाचे पुस्तक 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेले आहे. आत्माराम परब यांचे हे चरित्र नाही परंतु त्यांनी आतापर्यंत केलेल्या प्रवासाचे हे चरित्र आहे. आणि या प्रवासात त्यांचा सहभाग सगळ्यात महत्त्वाचा आहे. हा प्रवास पर्यटकांसाठी अनोखा असतो, परंतु आयोजकाला अनेक आघाड्यांवर कसरत करावी लागते. आपण ज्या उद्देशाने पर्यटकांना सहलीसाठी सोबत घेऊन आलो आहोत, ते सर्व-सर्व दाखवायचेच, हा ध्यास सतत मनाशी बाळगलेला असतो परंतु सगळ्यात मोठी जबाबदारी असते, ती पर्यटकांच्या सुरक्षेची. तिथे तडजोडीला जागा नसते. परक्या मुलखात ही जबाबदारी प्रमुख ठरते, कारण आलेला पर्यटक आयोजकाच्या भरवशावर आलेला असतो. या सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना कशीकशी कसरत करावी लागली, ढगफुटी, नदीला पूर, कडाक्याची थंडी, वाहतुकीचे अडथळे असे अनेक प्रसंग आहेत, जिथे आयोजकाचा कस लागतो परंतु आत्माराम परब यांनी अतिशय कौशल्याने हे दिव्य पार पाडलेले आहे, त्यांचा हा रंजक प्रवास म्हणजे 'हे प्रवासी गीत माझे...'

हे प्रवासवर्णन एका धाडशी, कल्पक आणि आनंदी माणसाचे प्रवासमय वर्णन आहे. लडाखच्या सहली हा त्यांचा आत्मा आहे. सहलींचे वर्णन करताना संपूर्ण निसर्ग, प्रवासाचे टप्पे, अनुभवाला आलेली नयनरम्यता, सौंदर्य या सगळ्यांचे ते चित्रमयदर्शन घडवतात. प्रत्येक ठिकाणांची वैशिष्ट्ये सांगतात. खिंडी, नद्या, रस्ते, झाडी, दऱ्या, तळे, हॉटेल, भेटलेली माणसे, जोडलेली माणसे या सगळ्यांचा तपशील वाचत असताना जणू आपणच त्यांच्यासोबत सहलीवर आहोत असा भास होत राहतो. प्रवासात लडाख, भूतान, ईशान्येकडील राज्ये, कच्छ या सोबतच स्कँडेनेव्हिया, नॉर्वे, अंदमानच्या गमतीजमतीचे वर्णन आहे. 'पासपोर्ट हरवणे' किती महागात पडू शकते, याचा स्वत:च घेतलेला अनुभव बरेच काही शिकवून जातो.

प्रत्येकाने प्रवास करून नवनवीन प्रदेश, निसर्ग पहावा, जीवनाचा वेगळा आनंद घ्यावा, अशी अपेक्षा जगणारे, जगवणारे, प्रोत्साहन देणारे हे पुस्तक म्हणजे एका ध्येयवेड्या तरुणाचा हा प्रवास आहे. आपल्या भाषेत लिहिलेला. प्रवासात निघताना कुणाला मार्गदर्शक ठरू शकेल असा हा रंजक वाटाड्या आहे. आत्माराम परब स्वत: उत्तम फोटोग्राफी करणारे कलावंत आहेत. त्यांनी काढलेले सुंदर, सुस्पष्ट असे फोटो सोबत दिलेले आहेत. नरेंद्र प्रभू यांनी उत्तमपणे याचे लेखन केलेले आहे, स्वत: सोबत असल्याप्रमाणे. त्यामुळे लेखक व परब वेगळे वाटत नाहीत. परब यांच्या मोटारसायकलवरील भ्रमंतीचा फोटो ठेवून अच्युत पालव यांनी सुंदर मुखपृष्ठ तयार केले आहे.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

र 'स्व'च्या शोधात...
विदुर महाजन




**'शब्दसुरांच्या शोध मैफिलीत'**

'सम ही दुसऱ्या आवर्तनाची सुरुवात असते
आपण मात्र पहातो, तिच्याकडे पहिल्याचा शेवट म्हणून!'

आपल्या समजुतीत होणारे घोटाळे असे कुणी दाखवून दिले की ते दुरुस्त होतात; अन्यथा समजुतीला ठेचकाळत राहावे लागते. तीच समजूत सप्तसुरांच्या बाबतीत. 'सारेगमपधनि' याचा संबंध केवळ स्वर उमलण्यासाठी आहे, ही आपली भाबडी समज परंतु कवी इथे त्यांच्यातला भावरस कसा वेगवेगळा असतो त्याचे वर्णन करतात. गांधार करुण, निषाद उत्कट, पंचम प्रसन्न, आधार देणारा ऋषभ, अधांतरी असण्याची जाणीव देणारा मध्यम तीव्र आणि मन शांत करणारा षड्ज!

कवी स्वत: सतारवादनात पारंगत असलेले कलावंत आहेत. कलावंताची प्रत्येक घटकाकडे पाहण्याची नजर वेगळी असते. तिच्यातली सौंदर्य टिपण्याची संवेदना हळवी तितकीच तीव्र असते. आणि तीच या कवितासंग्रहातील प्रत्येक कवितेतून वाचकाच्या भेटीला आल्याची दिसून येते. संगीतात संवादी सूर असतात, जे रागाची खुमार वाढवण्याचे आधार ठरलेले असतात. तसेच रागाचा बेरंग करणारे विसंवादी सूर असतात. परंतु त्याचवेळी काही सुरांना रागाने वर्ज्य ठरवलेले असते. हा वर्ज्यपणा ज्यांच्या नशिबी आला, ते सूर रागापासून अंतर राखून राहतात. परंतु त्यांचे अस्तित्व हरवले आहे असे होत नाही. माणसाच्या जगण्यात असे जिवलग सूर खूप असतात. परंतु कधीतरी कुणीतरी स्वत:हून म्हणा, प्रसंगानुरूप म्हणा किंवा काळाच्या लहरीपणाचा फटका म्हणा, जीवनातून वर्ज्य होतो आणि मग त्याच्या अस्तित्वाच्या खुणांमध्ये त्याचे अस्तित्व शोधत राहणे शिल्लक राहते. असा शोध या कवितांचा स्थायीभाव असल्याचा पदोपदी जाणवत राहतो. विशेष म्हणजे हा शोध दोन टप्प्यावरचा आहे. एक आहे कवितेतील शब्दांचा आणि दुसरा आहे संगीतातील सुरांचा. यालाच दुसरे नाव आहे शोध 'स्व'चा. कवितासंग्रहाच्या शीर्षकात त्याचे अस्तित्व व्यक्त झालेले आहेच.

कवी विदुर महाजन हे उत्तम सतारवादक आहेत. सतारवादनाचे साडेसातशेहून अधिक कार्यक्रम त्यांनी जगभर केलेले आहेत. यातली नवनवीन उपक्रमशीलता हे त्यांचे वैशिष्ट्य ठरलेले आहे. 'हार्मनी स्कूल ऑफ सितार' या नावाची सतारीची शाळा त्यांची स्वत:ची आहे. 'ग्रीष्म', 'गांधार पंचम' हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. शिवाय 'मैत्र जीवाचे', 'शोधयात्रा', 'एका स्वर वेड्याची आनंदयात्रा' ही पुरस्कारप्राप्त पुस्तके त्यांची प्रकाशित झालेली आहेत.

'र 'स्व'च्या शोधात' हा कवितासंग्रह नुकताच 'ग्रंथाली'ने प्रकाशित केला आहे. हा संग्रह मुक्तछंदात आहे असे वरवर दिसून येते. तरी त्यात नादमयता अलगदपणे सामावलेली आहे. या कवितांना उपमा, रूपक, अनुप्रास अशा शृंगाराची गरज नाही, सुंदराला अशा कृत्रिम अलंकारांची गरज नसते म्हणतात तशी. ही कविता मुळातच सौंदर्याचे लेणे लेवून आलेली आहे.

शब्द सापडत नव्हते तेव्हा मी हरवलो होतो.
सूर अगतिक झाले तेव्हा मी सापडलो नव्हतो!

या संग्रहातील कविता या सर्व कविमनाच्या अस्वस्थतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत. अभिव्यक्त होण्याची जी अस्वस्थता असते, तिने कवीच्या मनावर गारूड केलेले दिसून येते. मनात खूप काही साचले आहे. ते सारे कागदावर ओतून रिते व्हायचे आहे परंतु कितीही ओतले तरी मन रिते होत नाही. ते तसेच अस्वस्थ राहते. ही अस्वस्थता प्रत्येक कवीने अनुभवलेली असते. समोर कागद ठेवून तो स्वत:विषयी सांगत असतो, ''मी जे शब्दात मांडलेले आहे ते सगळं नाही, मी जे जगलो ते अजून खूप बाकी आहे. तरीही जे जगलेलं एकदाच कागदावर ओतलं की तेवढंच जिणं संपवल्यासारखं वाटतं.'' मात्र काही क्षण कवीच्या मनाला दिलासा देणारे असतात, जेव्हा त्याची कविता फुटलेल्या कोंबासारखी फुललेली दिसते. आपली कविता जणू कोसळते अचानक वीज कुठल्याशा वेदनेची, मनही होते रिते... उमटते तयाचे प्रतिबिंब जसे पडती धरणीवर.. पावसाचे थेंब.

या कविता वाचताना एक स्वतंत्र अनुभव देतात. आत्मचिंतन, 'स्व'चा शोध यांचा हा प्रवास आहे. तो यमन, प्रिय, मैत्रबन, मृत्यू, सतार, सम, बोध, झाड, कुवत यासारख्या कवितांमधून सुंदरपणे व्यक्त झालेला आहे. सारा खेळ अनिश्चिततेचा आहे. प्रत्येकाची एक कुवत असते. हे सांगत असताना असेही सांगून जातात. आपल्या आत असं काही दडलेलं होतं, याची जाणीवच नव्हती, ती लिहिलेली कविता वाचताना लक्षात आली. कविता लिहिताना तिच्या आकृतीबंधात किती अडकून राहायचं, आकृतिबंध महत्त्वाचा की आशय, असा प्रश्नही ते उपस्थित करतात. अभिव्यक्त होणाऱ्या या कवितांना आसावरी काकडे यांची प्रस्तावना लाभलेली आहे.

सुप्रसिद्ध चित्रकार सतीश भावसार यांनी या कवितासंग्रहाचे मुखपृष्ठ सुंदरपणे सजविलेले आहे. कवीचे सतारवादन लक्षात ठेवून सतार मुखपृष्ठावर साकारलेली आहे आणि शीर्षक त्या सतारीवर कोरलेले आहे. सुंदर!

**मूल्य १०० रु.   सवलतीत ६० रु.**

# ग्रंथपान

**प्रीत पाखंडी**

**दत्ता सावंत**




**मनामनाचा कॅलिडोस्कोप**

''एखाद्या गोष्टीवर सारं सारं ओवाळून टाकणारं प्रेम करायचं. एखाद्या गोष्टीशी अतूट असं नातं तयार करायचं हा आपल्या पिढीचा गुणधर्म. तो आताच्या पिढीला मूर्खपणा वाटतो म्हणूनच तर आपली दोन्ही मुलं लोट्याला घर बांधायला निघालेल्या आपल्याला 'आई, तू मूर्खपणा करतेस म्हणतायत.' ऋणानुबंध कथेत डॉ. सुनीला यांच्यासमोर उभा राहिलेला पेच पाहिला की, खरेच लक्षात येते. दोन पिढ्यांच्या विचारातच नव्हे तर नाते, भावना, अनुबंध यातही फरक पडलेला आहे. कारणे काही असोत परंतु डॉ. सुनीता या जुन्या पिढीचे नेतृत्व करतात. नाते जपण्याचा त्यांच्यापरीने प्रयत्न करतात. हा प्रयत्न असतो, पती–पत्नीच्या एकमेकांवरील असलेल्या प्रेमाला जपण्याचा, भावनांना व्यक्त करण्याचा परंतु शहरी वातावरणात लहानाची मोठी झालेली मुले त्यांच्या स्वतःच्या कोशातून बाहेर पडायला नसतात. ही मुले आताच्या पिढीचे प्रतिनिधित्व करतात. हे दोन पिढ्यांतील अंतर दाखवणारी कथा म्हणजे 'ऋणानुबंध'.

प्रत्येकाची स्वप्ने पूर्ण होतातच असे नाही. परिस्थिती किंवा अन्य कारणांनी स्वप्नांचे इमले वरच्या मजल्यांनी आकार घेत नाहीत, ती खंत मग जीवनभर छळ करीत राहते. त्यातून काही पालक आपल्या स्वप्नांची पूर्ती करणारे वारसदार म्हणून आपल्या पाल्यांकडे पाहतात, त्यासाठी त्यांच्यापाठी ठामपणे उभे राहण्याची पराकाष्ठा करतात परंतु 'गुंतवणूक' या कथेतील नायक चंद्रहास लोकरे स्वतः शाळेत शिपाई म्हणून काम करीत असताना अनाथ अंजलीला तिची हुषारी पाहून वेगळ्या तऱ्हेने सर्वतोपरी मदत करतो. अंजली याच जोरावर आपले ध्येय गाठते तेव्हा या केलेल्या मदतीचे महत्त्व खऱ्या अर्थाने सफल होते. यातला प्रांजळपणा फार नितळ आहे. कुठेही उथळ, भडकपणे अपेक्षांची गुंतागुंत न करता मोकळ्या मनाचा आविष्कार समोर येतो. यात केवळ मदत करणे एवढेच अपेक्षित नाही, त्यामागे असणारी दूरदृष्टी आणि सकारात्मकता अधिक तळमळीने पुढे आलेली आहे.

'विसर्जन' या कथेतील शामा आपल्या नाट्यकलेशी असलेले नाते कायम राहावे म्हणून ज्या तडजोडी स्वीकारते, त्यांचे चित्रण अतिशय प्रभावीपणे या कथेत करण्यात आलेले आहे. या क्षेत्रात वावरणारी माणसे कलेशी प्रामाणिक राहून आपली आत्मीयता व्यक्त करतात. परंतु या क्षेत्रापासून दूर असणारी माणसे मात्र या कलावंत मनाचा कोंडमारा करण्यातच धन्यता मानतात. शामाच्या सर्व तडजोडी असह्य होतात तेव्हा तिला आपल्या भावनांचे विसर्जन करण्याची वेळ येते. या कथेतील प्रभाकर, प्रीतम या दोन टोकाच्या व्यक्तिरेखा शामाचे व्यक्तिमत्त्व स्पष्ट करण्यासाठी योजलेल्या आहेत. त्या प्रत्येकाचा जगण्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. यातून शामाची व्यक्तिरेखा उठावदारपणे वाचकांसमोर येते. तिचे ठामपण ती व्यक्त करते, ''सर, मी आमच्या नात्याचं कायमचं विसर्जन करून आलेय, माझं काही चुकलं तर नाही ना सर?''

राजारामबापू हे स्वतःच्या मर्जीनुसार हौशी जीवन जगणारे सेवानिवृत्त गृहस्थ. आपले वेगळेपण दाखविण्याची धडपड, त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या, यांची मालिका या कथेत येते. परंतु जगण्याचे परिणाम काय होतात, हे महत्त्वाचे. तो परिणाम परिणामकारकपणे लेखकाने 'पाखंडी' या कथेत दाखवलेला आहे. मोठ्या अपेक्षा ठेवून अमेरिकेला सुरंजनला पाठवले. पुढे तो तिकडेच स्थायिक झाला. अशावेळी भारतात असणारे आईवडील, भाऊ यांच्याविषयी मनात कितीही प्रेम, ओढ असू दे, तिथले पाश त्याला तिकडेच जखडून ठेवतात. यातून त्याची अगतिकता, अपरिहार्यता ही त्याची एकट्याची राहत नाही. परदेशी गेलेल्या प्रत्येक मुलाच्या वाट्याला येते, प्रमाण कमीजास्त असेल इतकेच. त्यातून जो निष्कर्ष काढला जातो तो 'बेईमान' या शब्दाशी येऊन थांबतो.

दत्ता सावंत यांचा हा दुसरा कथासंग्रह. यात एकूण बारा कथा आहेत. लघुकथा असे या कथांचे स्वरूप आहे, परंतु या कथा स्वतंत्र आहेत. आपल्या आसपास घडणाऱ्या घटनांचा वेध त्या घेतात. घटना, प्रसंग हे प्रत्येकाला कसे आपल्या कवेत घेतात, याचे चित्रण प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न या कथांमधून झालेला आहे. यात आलेल्या व्यक्तिरेखा जीवनातल्या वेगवेगळ्या स्तरावरील आहेत. त्या प्रत्येकाचे जगणे हे त्याच्या वृत्ती–प्रवृत्तीशी निगडित असते. त्यांची स्वतःची खास वैशिष्ट्ये असतात. त्या वैशिष्ट्यांसह त्या व्यक्तिरेखा ठळकपणे लेखकाने साकारलेल्या आहेत. त्यांच्या गुणदोषांसह त्या आलेल्या असल्याने त्या जिवंतपणे कथानक उभ्या करतात. लेखक स्वतः नाट्यचळवळीशी संबंधित आहेत. त्यांनी या क्षेत्रात दिलेले योगदान मोठेच आहे. त्यामुळे मानवीमूल्ये, हावभाव, स्वभाववैशिष्ट्ये यातील बारकावे टिपण्याचे उपजत कौशल्य त्यांच्याकडे आहे. त्यामुळे त्यांच्या कथा या गुणांचे चित्रण प्रभावीपणे करताना दिसतात. बोलीभाषेचे बारकावे, संवादातील अचूकता, जे सांगायचे त्यातला नेमकेपणा ही त्यांची खास वैशिष्ट्ये या कथांमधून व्यक्त झालेली आहेत. राजीव जोशी यांची प्रस्तावना या संग्रहाला लाभलेली आहे.

सतीश खानविलकर यांनी कथासंग्रहाच्या शीर्षकाला साजेसे सुंदर मुखपृष्ठ तयार केलेले आहे. फुलातील एका पाकळीचे निखळणे, ही कल्पकता उत्तमच!

**मूल्य १८० रु.   सवलतीत ११० रु.**




# ग्रंथपान

**फक्त सैल झालाय दोर**

**पद्मरेखा धनकर**




**प्रगल्भ आत्मभानाच्या वाटेवरील कविता**

'कविता माझा श्वास आहे; माझ्या जगण्याचे बळ आहे. माझ्या हृदयाची स्पंदने टिपण्याचे कार्य कविता करते. ती माझ्या अभिव्यक्तीचे सशक्त माध्यम (साधन) आहे. जगण्यातील अनुभवांना मी काव्यात्मतेने अधोरेखित करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.' कवी जेव्हा स्वत:च्या अभिव्यक्तीकडे पाहतो तेव्हा नजर कशी समृद्ध असते, नव्हे अशाच नजरेने प्रत्येकाला पाहता आले पाहिजे, याचे हे उदाहरण म्हणता येईल. कवी बोलतो कसा, व्यक्त होतो कसा, याचा अनुभव वेगळा सांगावा लागत नाही. तो स्वत:च समोर उभा असतो. स्वत:चे बिंब आणि प्रतिबिंब घेऊन! कुतूहल असते ते त्याच्या व्यक्त होण्याचे, त्याच्या प्रामाणिक आत्मचिंतनाचे आणि त्याला स्वत:ला स्वत:विषयी असलेल्या जाणिवेचे. ती जाणीव इथे व्यक्त होताना दिसते.

'फक्त सैल झालाय दोर' हा पद्मरेखा धनकर यांचा दुसरा कवितासंग्रह 'ग्रंथाली'ने नुकताच प्रकाशित केला आहे. ज्याच्या शीर्षकावरून कवितेविषयीची उत्सुकता नाळेसारखी सोबत येते आणि संग्रह वाचून झाल्यावर कवयित्रीच्या कवितांमधून व्यक्त झालेल्या अभिव्यक्तीच्या जाणिवा किती खोलवर रुजलेल्या आहेत यांची प्रचितीही येते.

समाजाकडे पाहताना आपले समाजमन किती सजग आहे. आजूबाजूला होत असलेल्या बदलांविषयी किती अनुकूल आहे, याचा पडताळा घेण्याची वेळ आली आहे. नव्या बदलाविषयी पुढारलेपणाच्या आवेशात जे चित्र रंगवले जाते आणि प्रत्यक्षात कृतीत त्याचा अंतर्भाव किती असतो, हा सुद्धा विषय तितकाच संवेदनशील म्हणावा लागेल. आजही स्त्रियांनी आपल्या उंबरठ्याच्या आतच असावे, ही मानसिकता बदललेली नाही. तिचे स्वातंत्र्य, करिअर, समानतेच्या पातळीवर असावे ही कल्पना दुढ्ढाचार्यांना आजही पचनी पडताना खूप त्रास होताना दिसतो. हा एकप्रकारचा दांभिकपणा म्हणता येईल. त्याचा बुरखा फाडून काढायला हवा. या दांभिकपणाने, बुरसटलेल्या विचारांनी होणारा कोंडमारा सहन करीत राहण्यापेक्षा त्या विरोधात ठामपणे उभे राहायला हवे आणि उभे राहण्याचे काम समाजातला कुणीही करणार नसेल तर तिला स्वत:च उभे राहावे लागेल आणि तीच जाणीव बहुतेक कविता आपल्या अंतरंगात लाव्हारसासारखी घेऊन वाचकांच्या समोर ठामपणे उभ्या झालेल्या आहेत. आपल्या पायात आवळलेला, जखडून टाकणारा दोर आपणच सोडवला पाहिजे हा निर्धार त्यांनी केलेला आहे, त्याचे दर्शन या कविता घडवतात. आजी पेरायची गौर. तिने ती माझ्या हाती दिली. ती गौर पेरणार नाहीच तशी माझ्या मुलीच्या हातीदेखील देणार नाही. लहानपणापासून उजेड शिकविण्याऐवजी तिच्या मुखाला चंद्राच्या अलंकारांनी सजवण्याच्या कल्पना शिकविल्या गेल्यात. त्या उपमा, उत्प्रेक्षा रूपकांना फेकून देणार आहे. हा सगळाच चंद्राभोवती (तिच्या) फिरणारा अभ्यासक्रम बाद करायचा आहे आणि नवीन अभ्यासक्रम रुजवायचा आहे, ज्यात स्वयंतेजी, स्वयंप्रकाशित सूर्यप्रतिमा असतील. अशा उमेदीने, ध्यासाने, स्वबळावर भरारी घेण्याचा, नव्याने स्वत:चे स्वत्व कमावण्याचा अवकाश निर्माण करू पाहणाऱ्या सकारात्मक कविता कवयित्री समाजासमोर सादर करीत आहे. इतकेच नाही, आजपर्यंत पुरुष आणि स्त्री यांच्या भिन्नतेविषयी, स्तराविषयी जो गोंडस गोफ तयार करून विणून ठेवलेला आहे, त्यालाही कवयित्री उसवून दाखवत आहे. स्त्री म्हणजे उन्नत उरोज आणि पुरुष म्हणजे ताठर लिंग, हा जो कोश आहे समजुतीचा, त्याभोवतीच किंवा त्याच्यातच किती जखडून राहणार. पुरुषाने स्त्रीत्व आणि स्त्रीने पौरुषाचं कंकण धारण करणे अशक्य आहे का? लौकिकाच्या पलीकडे जाता येईल. ही एकरूपता देहाची आहे ती साधता येईल आणि तसे झाले तर ही भेदाची दरी आपोआप मिटली जाईल. आणि जे रूप मागे उरेल ते तू आणि मी चे माणूस म्हणून असेल फक्त!

हल्ली रंगावर मालकी सांगणारे गट अधिक प्रबळ झालेले दिसत आहेत. प्रत्येकजण वेगळे अस्तित्व, त्यातून अस्मिता, द्वेष अशा तेढ निर्माण करणारे रंग गडद करीत आहे. कशासाठी हे आपण सारे एक आहोत. सगळे रंग एकत्र नांदू देत फुलपाखरासारखा आनंदाचा, एकोप्याचा वारसा जपूया. विखुरलेले समाजचित्र पाहिल्यानंतर कवयित्री एक मनोरम आशावाद व्यक्त करते.

आपल्याभोवतीचा समाज, चालीरीती, विभिन्नता, या सगळ्यात असलेले तुटलेले परस्परविरोधी प्रवृत्ती, अंधश्रद्धेचे, परंपरेचे सूक्ष्मपणे केलेले निरीक्षण या कवितांचा गाभा आहे. माणूसपण जपण्याचा, स्वत:चा अवकाश निर्माण करण्याचा आशावाद, त्यात आलेले आत्मभान, कवयित्रीच्या दृष्टिकोनाचा प्रत्यय देतात. कविता मुक्तछंदात आहेत. व्यक्त होण्यातली प्रगल्भता आणि कवितेचे असलेले सजगपण, यामुळे 'आताच्या पिढीची कवयित्री' अशी ओळख हा संग्रह करून देतो. वसंत आबाजी डहाके यांनी केलेली पाठराखण (बर्ल्ब) आणि नीरजा यांनी लिहिलेली अभ्यासपूर्ण प्रस्तावना कवितासंग्रहाचे अलंकार आहेत.

'फक्त सैल झालाय दोर' हे शीर्षक आशयाशी तंतोतंत जुळणारे आहे. सतीश भावसार यांनी सजवलेले मुखपृष्ठदेखील आशयघन आहे.

**मूल्य १५० रु. सवलतीत १०० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## मराठी स्त्रीची बदलती अस्मिता

**नीलिमा भावे**




### तुफानातील दीपगृहे

'स्त्रियांच्या कर्तृत्वाला वाव द्यायचा की दडपून टाकायचे, हे पुरुष ठरवत आले आहेत – घरातही आणि समाजातही, कालही आणि आजही. स्त्रीमुक्तीच्या विचारांशी बांधिलकी असो किंवा नसो, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही आणि स्त्रिया गरज पडेल तेव्हा पुढे होऊन कठीण परिस्थिती सावरतात आणि सुधारतात. घरातही आणि समाजातही, कालही आणि आजही! हीदेखील वस्तुस्थिती आहे.' ही वस्तुस्थिती कुणालाही नाकारता येत नाही, येणार नाही, परंतु केवळ मत मांडून या वस्तुस्थितीला न्याय दिला असे होत नाही, त्यासाठी आजपासून मागे भूतकाळाची पाने चाळणे आवश्यक आहे. त्यातली उदाहरणे, प्रसंग, घटना, व्यक्ती यांचा शोध घेणे आवश्यक आहे. आणि त्यांच्या उदाहरणासह, पुराव्यासह ते मत व्यक्त करणे आवश्यक आहे. तेव्हाच या मताच्या कसाला झळाळी प्राप्त होऊ शकते. ते झळाळी देण्याचे उत्तम उदाहरण समोर ठेवले आहे 'मराठी स्त्रीची बदलती अस्मिता' या पुस्तकाने.

महाराष्ट्र आणि इथला शिवाजीपूर्वकाळ, शिवाजीकाळ आणि शिवाजीनंतरचा काळ, असा एक विस्तारलेला पट या विषयासाठी निवडलेला आहे. शिवाजीच्या उदयापूर्वी यादव, मोगल, आदिलाही, निजामशाही, बरीदशाही यांचा अंमल या भूमीवर होता. शिवाजीनंतर पेशवे, इंग्रज यांचा अंमल होता. यात संभाजी, राजाराम, शाहू यांचाही समावेश आहे. या संपूर्ण कालखंडाचा आवाका आणि त्या–त्यावेळी असलेल्या राजकीय, सामाजिक परिस्थितीत असलेली 'स्त्री–अस्मिता' हा या पुस्तकाचा गाभा आहे. साधारणपणे अडीचशे वर्षांच्या या पटावर साठ स्त्रियांचा संदर्भ कोरलेला दिसून येतो. या स्त्रिया राजघराण्याशी संबंधित असल्याने त्यांचे स्वभाव, महत्त्वाकांक्षा, आक्रमकता, कारस्थानीपणा, क्रौर्य, शौर्य, समयसूचकता, धाडस, दूरदर्शीपणा, मुत्सद्दीपणा, औदार्य, त्याग या सगळ्यांचा परिचय कर्तृत्वाबराबेरच होत जातो.

आदिलशाही घराणातल्या पूँजी खातिम, बडी बेगम, शहरबानू, चांदबीबी यांचे कर्तृत्व आदिलशहाइतकेच लक्षात येणारे आहे. शिवाजीचा बंदोबस्त करण्यासाठी अफझलखानाला सर्व सामग्रीसह व सल्लामसलत करून रवाना करण्यात या बडी बेगमचा पुढाकार उल्लेखनीय होता. काफिरांच्या हल्ल्यापासून मुसलमानांचा बचाव करणारी निजामशाहीतील मलिका–इ–जहाँ बीबी अमीना, निजामशाहीचा कारभार स्वत:च्या हातात घेणारी खूँजा हुमायूँ यांचे कर्तृत्व चांदबीबीइतकेच मुत्सद्दी व समयसूचकता दर्शवणारे आहे.

जानी बेगम ही औरंगजेबाचा मुलगा अझीमशहाची पत्नी व दारा शिकोहची मुलगी, संभाजीच्या फौजेने धारूर येथे छावणीवर हल्ला केला तेव्हा पडदा काढून घोड्यावर स्वार झाली. अग्रभागी उभी राहून मराठ्यांच्या सैन्याशी लढून तिने ही फौज मागे परतवून लावली.

जिजाबाई, सईबाई, सोयराबाई यांच्या मुत्सद्दी दूरदर्शीपणाची नोंद शिवाजीच्या एकूण कारकिर्दीतून वेगळी करणे इतिहासाला शक्य नाही. येसूबाई, ताराबाई यांच्या कर्तृत्वाचा वारसा, त्यांच्यातील गुणांचा उजळपणा मराठी राज्याचा स्वाभिमान उंचावणारा आहे. शाहूमहाराजांच्या सकवारबाई व सगुणाबाईंचा कारभारातील हस्तक्षेप आणि वचक, माहूरचे देशमुख उदाराम चव्हाण यांची पत्नी रायबागनचे शौर्य, जिजाबाई भोसले यांच्या मातोश्री म्हाळसाबाई यांची समयसूचकता, हिंमत व राजकीय दृष्टी, निंबाळकर घराण्यातली द्वारकाबाई हिचा मुत्सद्दीपणा, मल्हारराव होळकरांची सून अहिल्याबाई, दौलतराव शिंद्यांची बायको बायजाबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई, पेशव्याच्या गोपिकाबाई, अशा काही निवडक स्त्रियांचा राजकारभारातील सहभाग याविषयी या पुस्तकात आलेली उदाहरणे, तो संपूर्ण कालखंड उभा करतात.

स्त्रियांना मिळणारे स्थान हे त्या त्या कालखंडातील सामाजिक व्यवस्था, आर्थिक परिस्थिती, राजकीय परिस्थितीशी निगडित होते, तसे शिक्षण, लग्न, वडिलोपार्जित संपत्तीतून मिळणारा वारसा, यांचेही संदर्भ महत्त्वाचे ठरतात. मुसलमान, मराठा, ब्राह्मण या स्त्रियांचे एकूण स्थान आणि अन्य समाजातील स्त्रियांचे स्थान यात असलेला फरक, त्यांनी जपलेली अस्मिता आणि त्यांना मिळालेला वाव याचेही विवेचन यात होते.

'मराठी स्त्रीची बदलती अस्मिता' या विषयाचा आवाका मोठा आहे. महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक घडामोडी आणि चालीरीती या सगळ्यांचे भान ठेवून, त्याचे परिणाम, बदलणारी परिस्थिती, अनिश्चितता, अस्थिरता, आक्रमणे, बदलणारे शासक व त्यांची धोरणे यातून 'अस्मितेचा' शोध घेणे, ही अवघड जबाबदारी लेखिकेने स्वीकारली आणि ती लीलया पेलली आहे. मोगल ते इंग्रज, बुडालेल्या 'शाह्या', बुडालेली मराठी–पेशवेशाही, यांची पाने उलगडून नेमका सार शोधण्यासाठी प्रचंड अभ्यासाची गरज होती. ती साधने मिळवणे, त्यांची संगती लावणे, आणखीच कठीण कर्म. परंतु लेखिकेने चिकाटीने, मेहनतीने या सगळ्यांवर मात केलेली आहे. नेमकेपणाने, विषयवार सुसंगत असे खंड करून विषयावरील पकड घट्ट ठेवलेली आहे. लिखाणात जो कसदारपणा असावा लागतो तो त्यांच्याकडे आहे, तसेच विषयावर जी हुकमत असावी लागते, ती त्यांच्या व्यासंगावरून लक्षात येते. त्यामुळे एक चांगले संदर्भमूल्य असलेले पुस्तक आपण वाचले याचा वाचक म्हणून आनंद आहेच, शिवाय ज्यांना या कालखंडाचा अभ्यास करायचा असेल त्यांच्यासाठी हे पुस्तक वाटाड्याचे काम नक्की करील, असे ठामपणे म्हणता येते.

या पुस्तकात विषयप्रवेश आणि प्रस्तावना यांचे मोल पुस्तकातील संदर्भाइतकेच महत्त्वाचे आहे. शेवटी नकाशे आणि संदर्भसूची दिलेली आहे. अभ्यासकांनी जरूर तिची नोंद घ्यावी. सतीश भावसार यांनी मुखपृष्ठ सजविलेले आहे. अस्मितेचे प्रतीक कसकसे बदलत गेले, चंद्राच्या वेळेप्रमाणे, त्याची सुरेख योजना मुखपृष्ठावर केलेली आहे.

**मूल्य १५० रु. सवलतीत १०० रु.**

# ग्रंथपान

**मुंबई...बंबई...बॉम्बे...**

**बाळासाहेब लबडे**



**अस्वस्थतेचे प्रतिबिंब उद्रेकाला कवेत घेणारे**

इथं काळ्या तव्यांवर भाजले जातात
चणेफुटाणे पानिपतासारखे
अशावेळी आपणच पेटवावीत लाकडे ढणढणा
मरीन लाईनच्या समुद्राला आग लावण्यासाठी

ही आहे कविता 'मुंबई...बंबई...बॉम्बे' या संग्रहातली. डॉ. बाबासाहेब लबडे यांचा हा कवितासंग्रह. ग्रंथालीने प्रकाशित केलेला, रसिक वाचक आणि चोखंदळ समीक्षक यांच्या पंसतीला उतरलेला. डॉ. बाबासाहेब लबडे हे स्वत: उत्तम समीक्षक आहे. रसास्वाद घेताना त्याकडे चहुबाजूंनी आत्मसात करावे लागते, तेव्हा त्या साहित्यकृतीतला गाभा सापडतो. लबडे असा गाभ्याचा शोध घेणारे समीक्षक आहेत तसे साहित्यिकही आहेत. त्यांची प्रकाशित झालेल्या साहित्याची यादी पाहिली तर, या विधानाला पुष्टी मिळते. कविता : महाद्वार, कविता गुहागरच्या, अभंग स्वरूप आणि चिकित्सा खंड १ व २, ग्रामीण साहित्य आणि एसईझेड अशी बारा पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. ज्यांची दखल जाणकारांकडून घेतली गेली, काही अभ्यासक्रमात स्वीकारली गेली. त्याच जाणत्या लेखक–कवीची ही साहित्यकृती म्हणजे 'मुंबई...बंबई...बॉम्बे' होय.

मागील पूर्ण वर्ष या कवितासंग्रहावर सातत्याने लिहून येत होते, चर्चा होत होत्या. त्यामुळे प्रकाशनापासून आजपर्यंत हा कवितासंग्रह चर्चेच्या पातळीवर सतत रसिक वाचकांच्या तोडीचा होता. त्यामुळे या संग्रहाविषयीची उत्सुकता आणि कुतूहल मोठे होते. त्याच उत्सुकतेपोटी हा संग्रह घेतला, वाचला आणि भावला, जसे तो आला त्याने पाहिले आणि त्याने जिंकले, अशी गत. मुंबई हे शहर कॉस्मोपॉलिटन शहर म्हणून ओळखले जाते. याला अनेक कंगोरे आहेत, पैलू आहेत. एखादी गूढ गुहा असावी जंगलाच्या मध्यभागी, तसे हे शहर आहे. दिसताना ते सिमेंटच्या इमारती, झोपडपट्टी, रस्त्यांचे जाळे, अनेक प्रकारची वाहने आणि उद्योगधंदे अशा भौगोलिक स्वरूपात दिसते. चारी बाजूंनी समुद्र दिसतो, या शहराला कवेत घेणारा, हे त्याचे भूषण म्हणता येईल. परंतु ही काही या शहराची खरी ओळख नाही. हा सांगाडा आहे, जो अभ्यासासाठी लॅबोरेटरीत वा प्रयोगशाळेत ठेवल्यासारखा दिसतो. ज्यालाच लोक जिवंतपणाची उपमा देतात. ही भाबडी समजूत असू शकते, पण ती नाकारता येत नाही. लोक हिलाच मुंबई म्हणून ओळखतात, हे सत्य आहे.

कवितेत आलेल्या कवितांचे सूक्ष्म अवलोकन केले तर लक्षात येते, मुंबईचा खरा गाभा कोणता आहे. वरलिया रंगाला न भुलता खरे अंतरंग कोणते आहे. जगणारी जितीजागती मुंबई कोणती आहे. ती दाखवली आहे कवी लबडे यांनी, त्यांना दिसली भावली, मनोमन खात्री देत त्यांच्या अंतरंगात उतरली ती मुंबई, जिचे नाव आहे मुंबई...बंबई...बॉम्बे!

ठाणे–मुंब्रा इथपासून मुंबईची हद्द सुरू होते. मग ती कुलाबा, मुंबई सेंट्रल, लालबाग, चैत्यभूमी, वांद्रे, अंधेरी, बीकेसी, सायन कोळीवाडा, वरळी असा सगळा बेटांचा भाग ही कविता आपल्या कवेत घेते. याच्या अंतरंगात राहणारा माणूस शोधून काढण्याचा प्रयत्न ही कविता करते. सतत घड्याळाच्या काट्यामागे धावणारा, माणुसकीला पारखा झालेला माणूस, घामाने तसा रक्ताने माखलेला माणूस, गिरणी बंद पडल्याने चळवळीबाहेर फेकला गेलेला, मूक–म्यान झालेला माणूस, संडास–मुतारी–गटार–नाल्याच्या सोबतीने राहणारा माणूस, संडास साफ करण्याच्या अटीवर राबणारा माणूस, स्वत:चे माणूसपण हरवलेला माणूस, गिऱ्हाईक होऊन वावरणारा माणूस... अशा असंख्य रूपांत वावरणारा माणूस या कवितेच्या केंद्रस्थानी आहे.

इथं जगणाऱ्या माणसाची अस्वस्थता, तगमग, टिकून राहण्याची धडपड, अठरापगड राज्यांतून आलेल्या माणसांनी स्थानिकाच्या अस्तित्वालाच नख लावले, त्याविरुद्ध आवाज उठवण्यासाठी धडपड, जमेल त्याच्या भाषेशी जुळवून घेत स्वत:चे जगणे पुढे रेटण्याची धडपड, या चक्रात माणूस हरवत चाललेला आहे. त्याविषयीची चीड, विषमतेची चीड, ही कवीला अस्वस्थ करते. हे सगळे पाहताना त्याच्या मनाची प्रचंड घालमेल होते. पाहावे तिथे ही अस्वस्थता त्यांना वेढून टाकते. जिथे जातो तिथे... अशी अवस्था. ते सारे कवीने आपल्या कवितेतून उद्रेक रूपाने व्यक्त केले आहे.

कवीचे निरीक्षण खूप तरल, खोल आणि आरस्पानी आहे. मुंबई सेंट्रलच्या रेडलाईट एरियात उभी असणारी, लालबाग–परळमध्ये नारायण सुर्वे, अण्णाभाऊ साठे यांची म्यान झालेली, सायन कोळीवाड्यात परप्रांतीयांना हुसकावू लावू पाहणारे स्थानिक, धारावीत वळवळणारे, राजाभाई टॉवर, मंत्रालय येथे टेबल लावून बसलेले, या सगळ्यात जगणे, व्यवहार, भ्रष्टाचार, आक्रमण, असहायता यांचे ओझे घेऊन वावरणारी अस्वस्थ माणसेच आहेत. त्यांचे वास्तववादी चित्रण अतिशय मार्मिकपणे कवितेत आले आहे. यात कवीच्या संवेदनशील मनाचा परिचय होतो, तसा त्या मनाचा कोंडमारा आणि त्यातून काही आशेची किरणे दाखवण्याचा प्रयत्न स्तुत्यच म्हणायला हवा. एकशे चौदा कविता, अभंग, काही लयबद्ध तर काही मुक्तछंदातील. या कविता केवळ वर्णन करत नाही, त्या चित्रणाचे घर वाचकाच्या मनात रुजवतात. बाबाराव मुसळे, सुनील कर्णिक यांनी केलेले कवी आणि कवितेचे कौतुक, कवीने स्वत: केलेले निवेदन या संग्रहाची भूमिका समजून घेण्यास उपयुक्त ठरते. राजू बावीस्करांनी केलेले मुखपृष्ठ आणि आतील रेखाचित्रे या संग्रहाच्या उठावदारपणात भर घालतात.

**मूल्य १६० रु.   सवलतीत ११० रु.**

# ग्रंथपान

**नदीष्ट**

**मनोज बोरगावकर**



**नदीकडे माय म्हणून पाहणारे मन**

''उन्हाळा-एन्ड टू-पावसाळा या कालावधीत रोडावलेली नदी उगीच अस्वस्थ करीत राहते. या दिवसांत तिथे अविरतपणे वाळूचा उपसा चालू असायचा... नदीच्या गाभ्यापर्यंत जखम करणारा. किती खोलवर इजा होत असेल नदीला? अबॉर्शनमुळे स्त्रीला होणाऱ्या इजेसारखीच! आपल्याला स्त्रीच्या गर्भापर्यंत जाता आले, पण गाभ्यापर्यंत कुठे जाता आले? स्त्रीच्या उदरात राहता आले, पण तिच्या काळजापर्यंत कुठे पोहोचता आले? म्हणूनच वाटते आपल्यासाठी आई असते कलेजाचा तुकडा, पण आईसाठी मात्र आपण अख्खे काळीज! एवढाच काय काळीजभर फरक आपल्या अन् आईच्या प्रेमात! त्या काळजाएवढ्या फरकातच केवढे काही दडले आहे.''

प्रा. मनोज बोरगावकर यांची ही कादंबरी. शीर्षक काहीसे गूढ आणि थोडेसे आकलनाची वाळू उकरायला लावणारे, तरी अतिशय समर्पक! अर्थात त्यासाठी या कथानकाच्या अंतरंगात उतरण्याची गरज आहे, नदीच्या प्रवाहात उतरण्यासाठी. या कथानकात अनेक व्यक्तिरेखा आहेत, परंतु त्या सगळ्यांना एकत्र आणणारी, जोडून घेणारी, नाते निर्माण करणारी व्यक्तिरेखा आहे गोदावरी नदी. ही तुडुंब भरून वाहणारी, आपली वेगवेगळी रूपे दाखवणारी नदी कधी आईच्या रूपात सगुण रूप धारण करते, तर कधी सर्व सोसत संथपणे निर्गुण रूपात विरक्त आत्ममग्न होत जाते. तिच्या अंगाखांद्यावर खेळणारा, तिच्याशी एकरूप होऊन तिच्या अंतरंगात स्वत:ला झोकून देणारा नायक, अशा या दोन व्यक्तिरेखांचा हा सजीव प्रवास म्हणजे नदीष्ट.

नदीचा परिसर, घाट, येणारी माणसे, मंदिर, झाडे, प्राणी ही दृश्ये आपल्या परिचयाची असतात. परंतु त्यांना सजीव रूप कथानकाच्या अंगाने लाभते, तेव्हा ही दृश्ये आपल्या संकल्पनांना छेद देत जातात. नदीत पोहणे ही कला आवडीशी जोडलेली असून भागत नाही. तिच्यात जिद्द, ध्यास, झोकून देण्याची वृत्ती असावी लागतेच, त्याचबरोबर त्या नदीशी तुमचे नाते मायलेकराचे असावे लागते. 'मायची वल्ली माया कधी मिळाली नाही पण गोदामाय मात्र रोज वल्लं करून अंगभर माया करते. इथं आल्यावर गोदामायच्या कुशीत उतरल्याशिवाय कधीबी परत जाऊ नका. बाबांनो, तिलाबी लेकराला जवळ घ्यावं वाटत असलंच की.' असं सांगणारा दादाराव हा नायकाचा पोहणे शिकवणाराच नव्हे तर नात्यातले नाते सांगणारा गुरू आपल्याला अंतर्मुख करून जातो. नदीकडे पाहण्याची दृष्टी आणि भाव बदलून टाकतो.

नदीशी नाते सांगणारा बामनवाड, मासे पकडणारा भोई नदीकाठी झालेला बलात्कार टाळू शकत नाही. स्वत:च्या कमजोरपणा आणि नदीविषयी तो भावना व्यक्त करतो, 'तिच्या डोळ्यांतल्या पाण्यापरीस नदीचं पाणी मला कमजोर वाटलं... गोदामायम्होरं इज्जत लुटताना त्यायला काई म्हणता काई वाटलं नाही... जिंदगीभर पोटापाण्याची सोय करणाऱ्या गोदामायलाबी माह्याविषयी काय वाटलं असल? तीबी बाईमानूसच हाय की!''

दादाराव आणि बामनवाड हे नदीच्या विषयीचे वेगळे तत्त्वज्ञान सांगतात. हे तत्त्वज्ञान त्यांच्या अनुभव व चिंतनाचे सार आहे. माणसाची लोभी, स्वार्थी आणि पापी वृत्ती यांना पोटात घेणारी नदी कधी रौद्ररूप धारण करते तेव्हा त्यापाठीही वेगळे तत्त्वचिंतन असते, हे या व्यक्तिरेखांच्या द्वारेच मांडले आहे.

सर्पमित्र प्रसाद याचे धाडशीपण प्रसंगी जिवावर बेतू शकते. त्यांच्या ठायी सापाविषयीचे असलेले ज्ञान आणि इजा न पोचवता त्याची करावयाची सुटका, याचे अनुभव आश्चर्यचकित करणारे आहेत. नदीच्या काठावर असलेल्या जंगलात माकड आणि हरीण यांच्यातला संघर्ष हा जीवनसंघर्ष जसा आहे तसा डार्विनच्या सिद्धांताची तीव्र प्रकटताही समजून सांगणारी आहे. कालूभैया आणि पुजारी यांचे नायकाशी असलेले नाते दूरस्थ असूनही जवळीक निर्माण करणारे आहेत. मांजरीविषयी असलेला राग व तिटकारा यातून भलताच प्रसंग ओढवला आणि सारे आयुष्यच उद्ध्वस्त झालेला भिकाजी याच नदीकिनारी भेटतो. सगुणा नावाची तृतीयपंथी याच नदीकिनारी तिच्या आयुष्याची परवड नायकासमोर मोकळेपणाने उघड करते. तिच्या आईचे गाव याच नदीच्या किनारी आहे. आईला भेटण्याची इच्छा आता ही नदीच्या दर्शनातून पूर्ण होईल, अशी भोळीभाबडी इच्छा ती व्यक्त करते, तेव्हा माणसाच्या जागी नदीच जवळची वाटते.

या सगळ्या व्यक्तिरेखा नायकाला नदीकाठी भेटतात. त्यांचे प्रत्येकाचे जगणे, वैशिष्ट्ये, भवताल यांचे वर्णन करताना लेखकाने केवळ त्या व्यक्तिरेखांचा आलेख साकारला असे नाही, त्यासोबत नदी ही व्यक्तिरेखा जोडून घेतली आहे. नदीचे बाह्यरूप आणि अंतरंग याच्याशी जोडून घेताना मानवी मन, भावना यांची सांगड घातलेली आहे. नदीचे ऐसपैस असे पात्र, त्यात असलेली व्हर्जिन जागा, त्या ठिकाणची वाळू काढण्यासाठी प्रयत्न, हे सारे दृश्यचित्रणात येते, परंतु त्याचवेळी लेखक नदीच्या अंतरंगाइतकाच मानवी मनाचा शोध घेत आहे. त्यातले प्रवाही, नितळ, गूढपण शोधण्याचा प्रयत्न करत आहे असे यातून दिसून येते. सतत वेळी-अवेळी, कुठल्याही ऋतूत नदीवर पोहायला जाणारा नायक पोहण्याच्या ओढीने जातो असे म्हणण्यापेक्षा एक लेकरू मायेच्या ओढीने आईकडे जाते, असेच म्हणावे लागेल. या ओढीत जशी आत्मीयता आहे तशी लेखक म्हणून प्रा. मनोज बोरगावकर यांच्याकडे चिंतन, तत्त्वज्ञान, अभ्यासू, अनुभव आणि भावना यांची गुंफण सुरेखपणे करण्याची प्रतिभादेखील आहे. त्यामुळेच अतिशय सुंदर चित्रण वास्तवाचे भान देत एका भावबंधनाशी आणून पूर्ण केले आहे. तरी त्यांचा प्रवास अजून पुढे आहे, असा संकेत यातूनच मिळतो. एक चांगले लेखन वाचल्याचा आनंद देणारे हे पुस्तक आहे, तशी लेखकाची ग्वाही देणारेही आहे. नयन बारहाते यांचे मुखपृष्ठ आणि मांडणी आशयसंपन्न आहे.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

**उत्कृष्टतेचा ध्यास**
**डॉ. आर.डी. लेले**




**ध्यासाचा आकृतिबंध**

''एकदा आपण तन्मयतेनं एखादी गोष्ट मनावर घेतली तर आपला स्वाभाविक कल त्याकडं असो किंवा नसो, त्या कामात आपण यशस्वी होतोच. वैद्यकीय क्षेत्रातलं एक महत्त्वाचं तत्त्व म्हणजे तुम्हाला माणुसकीचा गहिवर असला पाहिजे. तुम्ही माणूसघाणे असाल आणि माणसांबद्दल सहसंवेदना नसेल तर तुम्ही रोगाचं निदान करू शकता, पण चांगले डॉक्टर होऊ शकत नाही. म्हणून वैद्यकीय क्षेत्रात जाण्यासाठी माणूसकीचा दृष्टिकोन आणि सहवेदना असणं आवश्यक आहे.'' (पृ. क्र. ११)

आत्मकथनाकडे नेहमी एक दस्तऐवज म्हणून पाहिले जाते. यातून त्यावेळची सामाजिक, राजकीय परिस्थिती समजून घेण्यास मोठी मदत होते. आहे त्या परिस्थितीतून वाट काढीत स्वत:ला सिद्ध करणाऱ्याच्या कसबाची लागलेली कसोटी इतरांसाठी मार्गदर्शक ठरू शकते. असामान्य कर्तृत्व असलेल्या व्यक्तीचे कथन असेल तर ते नेहमीच प्रेरणादायी असू शकते. डॉ. रा.द. लेले यांचे आत्मकथन हे यात चपखल बसणारे आहे. वैद्यकीय क्षेत्रात येऊ पाहणाऱ्या आणि सध्या याच क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सर्वांना हे आत्मकथन मार्गदर्शक आहेच परंतु ते प्रेरणादायी देखील आहे.

हैद्राबाद ही निजामशाहीची राजधानी. स्वातंत्र्यपूर्वकाळात येथे निजामाची सत्ता होती. मराठवाडा, तेलंगणा, आंध्र असा मोठा भूभाग या राज्यात समाविष्ट होता. स्वातंत्र्यानंतरही हे राज्य स्वतंत्र ठेवण्याचा निजामाचा अट्टाहास होता. तो नंतर भारत सरकारने लष्करी बळाने मोडून काढला. या काळात झालेले मुक्तिसंग्राम, निजामाची भूमिका, स्वामी रामानंद तीर्थ यांसारखे स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करणारे नेते, चळवळी, विद्यार्थ्यांचा यात असलेला सहभाग, त्यावेळचे उर्दू भाषेतून दिले जाणारे शिक्षण, असा रंजक इतिहास डॉ. लेले यांनी थोडक्यात वाचकांसमोर ठेवलेला आहे. डॉ. लेले यांचे बालपण आणि एमबीबीएसपर्यंतचे शिक्षण हैद्राबादमध्ये झालेले. त्यामुळे त्यावेळचे प्रत्यक्ष अनुभवलेले सामाजिक, शैक्षणिक, राजकीय वातावरण त्यांच्या चरित्राचा व्यापणारा एक भाग आहे, तो त्यांनी इथे दिलेला आहे. उर्दू भाषा याचबरोबर मराठी, इंग्रजी, हिंदी, तेलगू या भाषाही त्यांना अवगत आहेत. वैद्यकीय व्यवसायात भाषेचे महत्त्व त्यांनी विषद केलेले आहे, ''रुग्णाला डॉक्टरबद्दल विश्वास वाटायला हवा असेल तर भाषा ही अतिशय महत्त्वाची आहे. तुम्ही वैद्यकीय व्यवसाय करत असाल तिथली प्रादेशिक भाषा येणं अतिशय गरजेचं आहे.'' (पृ. क्र. ३२)

अणुऊर्जेचा उपयोग वैद्यकीय उपचारासाठी करणे शक्य आहे, आणि तो भारतात शक्य आहे, यासाठी जे प्रयत्न झाले, त्यात डॉ. लेले यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. 'न्यूक्लियर मेडिसिन' ही संकल्पना भारतात प्रथम प्रत्यक्षात आणणारे डॉ. लेले या थिएरीचे जनक ठरले आहेत. मुंबईत जसलोक हॉस्पिटल हे या दृष्टीने परिपूर्ण असे हॉस्पिटल आहे, त्याचे श्रेय डॉ. लेले यांच्याकडे आहे. अर्थात या अणुऊर्जेचे श्रेष्ठत्व सांगताना डॉ. होमी भाभा यांच्या कर्तृत्वाचा, त्यांच्या संशोधनाचा ते अभिमानाने उल्लेख करतात.

हैद्राबाद, औरंगाबाद, मुंबईतील जेजे, जसलोक, लीलावती आणि परदेश असा त्यांचा प्रवास झाला. ग्रामीण भाग, ग्रामीण रुग्णालये ते जसलोक अशा शासकीय, निमशासकीय रुग्णालयांशी ते जोडलेले राहिले. तरी येथे उत्तमातले उत्तम असे जे जे करणे शक्य आहे, ते त्यांनी केलेले आहे. त्यामुळे ही रुग्णालये सर्व सुविधांनी युक्त झाली आहेत. त्यांच्या उत्कृष्टतेच्या ध्यासाची, उत्तम उपचारांची, व्याख्यानांची, शिकवण्याची अंगभूत जी वैशिष्ट्ये आहेत, त्यामुळे केवळ ते हॉस्पिटल एवढ्याच मर्यादेत राहिलेले नाहीत. त्यांनी भाषा, संगीत, क्रिकेट, लेखन, संशोधन अशा हॉस्पिटलच्या मर्यादेपलीकडील गुणांचीही जोपासना अतिशय उत्साहाने आणि रसिकतेने केलेली आहे.

रुग्ण आणि डॉक्टर यांच्यातील संबंध, कॅन्सर, हृदयरोग यासारखे आजार, डॉक्टरांवर होणारे हल्ले आणि त्यासाठी असलेले कायदे, मेडिकल कौन्सिल, अनिष्ट प्रथांची लागण, अशा विषयांची सामान्य वाचकाला, रुग्णाला वाटणारी उत्सुकता व कुतूहल यांचे समाधान डॉ. लेले यांनी उत्तराच्या स्वरूपात केलेले आहे.

डॉ. लेले यांनी आतपर्यंत लिहिलेल्या पुस्तकांची संख्या बारा आहे. ही सर्व वैद्यकशास्त्रांशी संबंधित आहेत, परंतु त्यांची वैशिष्ट्ये आणि उपयुक्तता ही केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही सिद्ध झालेली आहेत. त्यांचा समावेश अभ्यासक्रमात देखील आहे. सतत संशोधन, त्यात असणारी उत्कृष्टतेची आत्मीयता, या क्षेत्राविषयी असणारी दूरदृष्टी आणि रुग्णाविषयी असणारी अपार आपुलकी याची दखल 'पद्मभूषण' या सन्मानाने घेतली आहे.

एक चांगलं आत्मकथन डॉ. राजेंद्र आगरकर, चंद्रकांत मेंहेदळे, राधिका कुंटे आणि मेधा आलकारी यांच्यामुळे वाचकांसमोर आले आहे. हे शब्दांकन असून यात या मंडळींची कुशलता दिसून येते. डॉ. लेले स्वत: हेच याचे लेखक आहेत याचे भान कुठेही सुटलेले नाही. लेखनातला प्रवाहीपणा, मांडणी, उपशीर्षके, आवश्यक तिथेच इंग्रजी शब्द, फोटो, परिशिष्टे यामुळे एक चांगले आत्मकथन साकारल्याचा आनंद मिळतो. एका तपस्वी व्यक्तित्वाशी परिचित झाल्याचा आनंद मिळतो. उत्कृष्टतेचा ध्यास म्हणजे काय त्याचा सप्रमाण आकृतिबंध म्हणजे डॉ. रा.द. लेले, त्यांचे छायाचित्र घेऊन सतीश खानविलकर यांनी सुरेख मुखपृष्ठ सजविले आहे.

**मूल्य ४०० रु.   सवलतीत २५० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**अनवट निवडक गोखले**

**लेखन-संपादन**

**नीला वसंत उपाध्ये**




**बिनीच्या नवकथांचे भांडार!**

भय्याच्या लेकीचे म्हणजे चित्राचे लग्न ठरले आहे ते केसकरांच्या बाळासाहेबाबरोबर. सगळी तयारी झाली आहे. भय्याच्या घरी त्याची धांदल सुरू आहे. मात्र केसकरांच्या वाड्यात सगळी सामसूम आहे कारण दत्तूकाकांची प्रकृती अ‍ॅटॅकमुळे शेवटच्या घटकेवर आलेली आहे. त्यांना वाचवण्यासाठी तिकडे धावपळ सुरू आहे. भय्याला वाटतं, दत्तूकाकाला दवाखान्यात दाखल करावे आणि औषधपाण्यावर जगवण्याचा प्रयत्न करा व त्या वेळेत लग्नाचा बार उडवून मोकळे व्हावे. त्याला लेकीच्या लग्नाची चिंता तर तिकडे दत्तूकाकाच्या जीवाची चिंता. शेवटी दत्तूकाकांची पत्नी पुढाकार घेते, असे हे 'विघ्नहर्ती' कथेचे कथानक. परंतु यात आलेले ताणतणाव, मानवी समूहाचे वागणे, शेवटपर्यंत खिळवून ठेवणारी भयानकता यांची ताकद वाचकाला आपल्या कवेत घेण्यास पूर्णपणे सक्षम ठरलेली आहे. या कथेच्या अनुषंगाने सुप्रसिद्ध साहित्यिक भारत सासणे यांनी केलेले वर्णन पहा, '' 'चित्रदर्शी रेखीवता' हे या कथेचे गुणवैशिष्ट्य असल्यामुळे मनःपटलावर ही कथा सुस्पष्ट अशी उमटलेली आहे. व्यक्ती आणि व्यक्तीचे मन याबाबत आधुनिक कथाकारांनी आस्था दाखविण्यास सुरुवात केल्यानंतर प्रामुख्याने अरविंद गोखले यांनी व्यक्तीचे मनोविश्लेषण आपल्या लघुकथांतून सखोल पद्धतीने मांडण्यास सुरुवात केली. मनाच्या अथांग अशा विश्वाची ओळख तत्कालीन आधुनिक वाचक-रसिकांना करून देण्याचे श्रेय अरविंद गोखले यांना द्यावेच लागते.'' (पृ.क्र.११७)

छबू डोईफोडे हा गाव सोडून मुंबईत आला. जगण्यासाठी इथे धडपडल्याशिवाय काहीच मिळत नाही. छबू एक छानसा व्यवसाय सुरू करतो. प्रेतावर घातलेली फुले उचलून बाजूला करायची, तीच फुले बाजारात जाऊन विकायची. एक कायमचा व्यवसाय. या कथेस अनुसरून कवयित्री 'नीरजा' लिहितात, ''अरविंद गोखले 'फूलछबू' या कथेत मानवी श्रद्धांनाच छेद देताना दिसतात. जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षात, शेवटी स्वतःला जिवंत ठेवणं, हेच माणसासाठी जास्त महत्त्वाचं ठरतं. आयुष्यातील ही व्यस्तता (अ‍ॅबसर्डिटी) गोखले यांनी 'फूलछबू' या कथेत नेमकी टिपली आहे.'' (पृ.क्र.२४८)

'मांसाचा गोळा' म्हणजे बाळ; आईबापांना कृतार्थतेचा आनंद, समाधान देणारे पोटचे पोर, परंतु दुष्काळ वणव्यासारखा पेटलेला. खायला अन्नाचा कण नाही. आईच्या पोटातच काही नाही तर या बाळाला ती दूध कुठून, कशी पाजणार. त्याला जगवायचे आणि स्वतःही जगायचे तर हे बाळ विकायचे. त्यातून येणारे पैसे गुजराण करण्यासाठी वापरायचे. पारूला आई म्हणून हा निर्णय अमान्य आहे परंतु नवरा रामापुढे तिचे काही चालत नाही. दुष्काळी वातावरण, जगण्याची भ्रांत आणि मानवी मनाची तडफड याविषयी कवी व कथाकार किरण येले लिहितात, ''अरविंद गोखले त्यांच्या कथेत भावनांचे उदात्तीकरण करायचं टाळून, सतत आपल्या कथेचा प्रकाशझोत कथाबीजावरच ठेवताना दिसतात. वाचकांना भावविभोर करतील अशा अनेक जागा 'मांसाचा गोळा' मध्ये आहेत; पण वाचक शरणता नेहमीच निर्धाराने टाळणारे गोखले त्या साऱ्या जागा सहजपणे टाळतात. 'मांसाचा गोळा' ही कथा गोखल्यांमधील ठाम व धाडसी लेखकाचं अप्रतिम दर्शन घडवते. (पृ.क्र. २८०-२८१)

'वैर' या कथेतील अकुंशराव देसाई अजात शत्रू, सगळ्यांचे स्नेही, व्यक्तीद्वेष नावाची गोष्टच त्यांच्या कोशात नसलेले, एक वेगळेच प्रसन्न, तत्पर, आजर्वी व्यक्तिमत्त्व. सुचेता ही त्यांची मुलगी. तिच्या सुखाचा सतत विचार करणारे. तिच्यासाठी सुधीर हा योग्य वर आहे, त्याच्याशी तिचे लग्न व्हावे ही त्यांची इच्छा. परंतु सुधीर शामा नावाच्या मुलीशी लग्न करून येतो. शामाने जणू सुचेताचे सर्वस्व हिरावून घेतले अशी समजूत करून घेणारे अंकुशराव पुढे पूर्णपणे बदलतात. सुधीर व शामा यांच्याशी वैर धरल्यासारखे वागू लागतात. या कथेविषयी सुप्रसिद्ध लेखक गणेश मतकरी मत व्यक्त करतात, अरविंद गोखल्यांची 'वैर' ही कथा एका सज्जन माणसाच्या नैतिक ऱ्हासाचा वाचकाला अस्वस्थ करणारा आलेख आहे. ती जितकी घटकांमधून उलगडते, तितकीच अंकुशरावांच्या मनातही नीतिमत्तेबद्दलच्या आपल्या पारंपरिक कल्पनांना हादरा देणारी 'वैर' ही कथा निःसंशय अरविंद गोखले यांच्या श्रेष्ठ कथांमधली एक आहे. (पृ.क्र.३०४)

'अनवट निवडक गोखले' हा नीला उपाध्ये यांनी अरविंद गोखले यांच्या जन्मशताब्दीनिमित्त सिद्ध केलेला हा दुसरा ग्रंथ होय. अरविंद गोखले हे नवकथाकारांमधील एक बिनीचे नाव. त्यांच्या कथा वाचकांची एक पिढी होती. त्या कथांनी जे वेगळेपण या साहित्य क्षेत्रात सिद्ध केलेले आहे, त्याची मोहिनी आजही कायम आहे. नीला उपाध्ये यांनी पहिल्या खंडात अरविंद गोखले यांच्याविषयीचा समग्र धांडोळा घेतला होता. त्यात साहित्य, समीक्षा, व्यक्तिमत्त्व, आठवणी यांचा समावेश होता. या दुसऱ्या खंडात मात्र पंचवीस कथा आहेत. मात्र त्या निवडण्यात एक वेगळा प्रयोग केला आहे. 'कथा' या विषयाशी ज्याचे नाते जवळचे आहे, अरविंद गोखले यांच्या कथा ज्यांनी वाचलेल्या आहेत, अशा साहित्यिकांकडून, अरविंद गोखले यांच्या आवडलेल्या कथा, त्यांच्या मतासह मागविल्या आणि त्या आवडलेल्या, वेगळेपण असलेल्या कथांचा हा संग्रह वाचकांच्या हाती दिलेला आहे. या कथांचे वेगळेपण, त्यांच्यातील विविधता, लेखक म्हणून केलेले प्रयोग, हे सगळे वाचताना आपण एका वेगळ्याच जाणिवेने चिंब होतो. कथा हा प्रकार कशा अंगांनी समृद्ध करता येतो याचे पाठ हा संग्रह देतो. एक उत्तम संग्रह वाचकाच्या हाती देताना उपाध्ये यांनी जणू समग्र गोखलेच हाती दिले आहेत असे वाटते. सुरेखा सबनीस आणि किरण येले आणि नीला उपाध्ये यांनी व्यक्त केलेल्या विवेचनातून गोखलेंचे समृद्धपण अभ्यासपूर्णपणे व्यक्त झालेले आहे. सतीश भावसारांनी मुखपृष्ठावर अरविंद गोखले यांचे छायाचित्र घेतले आहे, जे व.पु. काळे यांनी टिपलेले आहे.

**मूल्य ४०० रु.  सवलतीत २४० रु.**

# ग्रंथपान

## सृजनशील जगन्मित्र

**शुभांगी नितीन मुळे**




**'स्वत:तील अवकाश'**

''खेडं कशाशी खातात याची कल्पना नसलेले लोक जर भारतीय प्रशासकीय सेवेत येत असतील तर कसं काय होणार? टाय बांधणं काय सहज शिकता येण्यासारखी गोष्ट आहे, पण तुम्हाला खेडं समजलं नाही तर निर्णय कसे घेणार?'' (पृ.क्र.३५) प्रशासकीय सेवेची प्रदीर्घ काळ सेवा पूर्ण करून सेवानिवृत्त झालेल्या डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या प्रशिक्षण काळातला त्यांच्या सहकाऱ्यांना केलेला रोकडा सवाल. या सवालात त्यांचा आपल्या जाणिवांचा, कार्याचा दृष्टिकोन व्यक्त होतो, तसा खेडे, आपली माती यांच्याविषयी असलेल्या नात्याचा घट्ट पीळ लक्षात येतो.

डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांची प्रदीर्घ प्रशासकीय सेवा ही विदेशात झाली. जपान, सिरिया, रशिया, अमेरिका, मॉरिशस, मालदीव हे त्यातले प्रमुख देश. अनेक जबाबदार व महत्त्वाच्या पदांवर सेवा पूर्ण केली. डिप्लोमॅट, सचिव, अवर सचिव, परराष्ट्र सेवा सल्लागार, काऊन्सिल जनरल ऑफ इंडिया ही ती पदे होत. याविषयी त्यांचे विश्लेषण लक्षात घेण्यासारखे आहे, ''एक आदर्श डिप्लोमॅट जो असतो तो आपल्या देशाचं विश्लेषण, महत्त्व अधिक अचूक दुसऱ्या देशापुढे ठेवतो, जिथे त्याची नेमणूक होते. एका अर्थानं डिप्लोमॅट हा पूल असतो आणि तो किती विविध प्रकारचे पूल आपल्या कारकिर्दीत बांधतो याच्यावरून त्याच्या यशाचं खरं मूल्यमापन करता येतं.'' (पृ.क्र.५४)

डॉ. ज्ञानेश्वर मुळे हे ग्रामीण भागातून आलेले, मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेले चौथी, एसएससी, बीए आणि एमएलएस या सारख्या सर्व परीक्षांमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेले, हीच परंपरा त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतही कायम राखली. १९८२ साली या परीक्षेत ते भारतात सर्वप्रथम आले होते. पुण्यात डेप्युटी कलेक्टर म्हणून नेमणूक झाली आणि त्याच दरम्यान १९८३ला त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या आयएफएसला गवसणी घातली. तल्लख, कुशाग्र, तैलबुद्धी असलेल्या डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी यशस्वी कारकीर्द, यशस्वी समृद्ध जीवन आणि समर्पित भावना यांच्या सर्व मर्यादा कसाला लावल्या. एक उत्तम व्यक्तिमत्त्व म्हणून लौकिक प्राप्त केला, उत्तम प्रशासक म्हणून ओळख निर्माण केली. अमेरिकेत 'कॉन्सुलेट तुमच्या दारी' ही आगळीवेगळी योजना राबविण्याचा पहिला मान त्यांच्याकडे आहे. भाषा, संस्कृती यांना प्रोत्साहन देण्याचे कार्य त्यांनी केले. जपानमधील वास्तव्यात त्यांनी केलेल्या प्रयत्नामुळे टोयोटो, होंडा, सुझुकी इ. कंपन्यांच्या भारतातील गुंतवणुकीचा मार्ग अधिक सुकर झाला.

२०१३ साली मालदीव इथे घडलेला प्रसंग हा त्यांच्या प्रशासकीय आणि माणसुकीच्या कसोटीचा क्षण होता. मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद नशीद यांनी भारतीय दूतावासात स्वतःचा जीव वाचविण्यासाठी आश्रय मागितला, तेव्हा या आकस्मिक संकट कोसळलेल्या राष्ट्राध्यक्षांना पाहुणा म्हणून नऊ दिवस सुरक्षित आपल्या कार्यालयात राहण्याची व्यवस्था डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी केली होती. इतकेच नव्हेतर या राष्ट्राध्यक्षांना गुप्त इच्छित स्थळी सोडण्याची जबाबदारी पार पाडली.

डॉ. ज्ञानेश्वर मुळे हे उत्तम कवी आहेत. कविता हा त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय. मराठी आणि हिंदी अशा दोन्ही भाषेत त्यांचे कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. 'जोनाकी', 'रस्ताच वेगळा धरला', 'स्वतःवरील अवकाश', 'श्री राधा', 'ऋतू उग रही है', 'अंदर एक आसमान', 'मन की खलीहानोने', 'सुबह है की होती नही', 'शांती की अफवाये', या कवितासंग्रहां सोबतच त्याची गद्य लेखनाची सहा पुस्तके प्रकाशित आहेत. इंग्रजी, मराठी, हिंदी वर्तमानपत्रातूनही त्यांनी सदर लेखन केलेले आहे.

डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या कारकिर्दीत अनेकांचा त्यांच्याशी अनेक कारणांनी संपर्क राहिला. विदेश भेटीवर असताना मुख्यमंत्री, पंतप्रधान, परराष्ट्रमंत्री यांच्या भेटीचे नियोजन करण्याची जबाबदारीही त्यांना पार पाडावी लागलेली आहे. या सगळ्यांचे वेगवेगळे अनुभव इथे आलेले आहेत. राष्ट्रपती ग्यानी झेलसिंग, राष्ट्रपती प्रतिभा पाटील, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढलेले गौरवोद्‌गार, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयीची आदरयुक्त भावना, हे सारे अभिमान वाटावा असेच आहे. डॉ. मुळे यांच्या पत्नी साधनामॅडम यादेखील इंडियन रिव्हेन्यू सर्व्हिसमध्ये इन्कम टॅक्स विभागात प्रिन्सिपल कमिशनर म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी डॉ. मुळे यांच्याविषयी व्यक्त केलेल्या भावना व त्यांना भावलेले डॉ. मुळे यांचीही नोंद या पुस्तकात घेतलेली आहे.

एक प्रशासक, साहित्यिक, कुटुंबवत्सल गृहस्थ, सामाजिक-राजकीय जाणिवा जागृत असलेला सजग, सकारात्मक ऊर्जा असलेला प्रेरणा स्त्रोत, अनेक वैशिष्ट्यांचा मेरू असलेले डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचा समग्र परिचय करून देणे अवघड आहे. पस्तीस वर्षांचा प्रदीर्घ अनुभव सविस्तर मांडायचा तर तो खंडात्मक ग्रंथातून मांडावा लागेल. कर्तृत्ववान माणसाचे कर्तृत्व हे त्याच्यासारखेच मोठे असते. ते मोठ्या नेटाने आणि प्रयत्नपूर्वक लेखणीत पकडण्याचा प्रयत्न शुभांगी नितीन मुळे यांनी केलेला आहे. अनेकांच्या मुलाखतींमधून अनुभवांच्या आधाराने हे व्यक्तिमत्त्व पूर्णत्वाने साकारलेले आहे. प्रत्येक प्रकरणाला त्यांनी दिलेली शीर्षकं अतिशय सुंदर आणि योग्य आहेत, ज्यातून त्यात्या वैशिष्ट्यांची ओळख स्पष्ट होते. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर हा डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या सुंदर-सुंदर वैशिष्ट्यपूर्ण छटा पुस्तकाच्या माध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचवण्याचा अल्पसा पण सुंदर प्रयत्न!

चित्रकार सतीश भावसार यांनी डॉ. मुळे यांचा फोटो समोर ठेवून छानसे मुखपृष्ठ तयार केले आहे.

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान

## प्रश्न आणि प्रश्नचिन्ह?

**नरेंद्र लांजेवार**




**उत्तराच्या शोधातले प्रश्न**

''ज्या महाराष्ट्राने देशाचे स्वातंत्र्य चळवळीत नेतृत्व केले, तोच महाराष्ट्र आज सहिष्णुतेला पारखा झाला, हे प्रगतीचे नव्हे तर अधोगतीचे लक्षण आहे. गावोगावी उभ्या राहिलेल्या संस्काराच्या मठाधिपतींनी, संस्कृतीच्या ठेकेदारांनी आपल्या मूळ सहिष्णुतेच्या विचारांपासून फारकत घेतल्याने महाराष्ट्रात वैचारिक दारिद्र्य वाढत चालले आहे. एकवेळ महाराष्ट्राचे आर्थिक दारिद्र्य कर्जबाजारीतून दूर करता येईलही परंतु महाराष्ट्राचे आज वाढत असलेले वैचारिक दारिद्र्य कसे भरून काढावयाचे?'' (पृ. क्र. ६४)

'प्रश्न आणि प्रश्नचिन्ह' हे नरेंद्र लांजेवार यांचे पुस्तक, पन्नास लेखांचा संग्रह असलेले, लेखकाच्या शब्दांत सांगायचे तर ह्या लेखांचा दुसरा संग्रह. पहिला संग्रह 'सल उकल' प्रकाशित झालेला आहे. दैनिक 'देशोन्नती'मध्ये सातत्याने केलेल्या सदर लेखनाचे हे दोन भाग. सदर लेखनाला अनेक मर्यादा असतात. तरी त्यातला आशय हा त्या त्या काळाचा, घटनांचा, संस्कृतीचा धागा धरून अतिशय नजरेआड करता येत नाही. तेच महत्त्व लक्षात ठेवून 'ग्रंथाली'ने हे दोन लेखसंग्रह प्रकाशित करण्यात उत्सुकता दाखविलेली आहे. नरेंद्र लांजेवार हे मुक्त पत्रकार आहेत. आपल्या भोवती भोवंडून टाकणाऱ्या घटकांनी त्यांच्यातल्या पत्रकाराला डिवचले नसते तरच नवल होते. गाफिल माणसाला फार काळ गाफिल नाही राहता येत. तसे पत्रकाराला सलणाऱ्या गोष्टींकडे नाही डोळेझाक करता येत. अन्याय, खोटे, दांभिक, अत्याचार, शोषण, भेदाभेद, राजकारण, शेती, शिक्षण, धर्म, नदी, भक्ती, पुस्तक, वाचन असे असंख्य विषय आहेत. रस्त्यावर पेरलेल्या काट्यांसारखे, पेटलेल्या निखाऱ्यासारखे, भावनांच्या गोठून गेलेल्या नद्यांसारखे, कशी डोळेझाक करावी, त्यातून नरेंद्र लांजेवार हे संवेदनक्षम व्यक्तिमत्त्व; वाचन, लेखन, साहित्य, ग्रंथालय या सारख्या क्षेत्रात सतत वावरणारे, त्यात स्वतःला पूर्णपणे झोकून दिलेले, इतके की त्यांना त्यापासून वेगळे करता येणे अशक्य आहे. आतापर्यंत प्रकाशित झालेले त्यांचे साहित्य आणि त्यातले विषय पाहिले असता हे व्यक्तिमत्त्व इतरांहून खूप वेगळे आहे हे लक्षात येते. सभोवतालचे वातावरण पाहून त्यांच्या संवेदनशील मनाला, भावनांना ज्या यातना होत आहेत, त्यांचा उद्रेक म्हणजे हा लेखसंग्रह आहे असे म्हणता येईल.

'बारोमास' ही सदानंद देशमुख यांची अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरी. शेतकरी अनेक प्रश्नांनी बाराही महिने घेरलेला असतो. वीज, पाणी आणि रास्तभाव एवढ्या माफक अपेक्षा असलेला हा शेतकरी कायम– बाराही महिने दुर्लक्षित राहिला. मग त्याने आत्महत्येचा मार्ग स्वीकारला तर त्यात त्याची चूक काय? माणूस जीवावर उदार होतो म्हणजे काय? या प्रश्नाला भिडताना लांजेवार विचारतात, शेतकऱ्यांसाठी नको, शेतीसाठी वेतन आयोग का नको? या आत्महत्या थांबणार कशा? शेतकऱ्यांकडे गांभीर्यपूर्वक संवेदनशील मनाने डोळे उघडे ठेवून कधी पाहणार आहात?

'स्त्री' हा समाजातला दुसरा घटक. हा घटक पुरुषी मानसिकतेचा शिकार ठरलेला, युगानुयुगे त्यात बदल घडताना कुठे दिसत नाही. वर्तमानपत्रांचे मथळे रोज त्यांच्यावरील अन्यायाने दुथडी भरून वाहात आहेत. त्यांच्यावर अन्याय करण्यात कुठला आलाय पुरुषार्थ? त्यात विटाळ नावाची गोष्ट, चतुष्पाद प्राण्यांना असलेल्या शेपटीसारखी कायम चिकटलेली. एका बाजूला गंगा शुद्धिकरणाच्या मोठमोठ्या गोष्टी करायच्या, त्याआधी मन शुद्धिकरणाच्या गोष्टी कधी करणार? पोस्टाने गंगाजल मागवून ते प्यायचे, सर्व पापातून मुक्त होऊन पुण्य लाभल्याचे खोटे समाधान मिळवायचे, हा दांभिकपणा नाही का?

राजकारणाने भावनाशून्यतेचा तळच गाठला आहे. धर्माचे राजकारण करायचे, जातीचे राजकारण करायचे, गुणवंत विद्यार्थ्यांचे राजकारण करायचे, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे राजकारण करायचे, एक क्षेत्र सोडलेले नाही, जिथे राजकारणाने आपले राक्षसी पंजाची नखे रुतवलेली नाहीत. बेरोजगारी निर्मूलन, नवीन रोजगारांची निर्मिती, नवीन समाज घडवण्याची तळमळ, आदर्शांची जपणूक, ज्ञानकेंद्रांचा विकास, संस्कृतीचे जतन यांसारखे विषय जणू आपले नाहीतच, अशी त्यांची वृत्ती. मग महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणायचे ते केवळ त्यांची नावे घेण्यापुरते? रोहित वेमुलासारख्या प्रकरणाकडे पाहिले तर आपण कुठल्या संस्कृतीकडे चाललो आहोत, अशी भयचकित शंका उभी राहते. कोपर्डीचे प्रकरण पाहता सुरक्षित इथे आहे कोण? असा प्रश्न उभा राहतो.

प्रश्न खूप आहेत, त्यांच्याकडे आपण पाहतो कसे, त्यावर त्यांचे अस्तित्व अवलंबून आहे. नरेंद्र लांजेवार यांनी लेखसंग्रहाला दिलेले शीर्षक किती समर्पक आहे, त्याची प्रचिती हा संग्रह वाचताना येते. लांजेवारांची लेखणी धारदार आहे, ती शल्यविशारदासारखी अचूक वर्मावर प्रहार करते. परंतु त्याचवेळी तिला अमृताचा वसा लाभलेला आहे, तिच्यावर संवेदनशील संस्कृतीचे संस्कार आहेत. त्यामुळे वेदना देणारा सल उकरून काढताना ते हळुवारपणा जपतात. डॉ. बाबासाहेबासारख्यांच्या व्यासंगाचे उदाहरण पुढे करीत सृजनाकडे सर्जकतेने घेऊन जाण्याचा प्रयत्न करतात. टीका करणे सोपे असते, तिला सोडवता आले पाहिजे. लांजेवार ती गाठ सोडवू पाहतात. त्यामुळेच हे लेख मनाला थेट भिडतात.

डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनीही या लेखांचे कौतुक केले आहे. लांजेवारांनी स्वतःची भूमिका मांडली आहे. सतीश भावसार यांनी समर्पक मुखपृष्ठ तयार करून दिलेले आहे.

**मूल्य १८० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

**साद हिमालयाची**
**वसंत वसंत लिमये आणि हिमयात्री**




**अनवट वाटेवरून दिव्यत्वाकडे**

''लदाखमध्ये कोणीही नवशिक्यानं जरी फोटो काढला तरी उत्तमच येतो असं म्हणतात. 'श्योक' नदीची गाज, विस्तीर्ण खोऱ्यात भळभळ वाहणारा थंड वारा आणि मावळत्या लालसर सोनेरी किरणांनी रंगून गेलेले लदाखी पहाड. लदाखमध्ये शेवटच्या मावळणाऱ्या हिमयुगात निसर्गाचा उत्पात जणू हजारो–लाखो वर्षांपूर्वी थिजल्यासारखा भासतो. 'शयनकोन' साधलेले तरीही ढासळतील असे मातीचे उतार. कपच्या कपच्यांचे धारदार खडक, पिवळा, मातकट, लालसर जांभळा अशा अनेकरंगी मातीचे डोंगर मैलान्मैल पसरलेलं शुष्क वाळवंट. सारंच अतिशय अस्थिर भासतं. निसर्ग शिल्पकार तर सूर्य चित्रकार!'' (पृ.क्र.१२८)

ट्रेकिंग आणि रॉक क्लायमिंगचा उदंड अनुभव असलेले नाव म्हणजे वसंत वसंत लिमये. सह्याद्री, युरोप, हिमालय इकडे अनेकदा या मोहिमा यशस्वी करणारे निष्णात आणि कुशल नाव म्हणजे वसंत वसंत लिमये. याच छंदाशी जोडलेल्या 'रानफूल' आणि 'हाय प्लेसेस' या संस्थांची स्थापना करणारे संस्थापक म्हणजे वसंत वसंत लिमये. नुसती आवड वा हौस एवढ्या भांडवलावर उदंड कीर्ती असलेले अनेकजण सापडतात. परंतु छंद, ध्यास, झोकून देण्याची वृत्ती, साहसाची कसोटी पणाला लावण्याची धमक आणि हाती घेतले ते पार पाडण्याची जिद्द, दुर्दम्य असा आत्मविश्वास असलेले, स्वच्छंदपणे निसर्गाचा आनंद मनमुरादपणे घेणारे, निसर्गाच्या अंगाखांद्यावर मुक्तपणे बागडणारे वसंत वसंत लिमये म्हणजे एक वेगळेच रसायन म्हणता येईल. जोडीला छायाचित्रणाचा छंद. अभिनय, लेखनाची अंगीभूत आवड. तीसुद्धा चोखंदळ, त्यासाठी संशोधन, अभ्यास, भ्रमण, चिकित्सा आणि स्वतःचे वेगळेपण सिद्ध करण्याचा ध्यास. 'धुंद स्वच्छंद', 'कॅम्पफायर', 'लॉक ग्रिफिन', 'विश्वस्त' यांसारखी अभिजात साहित्य ग्रंथसंपदा त्यांच्या नावावर असून ती त्यांच्या या वेगळेपणाची साक्ष देणारी आहे. 'फेलो ऑफ रॉयल जिओग्राफिकल सोसायटी' (FRGS) लंडन आणि आयआयटीयन मुंबई असलेले वसंत वसंत लिमये नवीन पुस्तक घेऊन आपल्यासमोर आले आहेत, त्याचे नाव आहे 'साद हिमालयाची'.

हिमालयाचा प्रवास करायचा, सिक्कीमपासून ते लदाखपर्यंत, म्हणजे तब्बल बारा हजार किलोमीटरचा. तोही स्वतःच्या वाहनाने, आपल्या मर्जीप्रमाणे, आखून घेतलेल्या मार्गाने. 'हिमालय' हे नावच त्याच्या श्रेष्ठत्वाची ग्वाही देणारे. त्याची भव्यता जशी उंचीत आहे तशी विस्तारातही आहे. त्याचे सौंदर्य जेवढे रम्य, लोभस, खिळवून ठेवणारे तेवढेच त्याचे अंतरंग गूढ, अनिश्चित, खडतर, कधीही अस्तित्व पुसून टाकणारे. तो जितका प्रेमळ, आपला वाटणारा तितकाच निष्ठूर, परका वाटावा इतका अलिप्त. अशा हिमालयाच्या प्रेमात पडणारे त्याच्याइतकेच मनाची उंची, सौंदर्याची आवड आणि स्वतःला झोकून देणारी वृत्ती जपणारे साहसी असणार हे निर्विवाद! त्यातले एक नाव म्हणजे वसंत वसंत लिमये! आठ आठवड्यांचा प्रवास. 'गिरिजा' या वाहनाने. खास निवडलेले वाहन. त्यात जेवणाचे साहित्य, तंबू, तेलाचे कॅन असा सगळा रसदसाठा. कुठेही तंबू ठोकून हिमालयाच्या कुशीत विसावयाची सोय, पुन्हा पुढे प्रवास सुरू. हिमालय यात्रेचा हा आनंद एकट्याने घेण्याऐवजी समवृत्ती असणारे आणखी सोळा जोडीदार निवडले. प्रत्येक आठवडा एक जोडी याप्रमाणे ही कल्पना देखील भन्नाटच. अर्थात ज्या जोड्या मिळाल्या त्याही भन्नाटच. आपापल्या क्षेत्रात स्वतः ठसा उमटवलेल्या. नुसती नावे पाहिली तरी त्यांचे मोठेपण, रसिकता आणि निसर्गप्रेमाची ओळख पटावी. मृणाल परांजपे, संजय रिसबूड, प्रेम मगदूम, अजित देसवंडीकर, निर्मल खरे, सचिन खेडेकर, सुनील बर्वे, सुहिता थत्ते, राणी पाटील, आनंद भावे, प्रशांत जोशी, राजू फडके, जयराज साळगावकर, डॉ. अजित रानडे, मकरंद भरणारे, सुबोध पुरोहित, डॉ. आनंद नाडकर्णी आणि चालक अमित शेलार. दिवसदिवस गाडी चालवण्याचे कसब तेही हिमालयाच्या अंगाखांद्यावर, हे येरागबाळ्याचे काम नाही, परंतु अमितने तो संपूर्ण प्रवास अगदी सहजपणे पूर्ण केला. सोबत सहभागी झालेल्या सर्वांसाठी लेखकाने 'हिमयात्री' असा छान शब्द योजलेला आहे.

सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवासजी पाटील ते लदाखचा मराठी हॉटेल मालक आत्माराम परब, गुरूडोंगमार लेक ते पँगाँग सरोवर, तिस्तानदी ते श्योक नदी, गंगटोक, सिक्कीम ते लेह, लदाख असा बारा हजारांहून अधिक किलोमीटरच्या या प्रवासात जे भेटले, पाहिले, अनुभवले, जगणे झाले, त्याचे वर्णन म्हणजे 'साद हिमालयाची'. नवा प्रदेश, नवी माणसे, नवी संस्कृती, प्रत्येकवेळी दिसणारे निसर्गाचे नवे रूप, कांचगगंगाचे दर्शन, मंदिरांचे दर्शन, अनवट वाटा, अवघड रस्ते, हिमालयातून उगम पावणाऱ्या नद्या, वृक्षराजी, खाद्य संस्कृती, हिरवळ, वाळवंट, ठिसूळपणा, भव्यता आणि याच्या जोडीला येणारा त्याच्या ठिकाणांचा इतिहास, हे सारेच अनुभव पातळीवर असल्याने आपण आपोआपच त्या वर्णनाच्या प्रेमात एकरूप होत जातो.

वसंत वसंत लिमये हे स्वतःच आयोजक असल्याने आणि आतापर्यंत पन्नास ते साठ वेळेस हिमालयात जाऊन आलेले असल्याने, त्यांच्या नजरेतून दिसणारी ही सफर आणि हिमालयीन संस्कृती, त्याचप्रमाणे त्यांच्यासोबत असलेल्या हिमयात्रींनी अनुभवलेली हिमालयीन संस्कृती यांचे वर्णन म्हणून समृद्ध अनुभवाचा मोठा खजिना म्हणावा लागेल. ही यात्रा म्हणजे वेगळाच साहसी अनुभव म्हणता येईल. तशी या पुस्तकाच्या निर्मितीमध्येही खास असे वेगळेपण आहे. संपूर्ण आर्ट पेपर, त्यावर पानोपानी रंगीत फोटो, केलेल्या प्रवासाचे नकाशे. त्यामुळे हे पुस्तक केवळ प्रवासवर्णन नसून जिवंत अनुभवाचा अस्सल खजिना आहे. कुणाही हिमालय प्रेमीसाठी प्रेरणा आणि मार्गदर्शक ठरावा असा हिमस्तंभ आहे. मांडणी आणि मुखपृष्ठासाठी निलेश जाधव यांचे खास अभिनंदन करायला हवे.

**मूल्य ३५० रु.   सवलतीत २५० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## उजळले स्मृतींचे दिवे

**मुक्ता कणेकर**




**दिव्यत्वाची तिथे प्रचिती**

'पतीची ताबेदारी स्वीकारून स्वातंत्र्य गमवायचे, की तुरुंगवास मान्य करून कायमचा कलंक लावून घेऊन भविष्याचे दरवाजे कायमचे बंद करून घ्यायचे, यापैकी एक निर्णय घ्यायचा होता. पण माझा निर्णय अभंग होता. मी खंबीरपणे दुसरा निर्णय घ्यायचे ठरवले आणि निक्षून सांगितले, की पत्नी म्हणून राहायला जाण्याऐवजी मी शिक्षा भोगायला तयार आहे.' (पृ. क्र. ७१)

'उजळले स्मृतींचे दिवे' हा कर्तृत्ववान अशा पंधरा महिलांचा कर्तृत्व आलेख असलेला चरित्रात्मक लेखसंग्रह आहे. या महिलांच्या एकूण जीवनप्रवासाचा आढावा घेताना त्यांचे वैयक्तिक जीवन, संसार, पती, मुले, सासू-सासरे यांचा परिचय येणे अपरिहार्य आहे. तरीही त्यातून त्या स्त्रीचं स्त्रीपण आणि तिचे ठळकपणे उठून दिसणारे कार्य यावर अधिक भर दिलेला आहे. त्यामुळे 'ती' एका लहानशा लेखातही खूप मोठे संचित समोर मांडले गेलेले आहे. मुळातच या कर्तृत्ववान तेजस्विनींच्या नावांची यादी पाहिली तर लक्षात येईल की त्या काळातल्या खरोखरच या तपस्वी महिला किती थोर होत्या. त्यांचे कार्य किती मोठे होते. एकाच वाक्यात सांगायचे तर अंधारलेल्या वाटेवर दिवे लावण्याचे, वाट उजळण्याचे काम कुणी केले असेल तर ते या महिलांनी केले आहे. त्यामुळेच या संग्रहाला दिलेले शीर्षक अतिशय चपखल ठरते.

सौ. सावित्रीबाई फुले (१८३१-१८९७) स्त्री शिक्षण आणि समाजकार्यात पुढे आलेल्या या पहिल्या महिला. जोतिरावांच्या पावलांवर पाऊल टाकताना चिखलफेक सहन केलीच, पण धीराने धडाही शिकवला. शिक्षिकाही त्याच आणि मुख्याध्यापिकाही त्याच. शाळा सुरू केली तेव्हा फक्त सहा मुली होत्या. स्त्रीशिक्षणाचे दार उघडले गेले आणि एक मोठा रस्ता तयार झाला. त्यांच्याविषयी प्रा. गं.बा. सरदार लिहितात, 'चूल व मूल यात गुंतून न पडता, घराचा उंबरठा ओलांडणारी व सामाजिक कार्यात भाग घेणारी पहिली स्त्री म्हणजे सावित्रीबाई होय.

रमाबाई रानडे (१८५८-१९२२) वयाच्या बाराव्या वर्षी संस्कृतचे बारा हजार श्लोक पाठ होते. बाबा वारले तेव्हा त्यांना उचलण्यासाठी तिरडीचा दांडा डोक्यावर घेऊन चालायला लागली. अवघ्या दीड वर्षात संसार मोडला, वैधव्य आले. अमेरिकेत शिक्षण घेऊन विधवा व अनाथ स्त्रियांची सेवा हेच जीवनध्येय ठेवले. मुंबईत बालविधवांसाठी 'शारदासदन' ही शाळा सुरू केली. धर्मनिरपेक्षाची अट काढून ख्रिस्ती स्त्रियांसाठी 'मुक्तीसदन', 'पतित स्त्रियांसाठी कृपासदन', वृद्ध अशक्त स्त्रियांसाठी 'प्रीतिसदन' सुरू केले. हे त्यांचे कार्य. ख्रिस्तीधर्म स्वीकारला परंतु जगणे स्वत:च्या इच्छेप्रमाणेच ठेवले.

सौ. आनंदीबाई कर्वे (१८६४-१९५०) वयाच्या आठव्या वर्षी लग्न आणि अवघ्या तीन महिन्यात वैधव्य! वयाच्या चोविसाव्या वर्षी पंडिता रमाबाईच्या शारदासदनमध्ये आलेली पहिली विद्यार्थिनी. वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी कर्व्यांशी पुनर्विवाह. परंतु या पुनर्विवाहामुळे सर्वांनाच 'वाळीत-बहिष्काराचा' सामना करावा लागला. परंतु सर्व उपेक्षा सहन करून, कर्व्यांच्या आश्रमाच्या कामात मोलाची साथ दिली.

डॉ. रखुमाबाई राऊत (१८६४-१९५५) कुटुंबव्यवस्था, बालविवाह, स्त्रीस्वातंत्र्य यासाठी जो प्रदीर्घ लढा दिला तो थक्क करणारा आहे. बालविवाहाच्या दुष्परिणामाला वाचा फुटली ती या लढ्यामुळे. डॉक्टर झाल्यानंतर त्यांनी ज्या पद्धतीने दवाखान्यातील सेवा दिल्या, त्यावरून त्याची ओळख रखमाबाईंचे हॉस्पिटल अशी झाली.

डॉ. आनंदीबाई जोशी, ताराबाई शिंदे, काशीबाई कानिटकर, रमाबाई रानडे, पार्वतीबाई आठवले, अवंतिकाबाई गोखले, जनाक्का शिंदे, काशीबाई हेर्लेकर, ताराबाई मोडक, कमलाबाई हॉस्पेट, अनुताई वाघ यांचीही माहिती या पुस्तकात आहे. त्याकाळी होत असलेले बालविवाह, पुरुषांची मोठी वये, कर्मठपणा, स्त्री शिक्षणाचा अभाव, अस्पृश्यास्पृश्यता, अज्ञान यातून चिकाटीने उभ्या राहिलेल्या या स्त्रिया आहेत. प्रत्येकीचा जीवनकाळ दिलेला आहे. तो एकोणिसाव्या शतकापासून सुरू झालेला आहे. त्यावरून त्या काळाचे चित्र समोर येते.

लेखिकेने या लेखनाला एक संवादी स्वरूप दिलेले आहे. सुरुवातीला लहानशी ओळख. त्यानंतर ती व्यक्तिरेखा स्वत:च्या जीवनप्रवासाविषयी सांगत जाते. त्यामुळे थेट वाचकाशी संवाद साधला जातो आणि मोठा आवाका, मोजक्या व नेटकेपणाने सादर होतो. मुक्ता कणेकर या स्वत: सिद्धहस्त लेखिका आहेत. विविध स्वरूपाचे लेखन त्यांनी केलेले आहे. त्यांच्या प्रकाशित साहित्याचा आलेख मोठा आहे. त्यांच्या लेखनातला सहजपणा, त्यातले वैविध्य, इतर मान्यवरांचे शैलीदार संदर्भ यामुळे 'उजळले स्मृतींचे दिवे' हे पुस्तक केवळ भावत नाही तर ते संग्रही ठेवायला हवे, असे संग्राह्य झालेले आहे. डॉ. विजया वाड यांनी प्रस्तावना लिहून या पुस्तकाचे कौतुक केले आहे. अनिल दाभाडे यांनी मुखपृष्ठावर दिवे आणि फोटो यांची सुंदर आरास केली आहे.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**मन:पूर्वक**
**डॉ. वसुधा सरदेसाई**



**गाभाऱ्यातील स्वपडसाद**

कवी कविता का लिहितो? कवीलाही या प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात नाही सांगता येत. मात्र त्याला जोडून काही सांगता येते. डॉ. वसुधा सरदेसाई त्यांच्या मनोगतात अशाच तऱ्हेने व्यक्त होतात. माझ्यासाठी कवितानिर्मिती हा माझ्या अंतर्मनाचा हुंकार आहे. आयुष्यात आपण बरेचदा दोन भिन्न पातळ्यांवर जगत असतो. एक आपली बाह्यात्कारी व्यवहारी चाकोरी, तर एक आपल्या मनातली आपली अशी स्वतंत्र जाणीव. बाहेर कितीही कोलाहल असला तरी माझ्या मनात व्हायोलीनचे सूर उमटत असतात. कधी कधी अनुभवच असे असतात की ते अंतर्मन ढवळून टाकतात. या सगळ्यातून शब्दांच्या धारा बरसू लागतात. गाणे आणि त्याची लय याचा मला लळा आहे. आणि त्या लयीतून निर्माण होत राहते नादमधुर कविता. (पृ. क्र. अकरा)

'प्रेम' या शब्दात असलेली भावना आणि संवेदना ही वयाच्या टप्प्याटप्प्यानुसार वृद्धिंगत, संमजस आणि प्रगल्भ होत जाते. या शब्दाशी फारकत घेतलेला कवी सहसा सापडत नाही किंबहुना प्रेम या शब्दातच कवितेचा अंकुर विसावलेला असतो. त्याचे उमलणे, बहरणे, फुलणे या अवस्थांची वर्णने, त्याची आस, आकर्षण, ओढ, विरह, अलवारपणा यांनी बंदिस्त केलेल्या मनाची तरलता, अस्वस्थता, हुरहुर, हळवेपणा अशा अनेक अवस्थांची स्थळे कवितेतून हमखास आढळतात. 'चंद्र माझाच माझाच', 'सय', 'नादात मी', 'मोहोर', 'छे! कुठे काय घडलं?' यासारख्या या संग्रहातील कविता प्रेमभावना व्यक्त करतात. त्यांच्यातले नेमकेपण खूप हळवेपणाने टिपलेले दिसून येते.

'माझ्या आंब्याच्या झाडाला आला आला गं मोहोर
असे डवरून आले जशी न्हाती झाली पोर (पृ. क्र. ६)

रूपकाची कल्पना इतकी सुंदरतेने व्यक्त होते, तेव्हा क्षणभर वाचक म्हणून आपण तिथेच थबकतो. कविता जशी जशी उमलत जाते फुटून आलेल्या मोहोरासारखी, तसा त्या कवितेचा आनंद आपल्या मनाला फुलवीत जातो. अशा वेळी खूप काही घडून जाते, तरीही वाटत राहते, छे! कुठे काय घडले, हे सारे वाऱ्याच्या झुळुकीसारखे असते. मनातलं गुपित व्यक्त न करताही कळत जाते. त्यातून निर्मिती होते ती चित्रांच्या भाषेची, ती न बोलताही मूकपणे खूप काही बोलत राहते. ती आपल्याच नादात रमते. हे जोडले आहे वयाशी. कवयित्री ही भावना व्यक्त करताना सहजपणे सांगून जाते, 'हा वयाचाच गं दोष। उगा नको मजवरी रोष'.

असे असूनही लक्षात येते, सारेच काही व्यक्त करता येत नाही. साऱ्याच कविता शब्दात बांधता येत नाही. हृदयातल्या झंकारासाठी कुठला रंग दाखवायचा? हो इतके मात्र सांगता येते, शोधासाठी रानावनात जाण्याची आवश्यकता नाही. मी तुझ्याच मनात एकरूप आहे. तर कधी अशी वेळ येते, आपण परकेच राहिलो. आता सवय करायला हवी तुझ्याशिवाय आयुष्याची.

मग एका टप्प्यावर उभे असताना लक्षात येते. आपल्या आयुष्याचा हिशोब काय? आपले निम्मे आयुष्यतर असेच गोंधळात गेले, व्यवहाराच्या पातळीवर आल्यानंतर माणसांविषयी, व्यवहाराविषयी कळायला लागले. जे जगून झाले त्यात किती हाती आले, असा प्रश्न येतो तेव्हा लक्षात येते. फारच थोडे असे सार्थकी लागलेले आयुष्य हाती आले. त्याला कारणेही शोधण्याचा प्रयत्न करताना सापडते, जगणे सोपे नसते, त्याला वाहून नेणारे रस्ते सरळ नसतात, कुठे घेऊन जाणार आहे ते ठाऊक नसते. तरीही जगण्याला बळ द्यायचे असेल तर स्वत:वरचा विश्वास दृढ ठेवायला हवा. ओठांवर ताबा आणि आसवांवर नियंत्रण ठेवायचे. अस्तित्वाचा कस लावत, आव्हान पेलीत सर्व संकटावर मात करीत पुढेच चालत राहायचं.

या 'मन:पूर्वक' कवितासंग्रहाला एका आलेखाचे स्वरूप आहे. माणूस याच्या केंद्रस्थानी आहे. त्याच्या जगण्याच्या, भावना-संवेदना-व्यवहाराच्या, प्रेमाच्या पातळ्यांचा हा आलेख कवयित्रीने चित्रित केलेला आहे. हे चित्रित करणे खूप मोकळेपणाने सभोवताल समोर ठेवून साधलेले आहे. त्यामुळे सहजपणे आपण त्याचे टप्पे आणि त्यातला आशय आपल्या जगण्याशी, आयुष्याशी जुळवून पाहू शकतो. नव्हे जणू तो आलेख आपला आहे असेच वाटत राहते. आपल्याच मनातला हुंकार इथे व्यक्त झाला असा अनुभव येत राहतो. कवयित्री या डॉक्टर आहेत. सतत व्यग्र राहणे त्यामुळे आलेच परंतु त्याही परिस्थितीत त्यांचे कवीमन सतत जागृत आहे. त्यांच्या कवितेला गेयता आहे. नादमधुरता आहे. छंदात बांधण्याचा प्रयत्न आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे ही कविता जड, बोजडपणा घेऊन येत नाही. जगण्यातले प्रवाहीपण टिपत येते, त्यातले संदर्भ शोधत येते. जगण्याच्या सोबतीला सकारात्मकता आहे. एक आश्वासक असा हुंकार असे या कवितासंग्रहाचे वर्णन करता येईल. आश्लेषा महाजन यांची प्रस्तावना वाचल्यानंतर लक्षात येते, कवी आणि कविता यांच्याकडे पाहताना जाणिवा आणि भान कसे जागृत असावे. सुभाष कुलकर्णी यांनी मुखपृष्ठ खूप मनापासून सजविलेले आहे.

**मूल्य १०० रु.  सवलतीत ६० रु.**

# ग्रंथपान

**संगणकक्षेत्रातले काही प्रज्वलित दिवे**
**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**




**प्रेरक इथे नांदतात**

'पैसा ही यशाची एक मोजपट्टी समजतात. ते ध्येयपूर्तीचं लक्षण असू शकत नाही. पैशापेक्षा ध्येय मोठं असू शकतं. म्हणून या संस्थापकांजवळ जन्मभर ऐश्वर्य भोगण्याएवढे पैसे असूनही ते रोज कामाला जातात. त्याचं उद्दिष्ट मानवी जीवन बदलून त्यावर कायमची छाप पाडणे हे आहे, त्यातूनच त्यांना खरा आनंद मिळतो. तो पैशाच्या तराजूनं मोजता येत नाही.' (पृ. क्र. १०९)

जिद्द व ध्यास यांच्या चिकाटीने अशक्य वाटणाऱ्या कल्पना वास्तवात आलेल्या पाहायला मिळतात. ते भाग्य ज्यांच्या वाट्याला आले ते सर्वजण आज जगभर आपल्या यशाच्या जोरावर, कीर्तीच्या शिखरावर विराजमान झालेले आहेत. आपली बुद्धिमत्ता, कौशल्याच्या जोडीला परिश्रमाची अजोड तयारी यामुळे या व्यक्तींनी संशोधनाच्या क्षेत्रात इतिहास घडविलेला आहे, असे इतिहास घडविणारे आपल्या पिढीतले, आजच्या घडीला कार्यरत असणारे आणि ज्यांच्या यशाने आश्चर्याने सगळ्यांना स्तिमित करणारे आपण आजही त्यांच्या संशोधनाच्या पडद्यावर पाहतो आहोत. विविध क्षेत्रात असे अनेक दिग्गज आहेत, ज्यांचा इतिहास स्वतंत्रपणे लिहिला गेला आहे. या विविध क्षेत्रांपैकी एक क्षेत्र आहे, ज्याने जीवनाच्या साऱ्या टप्प्यांना आपल्या कवेत घेतले आहे, ते क्षेत्र म्हणजे संगणक! संगणक म्हटला की जी नावे समोर येतात ती अशी– बिल गेट्स, स्टिव्ह जॉब्ज, जेफ बेझोस, मार्क झकरबर्ग, लॅरी पेज व सर्गे ब्रिन, सुंदरराज पिचाय, सत्या नाडेला. जसं महाभारत आठवलं की धर्म, भीम, अर्जुन, कर्ण, दुर्योधन, कृष्ण ही नावे पटकन नजरेसमोर उभी राहतात, तशी वरील नावे ही संगणकाच्या क्रांतीशी जोडली गेलेली आहेत. त्यांच्या जोडीला आहेत ट्रॅव्हिस कालनिक, ज्याने 'उबर' या नावाने परिवहन क्षेत्रात वेगळीच क्रांती करून सुखवस्तू माणसाचे जीवन आणखी सुखावह केले. तर शेवटचा आहे जॅक मा जो ॲमेझॉनसारखाच स्वतंत्र ध्रुवावर उभा आहे. अशा या नऊ व्यक्ती आहेत, त्यांना संस्थापक, जनक, संशोधक, संशोधनातले क्रांतिकारक, अब्जाधीश अशी कुठलीही बिरुदावली लावली तरी ती थिटी वाटावी, इतके त्यांचे कार्य–कर्तृत्व प्रचंड मोठे, अत्यंत वेगळे आणि काळाच्या पडद्यावर कायम कोरले गेलेले आहे. त्याच्याविषयीचा आढावा थोडक्यात, मोजक्या व नेटक्या पद्धतीने या पुस्तकात घेतलेला आहे. खूप मोठा कॅनव्हास असलेल्या विषयाला गवसणी घालून वाचकांच्या सोयीसाठी केलेला हा प्रयत्न स्तुत्यच म्हणावा लागेल!

खरंतर या पुस्तकाचे लेखक डॉ. अनंत लाभसेटवार हे व्यक्तिमत्त्व सुद्धा कर्तृत्वाने वरील इतर कुठल्याही व्यक्तींपेक्षा कमी आहे असं म्हणता येणार नाही. एक मराठी माणूस अमेरिकेत स्वत:ची बँक विकत घेऊन चौदा वर्षे तिचे चेअरमन ऑफ दि बोर्ड हे पद भूषवितो आणि आपल्या उद्योगजगतात कुशल उद्यमशीलता दाखवितो. जननशास्त्रात संशोधनात्मक असे शंभराहून अधिक शोधनिबंध सादर करून आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवितो. याच वैद्यकीय क्षेत्राला आणि साहित्यिक गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी 'लाभसेटवार फाऊंडेशन'ची स्थापना करून दरवर्षी लाख रुपयांची प्रत्येकी पारितोषिके देऊन गौरव करतो. आणि स्वत: लेखक म्हणून जी झेप घेतो तीही आश्चर्यचकित करणारी बाब आहे. कादंबरी, कथासंग्रह, प्रवासानुभव, चरित्र, लेखसंग्रह, संपादन अशी त्यांची सुमारे तीस पुस्तके प्रकाशित आहे. साहित्याच्या या विविध अंगांचा त्यांचा व्यासंग थक्क करणारा आहे. त्यांचे लेखन वाचणे हा एक आनंददायी अनुभव असतो. त्यांच्या लेखनात असलेला व्यापकपणा, दूरदृष्टी, संदर्भ आणि लेखनातली सहजता, तिच्यातला प्रवाहीपणा, वाचकाला खिळवून ठेवण्याची ताकद, हे सारे सारे अनुभवाला येते. जगण्यातला उल्लेखनीय भाग ते जितका समर्पकपणे नोंदवतात तितकाच अपयशाचाही शोध घेतात. लेखनात सुटसुटीतपणा हवा, वाचकाला नेमकेपणाने आशय सादर व्हावा हा कटाक्ष ते आवर्जून पाळतात. विषय इंग्रजीशी संबंधित असू दे वा आंतरराष्ट्रीय. चपखल आणि नावीन्यपूर्ण मराठी शब्द योजण्यातील कल्पकता त्यांच्याइतकी खचितच कुणाला अवगत असावी.

संगणकक्षेत्रातले शोध, त्यांची मंत्रणालेखन आणि यंत्रणानिर्मिती हा महत्त्वाचा भाग आहे. बिल गेट्स यांचा पितामह. मायक्रोसॉफ्ट ही त्याची निर्मिती. तिच्यासाठी त्याने दाखविलेले कर्तृत्व, त्यांची संपत्ती, घर, स्वभाव, लग्न असा सर्वांगीण आढावा त्यांनी घेतला आहे. ॲपल, आयफोनचा स्टिव्ह जॉब्ज याचीही माहिती अशीच सुटसुटीत दिलेली आहे. आयफोनचे फायदे आज कुणाला सांगण्याची गरज उरलेली नाही. परंतु याचा निर्माता हा क्षणिक सुखाचं सांडपाणी म्हणून जन्माला आलेला होता. ते शल्य त्याने आयुष्यभर जपले. विशेष म्हणजे त्याने भारतात येऊन बौद्धधर्म स्वीकारला होता, ही माहिती वेगळीच. ॲमेझॉनने आज प्रत्येक वस्तू विकत घेऊन ग्राहकाला त्याच्या आज्ञेप्रमाणे घरपोच पाठविण्याची व्यवस्था निर्माण केली. सुरुवातीला हा जेफ बेझोस फक्त पुस्तके विकण्याचा व्यवसाय करीत असे. फेसबुकमुळे सर्वांना परिचित झालेला झकरबर्ग वयाच्या विसाव्या वर्षी मोठा उद्योजक ठरला होता. गूगल हा शब्द गूगॉल या शब्दावरून आला. गुगॉल म्हणजे एकावर शंभर शून्य! गूगलच्या लॅरी पेजने सुंदर पिचायला गूगलचा व्यवस्थापकीय संचालक म्हणून नेमले आहे, तर सत्या नडेला हा मायक्रोसॉफ्टचा मुख्याधिकारी आहे.

अमेरिकेतील संगणक व्हॅलीचे वर्णन करताना लेखक एक मार्मिक टोला देतात, तिथे असणारे भारतीय हे भारतीय ज्ञानसमृद्धीच्या जोरावर नक्कीच नोकरी करीत नाहीत. या पुस्तकाला दोन उल्लेखनीय बाबी लाभलेल्या आहेत. लेखकाची प्रस्तावना आणि सतीश भावसारांचे मुखपृष्ठ!

**मूल्य २०० रु.   सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

## होरपळ ते हिरवळ

**प्रा. भास्कर बंगाळे**



**जिद्द ज्याच्या मनी, सिद्धीचा तो धनी**

संस्थेत एकूण तेहेतीस वर्षे सेवा केली. केवळ पगार घेतो म्हणून ठरावीक तास काम न करता नैतिकतेच्या दृष्टीने कामात झोकून देऊन संस्थेच्या अस्तित्वाची, सुरक्षिततेची व प्रतिष्ठेची काळजी घेण्याच्या भावनेने सामाजिक ऋण फेडण्याच्या भावनेने काम करत गेलो. कितीही कष्ट पडले, बदल्या झाल्या, अडचणी आल्या, हाल सोसावे लागले तरी तो आपल्या सेवेचा व जगण्याचा अविभाज्य घटक आहे, असे समजून काम केले. माझ्या सेवेत मी आनंदी आणि समाधानी आहे. सुख, शांती, समाधान हे आपल्या मनावर असते. रडत-रडत, कुढत-कुढत जगण्यापेक्षा हसत-हसत, गीत गात जगावं, जीवनाला अर्थ प्राप्त होतो तो त्यामुळेच! (पृ. क्र. २६२)

मागासवर्गीय समाजात जन्म घेणे म्हणजे शाप, आणि त्याच्यावर हक्क गाजविण्याचे सवर्णांना मिळालेले वरदान, ती आपल्या भारत देशाची प्रतिमा. तिला कितीही दोष दिला, उखडून फेकण्याचे प्रयत्न केले, तरीही ही युगानुयुगे रुतून बसलेली मुळे अजूनही आपले पाश घट्ट धरून आहे. त्यामुळे ग्रामीण भागातले हे दाहक पिळ ज्यांच्या वाटेला आले, त्यांनी जे भोगले, त्याचे वर्णन करणे शब्दांना अशक्य ठरावे. असे भीषण वास्तव 'बलुतं'पासून साहित्य प्रवाहात आले आणि त्या वास्तवाला खऱ्या अर्थाने वाचा फुटली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखविलेल्या मार्गावरचे चालणे आताशी कुठे सुकर होताना दिसू लागले. त्यांनी दिलेल्या संदेशाला सकारात्मकतेची फळे लागलेली दिसू लागली. अन्यथा होती ती भीषण दाहकता, प्रचंड होरपळ. त्या होरपळीतून ज्यांनी आपली जीवनबाग वाचवली, मनात जिद्द धरली, डॉ. बाबासाहेबांचा संदेश आचरणात आणून बुद्धीमत्तेच्या जोरावर प्रचंड मेहनत, अंगमेहनतीने परंपरेने आलेले वास्तव खडकासारखे फोडले तेव्हा कुठे हिरवळीचे कोंब वाट्याला आले. अशा ज्यांनी ज्यांनी हा पैलतीर गाठून हिरवळीला जवळ केले, त्यात एक नाव आहे, प्रा. भास्कर बंगाळे यांचे. ते एकटेच नाहीत, त्यांचे चौघा भावंडांचे कुटुंब माळरानातून हिरव्यागार हिरवळीपर्यंत पोहोचले आहेत. त्याचेच चित्रण म्हणजे 'होरपळ ते हिरवळ.'

प्रा. भास्कर बंगाळे यांचे जन्मगाव अजनसोंड पंढरपूर तीर्थक्षेत्रापासून सहा-सात किलोमीटर अंतरावर वसलेलं गाव. निसर्गसौंदर्याने नटलेले गाव. विषमतेची, जातीयतेची बिजे त्याही गावी या सौंदर्यात धोत्र्याच्या बियासारखी होतीच. तिथून झालेला प्रवास आज पंढरपूर येथे विसावला आहे. म्हटले तर अंतर सहा-सात किलोमीटरचे म्हटले तर दोन पिढ्यांचे. उणेपुरे साठ वर्षांचे. काय काय घडले नाही या जीवन प्रवासात? काय काय सहन करावे लागले, कसा कसा सहन केला प्रत्येक वळणावरचा प्रवास, त्याचे चित्रण अतिशय संयमितपणे लेखकाने चितारले आहे. घरचे अठराविश्वं दारिद्र्यं, अंगमेहनतीला कुठलाही पर्याय नाही, अशा परिस्थितीत आई-बाबा राहतात. तरीही मुलांचे शिक्षण व्हावे याची जिद्द ते सोडीत नाहीत. पोटाला चिमटा काढून शिक्षणाचा ध्यास कायम ठेवतात. त्या मातापित्यांचा दिसत असलेला ध्यास, मेहनत, वास्तव याचे भान लेखकही कायम उराशी बाळगतो. कधी उपाशी कधी अर्धपोटी राहून शिष्यवृत्तीच्या जोरावर आपलं शिक्षणाचं ध्येय पूर्ण करतो, हा सारा प्रवास अचंबित करणारा आहे तसा आतड्यांना पीळ पाडणारा आहे. प्राध्यापक होण्यासाठी केवळ एमए, बीएड असून चालत नाही, एमएला दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तो वर्ग मिळवण्यासाठी लेखक पुन्हा त्याची तयारी करून तो वर्ग मिळवतात. आपलं स्वप्न पूर्ण करतात. त्यांची ही मेहनत पाहताना त्यांना सलाम करावासा वाटतो. ते केवळ शिक्षक होत नाहीत, आदर्श शिक्षक ठरतात. ते केवळ मुख्याध्यापक होत नाहीत, गावकरी-पालकच त्यांना त्यांच्या गावी कायम ठेवण्याची मागणी करतात, यातंच सारं आलं. ते ज्या-ज्या ठिकाणी गेले, तिथे त्यांनी स्वतःचा ठसा उमटवला. शाळेत पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती, ही 'नाही' नावाची गोष्ट लेखकाने आपल्या सहकाऱ्यांसह गावातून, मिळेल ती वर्गणी मिळवून पुसून टाकली. जे जे करणे शक्य आहे ते सारे केले. म्हणूनच ते स्वतः समाधानी असल्याचे नमूद करीत आहेत.

प्रा. भास्कर बंगाळे हे स्वतः समाधानी असल्याचे नमूद करीत आहेत. विद्यार्थ्यांना काय हवे, त्यांना कसे शिकवले म्हणजे ते यशस्वी होतील, हे उत्तम शिक्षकच सांगू शकतो. तसे वाचकाला काय हवे, आपले लेखन कसे केले म्हणजे ते वाचकाच्या पसंतीला उतरेल, याची उत्तम जाण त्यांना आहे. सदरच्या या आत्मचरित्रात त्यांनी ते भान जपलेले आहे. आपले आई, बाबा, भाऊ, पत्नी, परिसर, शाळा, समाज, पंढरपूर या सगळ्यांची माहिती देताना त्यांना स्वतंत्र असे वेगळेपण दिलेले आहे. प्रकरणांसारखी विभागणी केल्याने त्या लेखनाला उठावदारपणा लाभलेला आहे. लेखनाची, कथाकथनाची आवड तर आहेच. परंतु ती केवळ हौसेपोटी नाही तर त्यासाठी त्यांना साहित्य पुरस्कार लाभलेला आहे. नम्र, साधेपण टिकवून असलेल्या प्रा. भास्कर बंगाळे यांचं हे आत्मचरित्र त्याच परंपरेतील आपले स्थान सिद्ध करील असा विश्वास वाटतो.

पंढरपूर आणि जीवनातले माळरान या पार्श्वभूमीवर चितारलेले मुखपृष्ठ सतीश भावसारांच्या कल्पकतेची साक्ष देते, आशयाचा नेमका गाभा पकडते.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## विसरलेल्या आठवणींची कथा

**अरुण साधू**




**पुन्हा पुन्हा आठवावे असे पुस्तक**

'हा माणूस, जो केवळ एक बटण दाबून आपल्याला निर्जीव करू शकतो, दोन सर्किट्स कापून आपल्याला नष्ट करू शकतो, तोच आपल्या रोबो जातीच्या सर्व्हायवलचा खरा शत्रू हे त्या जीवाकांक्षा स्फुरलेल्या रोबोला नक्कीच कळेल. त्याला नष्ट केलं की आपल्याला अमरत्व, हेही त्याला समजू शकेल... मग हे सज्ञान झालेले, जीवाकांक्षा 'अंकुरलेले रोबोच पृथ्वीला निर्मनुष्य करण्यासाठी उणव करतील, अशीही शक्यता तुम्ही नाकारू शकणार नाही.' (पृ. क्र. ५१)

अरुण साधू याचा हा नवा कथासंग्रह, त्यांच्या पुस्तकरूपाने अप्रकाशित राहिलेल्या कथांचा. यात चार कथा आहेत, ज्या वेगवेगळ्या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या आहेत. एक आहे मुक्त चिंतन, आपल्याच लेखणावर लिहिलेले आणि एक लेख आहे त्यांच्याच दोन मित्रांविषयीचा. साधूच्या साहित्यात काळाचे अंतरंग उलगडण्याची ताकद आहे, हे त्यांचे साहित्य वाचलेल्यांना ज्ञात आहे. ते वर्तमानात वावरत असताना भूतकाळाला जिवंत करतात आणि भविष्यकाळात काय असेल ती स्थितीही समोर उभी करतात. हे काळभान त्यांच्या कथांचे बलस्थान आहे, त्याचा प्रत्यय या कथा देतात.

घनश्याम मेघे ही 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि' या कथेतील प्रमुख व्यक्तिरेखा; न्यूरो सायंटिस्ट. रोबोत मेंदू निर्माण करण्याच्या प्रयोगाने झपाटलेला. ही कथा त्याच्या बौद्धिक, आत्मिक आणि मानसिक पातळीचे दर्शन घडवते. तसे तिचे स्वरूप दीर्घकथा वाटावी असे. परंतु घडणारा प्रवास फक्त सकाळपासून सायंकाळपर्यंतचा. तोही थक्क करणारा. मानसिक आंदोलने आणि घडणाऱ्या घटना, यामुळे ही कथा काळाच्याही पुढे जाते. असे असूनही ती विज्ञानकथा नाही, हे विशेष. जोडीने आलेली पत्नी कौसल्या, मुलगी पोमी, मेहुणा भरत, त्याची पत्नी मोहिनी, वशिष्ठ, ही मंडळी कथेची गुंफण सकस पीळदार करतात. कथेत इंग्रजीचा वापर अधिक आहे, परंतु ती अनाठायी न वाटता कथेचे पोषण करण्याचे काम करते.

'इनोसंट गेम' ही कथा संगणकाचा वापर आणि उपयुक्तता यावर आधारलेली दिसते. परंतु त्याच्याआड दडलेला वेगळाच गेम असतो, त्याची व्याप्ती मोठी असूनही गूढ कथेसारखी तिला डूब दिलेली आहे. 'सॅम' ही एक व्यक्तिरेखा, वयस्क, चार तरुण मुले आणि संगणकाचा वापर, यांच्यात ही कथा इतक्या सहजपणे उद्दिष्टाकडे पोहोचते की आपण चकित होतो. इथेही इंग्रजीचा वापर आहे. परंतु ती त्या वातावरणाची मागणी आहे, हे नाकारता येत नाही.

कथा लिहिताना ज्या कथेचा पल्ला खूप मोठा आहे, तिला बांधेसूद कसे करावे? 'विसरलेल्या आठवणींची कथा' ही कथा या प्रश्नाचे उत्तर आहे. स्मृती आपल्या हार्डडिस्कवरून डिलिटच करून टाकावी, अगदी रिसायकलबिनमधूनही हद्दपार करावी. परंतु कुठलीतरी अदृश्य कळ दाबली जाऊन नेमका त्याच दुसऱ्या स्मृतीचा पडदा उघडतो. तशी ही कथा. दोन टोकावर वाटणारे ध्रुव समोरासमोर येतात, नव्हे एकाच गुणधर्माशी जोडले जातात, हे सूत्र प्रतिभेचा कस पाहणारे ठरते.

अशोक आणि माधव या दोन मित्रांची कथा म्हणजे 'धुरकट आरशात दडलेला अंधुक चेहरा.' तरल पातळीवर घडणारी कथा एक सुंदर नितळ अनुभव देते. तसाच अनुभव 'कुमार केतकर आणि अरुण टिकेकर' या लेखात येतो. दोघेही पत्रकार, संपादक, आपापल्या वैशिष्ट्यांनी संपन्न असलेले. त्यांच्या व्यक्तित्वावर चिकित्सक प्रकाश टाकण्याची जबाबदारी तशी अवघडच. परंतु या सव्यासी व्यक्तिरेखा अतिशय तौलनिक पद्धतीने, समर्थपणे उभ्या केल्या आहेत. आपले मैत्रेय आड येऊ न देता त्यांच्या सर्वांगीण पैलूंवर निर्भीडपणे लिहिले आहे.

लेखक आपल्या लेखनाकडे कसा पाहतो? भूमिका, दृष्टिकोन, सभोवताल, कथानक, व्यक्तिरेखा याविषयी कसा विचार करतो? कुठल्या वाचकाला पडणारे हे प्रश्न. साधूंनी या प्रश्नांची उत्तरे 'मुखवटा' या लेखात दिली आहेत. साधूंच्या गाजलेल्या 'मुंबई दिनांक', 'सिंहासन', त्रिशंकू' या कादंबऱ्यांप्रमाणेच गाजलेली आणखी एक कादंबरी 'मुखवटा'. चार पुनर्मुद्रणे झालेली ही कादंबरी महत्त्वाची कशी, याविषयी सांगताना, लेखकाचा भूतकाळ तिच्याशी जोडलेला आहे, तो कोणत्या टप्प्यावर, त्यातली नानी ही कशी वेगळी ठरते, यांचा तपशील ते उलगडत जातात. त्यासाठी किती टिपणे काढावी लागली, नकाशे काढून नातीसंबंध कसे जुळवले, यांचीही माहिती ते देतात.

अरुण साधू यांचे साहित्य वाचताना मिळणारा आनंद नक्कीच वेगळा असतो. लेखनातला सकसपणा, विषयाची मांडणी, सोबत सभोवतालचे वातावरण, अंतरंगाचा तळ शोधून त्यातला गाभा पकडण्याची शैली, प्रत्येक व्यक्तिरेखेचे स्पष्ट आणि रेखीव चित्रण आणि मानसिक पातळीवर चालणारे व्यवहार, हे सारे तरलतेने आणि जाणीवपूर्वक येते. मनावर त्याची छाप उमटवून तिथेच रूतून राहते. हे सारे अनुभव पुन्हा आपल्या भेटीला आले आहेत ते या संग्रहातून. या संग्रहाविषयी आणि साधूविषयी शेखर साठे यांनी प्रस्तावनेत खूप आपुलकीने लिहिले आहे. साधूंच्या लेखनाइतकीच ही प्रस्तावना आवर्जून वाचावी अशी आहे. अरुण साधू यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले आहे. विसरलेल्या आठवणींचे जाळे सतीश भावसार यांनी मुखपृष्ठावर उलगडून दाखविले आहे. हा उलगडण्याचा प्रवास देखील वेगळाच आहे.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

**ट्रंप : एक वादळी जीवन**
**डॉ. अनंत प्रा. लाभसेटवार**




**स्वत:चा शिक्का असलेला धुरंधर**

'अमेरिकेच्या २४२ वर्षांच्या इतिहासात स्वत:च विमान असलेला दावेदार अध्यक्ष म्हणून कधीच निवडून आला नव्हता. उद्योजकांच्या नीतिबद्धतेविषयी जनतेच्या मनात प्रश्नचिन्ह असे. पण व्यावसायिक राजकारण्यांनी पोकळ वचनं देऊन आणि विपुल नाकर्तेपणा दाखवून लोकांचा रोष ओढवला होता. त्यामुळे डोनाल्डमध्ये त्यांना पर्याय सापडला.' (पृ. क्र. ६७)

ट्रंप एक वादळी जीवनपट हे डॉ. अनंत लाभसेटवार यांचे नवे चरित्रात्मक पुस्तक. ज्याच्या शीर्षकातच चरित्रनायकाचे वेगळेपण अधोरेखित केलेले आहे. त्याची साक्ष पटते ती पुस्तक वाचल्यानंतर. अर्थात जेव्हा सर्व दृष्टीने लेखक एक मोठी व्यक्ती चरित्रनायक म्हणून निवडते, तेव्हा तिला पूर्णपणे न्याय देण्याची जबाबदारी लेखकावर येते. त्यातून अशी व्यक्ती हयात असेल, आपल्या व्यक्तित्वाचा प्रभाव अधिकाधिक प्रभावी करीत असेल तर ही जबाबदारी अधिकच वाढते. डोनाल्ड ट्रंप हे आज अमेरिकासारख्या सामर्थ्यवान राष्ट्राचे ४५ वे अध्यक्ष आहेत. त्यांच्या चरित्राचा वेध घेण्याचे शिवधनुष्य लेखकाने उचलले आहे, पेलले आहे, इतकेच नव्हे तर ते अतिशय काळजीपूर्वक आपल्या हाती दिले आहे, कुठेही तडा न जाऊ देता. यासाठी अभ्यास, संशोधन आवश्यक असते. डॉ. लाभसेटवार यांचे वैशिष्ट्य असे की, असे चरित्रात्मक वा माहितीपर लेखन करायचे असेल तर प्रथम त्या विषयाचा सखोल अभ्यास करतात. त्याचा अनुभव त्यांच्या इतर यापूर्वी प्रकाशित झालेल्या पुस्तकांनी दिलेला आहे. तोच अनुभव प्रस्तुत वाचताना येतो, नव्हे त्यांनी दिलेले तपशील, आकडेवारी, तारखा, प्रदेश, चौक, इमारती, त्यांची नावे, संबंधित व्यक्तींची नावे, त्यांची क्षमता, राजकारण्यातले बारकावे, संसदेचे घटनेनुसार व्यवहार, हे सगळे पुरावा म्हणून आपल्यासमोर येतात तेव्हा थक्क व्हायला होते. हे सगळे अभ्यासाअभावी कसे शक्य आहे? यासाठी त्यांनी पुस्तकाच्या पृ. क्र. २०८ वर संदर्भसूची दिलेली आहे. शिवाय प्रस्तावनेच्या पृ. क्र. सहावर त्यांनीच स्पष्ट केले आहे की, कुठलंही लिखाण करण्यापूर्वी मी संशोधन महत्त्वाचं समजतो. या प्रस्तावनेत त्यांनी या लेखनाचे प्रयोजनही स्पष्ट केलेले आहे. त्यांची ही प्रस्तावना म्हणजे केवळ पुस्तकाविषयीची भूमिका, इतकीच नाही, तर लेखकाचा लेखनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही स्पष्ट करणारी आहे.

डोनाल्ड ट्रंप अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी उभे राहिले आणि सगळ्या जगाचे लक्ष त्यांनी स्वत:वर केंद्रित करून घेतले. त्याकाळात प्रसारमाध्यमानी त्यांची प्रतिमा कशी आहे याविषयी भरभरून लिहिले, दाखवले. असा माणूस राष्ट्राध्यक्षपदासाठी योग्य नाही, हाच सूर अधिक होता. तरीही जानेवारी २१, २०१७ रोजी वॉशिंग्टनमध्ये त्यांचा राज्याभिषेक झालाच. परंतु विषय इथेच थांबला नाही, सतत त्यांच्याविषयीच्या, त्यांनी जाहीर केलेल्या धोरणांविषयी टीकाटिप्पणी सुरू आहे. त्यासाठी त्यांचे विरोधक प्रत्येक संधीचे सोने करू पाहात आहेत. परंतु ट्रंपही व्यक्ती कुणापुढे हार पत्करणारी नाही, असाच अनुभव येत आहे आणि हे सारे अतिशय तपशीलाने या पुस्तकात आलेले आहे.

डोनाल्ड ट्रंग मुळात राजकारणात नसलेली व्यक्ती. त्यांची खरी ओळख आहे ती एक व्यावसायिक म्हणून बांधकाम क्षेत्रातले एक अग्रणी वलयांकित नाव म्हणून. ती ओळख निर्माण करण्यासाठी केवळ त्याची सौंदर्यदृष्टीच नव्हेतर वाटाघाटीचे चातुर्य अधिक प्रभावी ठरलेले आहे. अमेरिकेत टोलेजंग इमारती उभ्या करताना त्यांनी 'ट्रंप' हे नाव कायम अग्रभागी ठेवलेले आहे. अर्थात त्यासाठी प्रचंड अशी किंमत त्यांना मोजावी लागलेली आहे. तिचा तपशील वाचताना आपणच थक्क होतो. यातून एक धीरोदात्त व्यक्तिमत्त्व समोर उभे राहते. त्यांनी केलेले वेगवेगळे व्यवसाय, प्रयोग, याच्या जोडीला आणखी एक थक्क करणारी गोष्ट आपल्यासमोर येते ती म्हणजे डोनाल्ड ट्रंप लेखक आहेत. वीस पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. ती सगळी विक्रमी पद्धतीने विकली गेली आणि त्यावर मिळालेले मानधनही विक्रमी आहे, हे सांगायला नको.

डोनाल्ड ट्रंप यांचा जीवनपट उलगडणे सोपे काम नाही. परंतु डॉ. लाभसेटवार यांनी अतिशय पद्धतशीरपणे त्याची मांडणी केलेली आहे. बालपणापासून ते पुस्तक प्रकाशनाच्या दिनांकापर्यंतचा सर्व तपशील एकेक पैलू घेत मांडला आहे. त्यातून डोनाल्ड ट्रंप हे स्वतंत्र साम्राज्य आहे, याचा प्रत्यय येतो, तसा एक हरहुन्नरी माणूस म्हणूनही लक्षात येतो. त्यांच्या स्वभावातले एकेक पैलू समर्थपणे उलगडून दाखवलेला आहे. हे पुस्तक वाचत असताना खात्री पटते हे एक वादळी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्याविषयी असलेल्या शंका, प्रश्नच अनुत्तरीत होतात असे नव्हेतर इथपर्यंतचा प्रवास कसा वादळ होता, आणि तरीही ट्रंप ठामपणे उभे आहेत, याचेच नवल वाटत राहते. लेखकाने एक समग्र चरित्र आपल्याहाती दिले आहे असे ठामपणे म्हणता येते. नव्हे एक भव्य पट पाहात असेच वाटत राहते. सतीश भावसार यांनी छान मुद्रा मुखपृष्ठावर ठेवून मुखपृष्ठ सजवले आहे.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**माणूसजत्रा**

**आदित्य अ. जाधव**




**माणसाच्या जगण्याची कविता**

कविता भरतीसारखी येते, अंतरंगातील भावनेच्या सागरातून तरंगत मनाच्या किनाऱ्यावर अवचित अवतरते. ती विचार करून, ठरवून नाही करता येत. कधी स्वप्न बनून झोपेत डोकावते, कधी रखरखत्या उन्हात सावली बनून येते. तर कधी तिन्ही सांजेला आठवणीचा सुखद गारवा देणारी झुळूक बनते. कविता असते मुग्ध, निखळ आनंद देणारी, आल्हाददायक, लोभस कळीसारखी! कविता ही एखाद्या प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धचा संताप असते. कविता कधी आक्रोश मांडते, कधी लिंगभेदाच्या वेदना सहन करत तळमळते. आपल्या कवितेविषयी लिहिणे अवघड असते. कविता कधी, कशी, कोणत्या रूपात अस्तित्वाला गवसणी घालील, याचा कुठलाच नियम नाही, नेम नाही. तिचे रूप कितीही न्याहाळून पाहण्याचा प्रयत्न केला तरी तिच्या मूळापर्यंत पोहोचणे साध्य झाले, असे कुणी छातीठोकपणे सांगू शकत नाही. तरीही तिची वेणा आणि वीण कवीची असतात आणि त्याविषयी कवी काही सांगू शकतो. तो एकप्रकारे आत्मशोध म्हणता येईल. तो शोध कवीने स्वत:च्या मनोगतातून व्यक्त केला आहे. कविता समजून घेण्यासाठी या आत्मशोधाची खरी निकड असते.

'माणूसजत्रा' हा आदित्य अ. जाधव यांचा दुसरा कवितासंग्रह. या संग्रहात एकूण ७४ कविता आहेत. या कविता वाचून झाल्यावर लक्षात आले, एका बैठकीत वाचून सोडून द्याव्यात, अशा या कविता नाहीत. वरवर पाहता त्या खूप साध्या आणि सोप्या वाटतात, परंतु त्यांच्या गाभ्याकडे लक्ष दिले तर कळते, या कविता पुन्हा पुन्हा वाचण्याची गरज आहे. प्रत्येक कवितेचा विचार स्वतंत्रपणे करायला हवा. अन्यथा या कवितांवर अन्याय केल्यासारखे होईल. आपण उदाहरण घेऊन पाहू या.

विषय (पान क्र. ११) चार कडव्यांची ही मोजकी कविता आहे. काय अपेक्षित आहे या कवितेत, एक शब्द. आश्वासक, स्थैर्य, आध्यात्म आणि माणूसपण यांना जोडणारा शब्द. या शब्दासाठी त्यांनी जे संदर्भ दिले आहेत, त्या प्रत्येकाला मोठा अर्थ आहे, हे आपण विसरू शकत नाही. उपहास, उपरोध यांनी भारलेले काटेरी वास्तवाचे भान ही कविता जागे करते. कुठलीच गोष्ट आता शाश्वत राहिलेली नाही. कधीकाळी चंद्रभागा बारामाही वाहात असायची, पाण्याने आणि भक्तांनी. बाराही महिने जगता येईल अशी सुगी होती आणि आध्यात्म, परमात्मा, सात्त्विकता यांचे अधिष्ठान जागृत होते. आज कुठे आहे हे सारे? हा एकच अर्थ या कवितेत नाही. परंतु त्यासाठी ही जागा नाही. प्रत्येकाला या कवितेत वेगळा अर्थ सापडेल.

तुळस (२९) या कवितेतील तुळस हे रूपक असेच अनेक अर्थांनी समोर ठेवलेले आहे. अंगणात तुळस असणे, यात अप्रुप आहे की गृहीत धरणे आहे? दारी इतर रोपे रूजत नाहीत, तुळस जेवढी रूजते, यात काय अपेक्षित आहे कवितेतून? तुळस ही आदर्श, संस्कार, निर्व्याज, सौख्य, भक्ती, प्रेम, सौभाग्य यासारख्या अनेक अर्थांनी योजलेले आहे. त्यांची जपणूक, जोपासना यावर सगळे अवलंबून आहे. त्याला तडा जाऊ द्यायचा की खतपाणी घालायचे, हे ज्याच्या त्याच्यावर अवलंबून आहे. परंतु कवी आपल्याकडून खतपाण्याची अपेक्षा ठेवतात, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

कवीने मनोगतात व्यक्त केल्याप्रमाणे या माणसाच्या कविता आहेत. हा माणूस मातापित्यांना विठ्ठलरुखमाईचा रूपात पाहतो. लेकीच्या संसार कल्पनेने हरखतो कधी काळजीत पडतो. भाऊ, बहीण या नात्याविषयी आपुलकी दाखवतो. आपला गाव, परिसर यांच्या कल्पनेत रंगून जातो. शिवाराच्या हंगामात ऊनपाऊस झेलतो. परंतु तोच माणूस एका शब्दासाठी जीव ओवाळून टाकतो नाहीतर हाती पलिता घेऊन जीवावर उठतो. त्याची वृत्ती टाळमृदुंगाची शांततेची पण त्याचवेळी बंडखोरीची. हे सारे हळुवार तर कधी सूचक पद्धतीने कवीने कवितेतून व्यक्त केले आहे. माणसाचे हरवलेपण, तुटलेपण, एकाकीपण कवीला हेलावून सोडते.

या संग्रहात निसर्ग आहे, हंगाम आहे, सुगी आहे. रान हा विषय कवीला खूप जवळचा. ''रानात झरला आषाढात''(३), ''रानातल्या माणसांना'' (२३), ''दूर रानात गोंधळ'' (३०), ''रान सांगे मूळकथा'' (४४), ''रान घालते चकवा'' (४६), ''पोखरून गेले रान'' (४९) याप्रमाणे तीन हा शब्द. तो सकाळ, दुपार, संध्याकाळ, उन्हाळा, पावसाळा, हिवाळा, बालपण, तारुण्य आणि वृद्धत्व, अशा संदर्भांना ते लागू आहे.

या कविता आशावाद व्यक्त करतात. जगण्याचे सूत्र सांगताना ते अवघे चार घडीचे, हाडामासाचे, त्याच्या भोगात अडकून मोक्षाकडे दुर्लक्ष करू नका. जे जे वाईट असेल ते ओरबडून पुढे जा. जीवनाची बाग फुलवा आणि जगताना मनी हीच फुललेली बाग ताजी ठेवा. ही सकारात्मकता या कवितेची ताकद आहे. या कविता कवीविषयीची आश्वासकता व्यक्त करतात. कधी अभंगाच्या नादात, तालात, लय घेऊन आलेल्या कविता दमदारपणाचा प्रत्यय देतात. एक चांगला संग्रह वाचला याचा आनंद देतात.

माणूसजत्राचे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी आशयपूर्ण सजवले आहे.

**मूल्य १२० रु.   सवलतीत ८० रु.**

# ग्रंथपान

**राघवशेला**
**डॉ. विजयकुमार देशमुख**




**ईप्सित माहीत असलेली आत्ममग्न कविता**

'डंख मारुनी इथे, भुसभुशीत रात्री जाग्या झाल्या,
एक पहाट तेवत ठेवुनी, चांदण्या विरुनी गेल्या.'

डॉ. विजयकुमार यांचा हा नवा कवितासंग्रह, 'राघवशेला'. ग्रंथालीची उत्तम निर्मिती असलेला हा संग्रह उत्तम दाद द्यावी, अशा कवितांनी नटलेला. प्रत्येक कविता तिचे वेगळेपण घेऊन आलेली, तिच्यातल्या कल्पना आणि चिंतनाची त्यांना मिळालेली जोड, त्यामुळे मनात रुंजी घालत राहतील अशा या कविता. या कवितांना एक लय आहे. सहज चाल लावून सादर करता येतील असा नाद आहे. ती कधी गझलेच्या जवळ जाते तर कधी लोकगीताचा साज लेऊन आपल्याशी हितगुज करू पाहते. साधा आणि सहजपणा हा तिचा स्थायीभाव, परंतु तितकीच आशयाने संपन्न असलेली. वाचकाच्या मनाला हळुवारपणे साद घालणारी. कधी तिच्याच नादाने पुढे जाणारी. आपले ध्येय माहीत असलेली. कुठे थांबायचे याचे भान असलेली. त्यामुळे प्रत्येकाच्या मनातली. स्थळकाळाला आपल्या सोबत घेतलेली. ताजी आणि त्यावेळी आत्ममग्नतेत स्वतःला शोधणाारी.

कविता ही ठरवून वा आखून लिहिली जात नाही. तसे झाले तर तिच्यातला कृत्रिमपणा लक्षात यायला वेळ लागत नाही. मुळात कविता अशी कागदावर कधी उतरत नाही. काळजाचा हुंकार, जमिनीतून बीज अंकुरावे तसा तिचा जन्म. तिच्यातला निरागसपणा आणि तितकाच निर्लेप प्रसन्ना मोहून टाकणारा. हा नितळपणा ज्या कवितेत सापडतो ती कविता सगळ्यांची होते. अशी ही सगळ्यांची कविता. कवीने अनेक विषयांना हात घातलेला आहे. तरुण वयातले उमलते उन्मेष सापडतात ते प्रेमाचे. किंबहुना अनेकांचे कवितालेखन सुरू होते ते या प्रेमाच्या नवथर भावनांतून. प्रेम आणि त्यातून वाट्याला येणारा विरह, ही संकल्पना काही नवीन राहिलेली नाही. अर्थात त्यामुळे शिळी झाली आहे, असेही म्हणता येणार नाही. सर्वकाळात ती चिरंतन आहे आणि राहणार आहे. कवी त्याला अपवाद असण्याचे कारण नाही. या संग्रहातील बऱ्याचशा कविता त्यांचा प्रत्यय देतात. ऋतुगंधात न्हाताना माझा स्वप्नपक्षी चंद्रकलांनी फुलतोय, तुझ्या नाजूक पावलांसाठी मी टाकला फुलांचा सडा, असे म्हणताना कवीने जणू तमाम प्रेमीजनांच्या मनातले बोल आपल्यासमोर ठेवले आहेत, असे म्हणता येईल. अशा तऱ्हेने व्यक्त होणे तरल पातळीवरचे ठरते. परंतु त्याचवेळी एक भाव महत्त्वाचा ठरतो. 'पाहून हे बेईमान तारे, मुशाफिरा थांबलास का रे? इथे चंद्रही कधी कधी काळवंडतो.' हे भान विसरता येत नाही.

उर्दू काव्यात मृत्यूचे दर्शन अपरिहार्य असते. त्याची अनेक रूपे अनुभवास येतात. या संग्रहातही हा अनुभव जिवंत आहे. 'माझ्या प्रेताला मीच खांदा देतो', 'इथल्या प्रत्येक प्रेताला मीच खांदा देतो', 'माझे मीच पाहतो मरण', 'समोर मृत्यू असूनही पतंग झेपे दिव्याकडे.' या प्रत्येक ओळीला खूप मोठे असे संदर्भ आहेत. ते नैराश्याकडे घेऊन जात नाहीत, तर अंतर्मुख करतात. 'शोधतो तळ अंतरीचा, कुणी म्हणती हा खेळ संचिताचा', 'शाश्वत पांथस्थ अशाश्वत क्षणांची चिरंतन वाट चालणारे', असे चिंतन वाचताना अध्यात्माच्या जवळ जाणारे सत्य समोर मांडले आहे, असे म्हणावेसे वाटते.

आपल्या भोवती असलेले वास्तव कवीने नजरेआड केलेले नाही. किंबहुना असलेले वास्तव किती भीषण आहे, स्वार्थ आणि पोकळपणाने कसे व्यापलेले आहे, यावरचा पडदा ते नेमकेपणाने वर उचलतात. 'गारपीटग्रस्तांना त्यांनी भरघोस मदत केली पण सरकारी कागदपत्रांत ती गहाळ झाली.' हे वास्तव कोण नाकारील? समूहाचे अज्ञान हे स्वार्थ जोपासण्यासाठी कुरवाळावे लागते. त्याचे भान येते तेव्हा खूप उशीर झालेला असतो. त्याविषयी कवी लिहितात, 'आम्हाला एक कळला असता तर त्यावर आम्हीही दोन शून्यं दिली असती.' 'कटाव', 'फास', 'प्रीतीचं फूल', 'शिवार' यासारख्या कविता लोकगीताशी जवळीक साधतात. तर काही ओळी आपल्याला वेगळ्याच अनुभवांच्या उंचीवर घेऊन जातात, जशा,'कोरा माठ झिर्पल्यावानी तू रडू नको मुळूमुळू', 'मोटेलाच असतो पाण्याचा कळवळा', 'पावशाच्या डोळ्यात चाहूल पावसाची'.

या कविता आशेची ज्योत तेवत ठेवतात. 'खेळ नियती, खेळ तू, जसा तुला हवा. थेंब थेंब तेलाने तेवत ठेवीन अखंड दिवा...', 'कधीतरी पहाट होईल हे सुंदर स्वप्न पाहत... डोळे सताड उघडे ठेवतो.' अशा ओळी ते सहजपणे लिहून जातात. या कवितांतून जसा आशावाद व्यक्त झाला आहे, तसा तो कवीबाबतही व्यक्त होतो. त्यांची तरलता, विषयाला भिडण्याची क्षमता, व्यक्तअव्यक्तातील नेमके अंतर, यामुळे ही कविता मनाला थेट भिडते. या कवितेविषयी प्रस्तावनेत प्रा. बाळासाहेब बोरसे यांनी आश्वासकतेचीच ग्वाही दिलेली आहे. दासू वैद्य यांनी केलेली पाठराखण तितकीच कौतुकाची आहे. स्वतः कवीने मनोगतात एक हृद्य आठवण दिलेली आहे. पावसात घडलेल्या दोन घटनांशी जोडलेली. कवितेची भिजलेली पहिली वही आणि मित्राच्या आईचा मृत्यू, याला कारण पाऊस. कवीच्या संवेदनशील मनावरचा हा ओरखडा ते आजही बाळगत आहेत. जो संवेदनशील असतो त्याच्या कविता भावनांच्या डोहातून वर येणे स्वाभाविकच असते, फुलांच्या गंधासारख्या. सुंदर कविता. सतीश भावसारांचे मुखपृष्ठही सुंदर आहे.

**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

# ग्रंथपान

**युगांतराची कविता**
**किशोर सानप**




**सृजनशील उर्जामयी युगद्रष्ट्या प्रतिभावंतांची आत्ममुद्रा**

कवी कविता लिहितो म्हणजे काय करतो? त्याच्या कवितेचा प्रवास कशावर आधारित असतो? कवीची प्रतिभा, कल्पनाविलास, सृजनता यांची लय कशी साधली जाते? कवी कविता जगत असतो की जगणे ही त्याची कविता असते? कवी आणि कविता एकच असतात की दोन वेगळे घटक आहेत? कवीच्या लेखनात त्याची स्वतःची काही भूमिका असते का? सभोवतालचा समाज, राजकारण, आर्थिक विषमता, भलेबुरे, उच्चनिच्च, श्रद्धा, यापासून ते माणूस आणि त्याचे माणूसपण, या सगळ्यांत कवी किती असतो, त्यांचा कवीवर किती प्रभाव असतो, असे असंख्य प्रश्न आहेत. हे प्रश्न कवी आणि त्याची कविता यांना समोर ठेवून उपस्थित झालेले असतात, कायम त्यावर चर्चा होते. वाचक म्हणून कविता वाचत असताना हे प्रश्न आपल्याभोवती फेर धरतात. कुठे कार्यक्रमात कविता ऐकतानाही या प्रश्नांपासून सुटका होत नाही. थोडक्यात कविता समजून घेताना कवीलाही समजून घेण्याची आवश्यकता असते. तसे झालेतर कविता थेट भिडण्यास मदत होते. ती कायमची मनाशी रुंजी घालत राहते. कवी आणि कवितेशी नाते घट्ट होत जाते. 'युगांतराची कविता' हा ग्रंथ ही अपेक्षा पूर्ण करतो. हा ग्रंथ वाचत असताना आपल्या मनातील प्रश्नांची उत्तरे इथे सापडत जातात. कवी आणि त्याची कविता यांच्यात असलेले नाते उलगडत जाते. वाचलेल्या कविता पुन्हा नव्याने वाचायला हव्यात, असे सतत वाटत राहते.

'युगांतराची कविता' हा ग्रंथ तसा भला थोरला, आवाका मोठा असल्याने आकारही मोठा आहे. ग्रंथालीची ही उत्तम निर्मिती पटकन नजरेत भरावी अशी आहे. ग्रंथ समोर दिसताच हाती घेऊन चाळण्याचा मोह व्हावा असा. यशवंत मनोहर, सतीश काळसेकर, श्रीपाद जोशी, श्रीकांत देशमुख, अशोक कोतवाल, भगवान निळे, राजीव जोशी, अजीम नवाज राही, सुशीलकुमार शिंदे, वाहरू सोनवणे अनुजा जोशी, सुचिता खल्लाळ, शोभा रोकडे अशा एकूण सदतीस मान्यवर कवी–कवयित्रींचा समावेश या ग्रंथात आहे. यांची विभागणी सहा विभागात केलेली असून प्रत्येक कवीसाठी स्वतंत्र प्रकरण आहे. त्यांची वैशिष्ट्ये त्यांच्या शीर्षकातून व्यक्त केलेली आहेत. प्रत्येकाची वैशिष्ट्ये सांगताना पुन्हा उपशीर्षकांची योजना केलेली आहे. त्यामुळे आशयाचा ठळकपणा संदर्भ म्हणून सहजपणे लक्षात यावा. उदा. यशवंत मनोहर यांच्या कवितांची मांडणी करताना 'युगांतर', 'युगमुद्रा', 'बाबासाहेब' हे तीन कवितासंग्रह विचारात घेतलेले आहेत. या संग्रहांतून व्यक्त झालेली अभिव्यक्ती वैश्विक पातळीचा वेध घेते तरीही तिच्या मुळाशी असतो तो माणूस. 'युगांतराची युगमुद्रा : बाबासाहेब', 'बाबासाहेब : नव्या युगाचे युद्धगीत', 'माझ्या वर्तमानाची वाकलीय कंबर', 'नागड्या शब्दांसाठी आग्रह', जागतिकीकरण आणि माझ्या जगाची कविता', 'माझे शब्द श्वासांची विद्यापीठे घेऊन फिरत आहेत', 'कसायाच्या तावडीत सापडलेले लोकशाहीचे जितराब' अशी अनेक उपशीर्षके लेखात चपखलपणे योजिलेली आहेत. सोबतीला आशय व्यक्त करणाऱ्या कवितांच्या ओळी आहेत. त्यामुळे संपूर्ण कविताचे गाभाच अलगदपणे मोकळा करून दाखविल्याचा प्रत्यय येतो.

साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित झालेले कवी श्रीकांत देखमुख यांच्या लेखाचे शीर्षक आहे 'भूमी सावरण्याची गोष्ट'. 'बळिवंत', 'आषाढ माती', 'बोलावे ते आम्ही' हे त्यांचे संग्रह प्रकाशित आहेत. या कवीच्या कवितेत शेती आणि शेतकरी यांना केंद्रस्थानी ठेवलेले आहे. त्यांच्याविषयी लेखक लिहितात, 'कृषिवल संत तुकोबाच्या भूमिस्वराशी आपली नाळ जोडून हा कवी कृषिवलांच्या बाजूने ठामपणे उभा आहे.' त्यासाठी उद्धृत केलेल्या ओळी आहेत,

बळिवंत आम्ही ढेकळांचे दास,
भूईचाच वास अंगोपांगी
आम्हा हाती माती आम्हा ओठी माती,
जीव झाला माती वावरात.

कवयित्री शोभा रोकडे यांच्या कवितेविषयी डॉ. नीलिमा गुंडी, डॉ. अरुणा ढेरे सारख्या अनेक मान्यवरांनी गौरवोद्गार काढलेले आहेत. त्यांची नोंद लेखकाने आवर्जून घेतलेली आहे. 'शहर आत्महत्या करायचं म्हणतंय' या संग्रहाचा आजचा आघाडीचा कवी सुशीलकुमार शिंदे यांच्या कवितेचे वर्णन करताना लेखक लिहितात, 'सर्वहारांच्या अंतर्मनात उजेड पेरणारी कविता.' कवीची भूमिका, कवितेचे स्वरूप, कविता नेमकी काय असते? यांची उत्तरे शोधणारा कवी दिंगबर झाडे, अस्वस्थ वर्तमानाच्या नोंदी कानामात्रावेलांटी या संग्रहात घेणारा कवी राजीव जोशी, अशा या संग्रहात समावेश केलेल्या कवी आणि त्यांच्या कवितेविषयी लेखकाने केलेली चिकित्सा आणि समीक्षा, ही त्या त्या कवींसाठी खास पुरस्कार ठरावा तर वाचकांसाठी वाटाड्या.

या ग्रंथाविषयी डॉ. किशोर सानप यांनी त्यांची भूमिका प्रस्तावनेत स्पष्ट केलेली आहे, '' 'युगांतराची कविता' या ग्रंथात समाजाच्या सर्व स्तरातील, प्रवाहातील, कवींच्या कवितानिर्मितीतून युगांतराची व्यक्त झालेली चाहूल शोधण्याचा प्रयत्न आहे. हा प्रयत्न आहे मराठी भाषा,साहित्य, आणि संस्कृतीच्य क्षेत्रात पहिल्यांदाच प्रतिभा व नैतिकतेची सर्वकष चिकित्सा करणारा तसेच कवी आणि कवितेची सामाजिक व वाङ्मयीन परिप्रेक्ष्यात सांस्कृतिक समीक्षा करणारा हा लेखनप्रपंच आहे.'' त्यांचा हा ग्रंथ कवींना आणि कवितेचा अभ्यास करणाऱ्यांना नक्कीच मार्गदर्शक ठरेल असा विश्वास वाटतो.

सतीश भावसार यांनी सजविलेले मुखपृष्ठ अंतर्मुख करायला लावणारे तसेच खिळवून आहे. सृजनता आणि उर्जा यांचा अनोखा समन्वय कवितेसारखाच चित्रित झालेला आहे.

**मूल्य ६०० रु. सवलतीत ३५० रु.**

# ग्रंथपान

**‘डी.के.दातार**
**द व्हायोलिन सिंग्ज**
**डॉ. स्मिता दातार**




**गाण्यासारखे वाजणाऱ्या व्हायोलिनचे मनोगत**

‘डी.के. दाताराच्या ‘शुद्धकल्याण’ रागाने रसिकांना वेड लावलं होतं. ‘शुद्धकल्याण ते असा वाजवायचे की गाणं चालू आहे असं वाटावं. त्यांचे खर्जातले आलाप रागाची खोली दाखवायचे आणि द्रुतगतीतले आकार रागाची उंची दाखवायचे. त्यांच्या एका रागात त्या रागासंबंधीचा विचार असायचा. त्याच्या जोडीला स्वतःच्या कल्पनाशक्तीनं आणि प्रतिभेनं तो राग ते फुलवायचे.डी.के.चं व्हायोलिनवादन विचारांच्या जवळ जाणारं होतं. प्रगल्भ होतं, तरी सोपं वाटायचं म्हणून ते आपलंसं वाटायचं.’

सुप्रसिद्ध व्हायोलिनवादक पं. डी.के. उर्फ दामोदर केशवराव दातार यांच्या चरित्राच्या लेखिका आहेत डॉ. स्मिता निखिल दातार. लेखिका नात्याने स्नुषा, व्यवसायाने जनरल फिजिशन, अभिनेत्री, निवेदिका आणि उत्तम अशा लेखिका आहेत. साहित्याची आवड, सौंदर्यदृष्टीचे वरदान लाभलेले, अभिनयातून व्यक्तिरेखा सजीव करण्याची अंगभूत कला, यासगळ्यांचा परिणाम या लेखनातून प्रकर्षाने जाणवतो. प्रसिद्धीमुळे, कलेमुळे सार्वजनिक जीवन झालेल्या घरातील ज्येष्ठ मान्यवराविषयी लिहिणे वाटते तितके सोपे नाही. सजगतेने आणि तितकेच तोलूनमापून ही कलाकुसर केल्याप्रमाणे करावयाची कामगिरी आहे. स्तुती वा अतिस्नेहापोटी लेखन भरकटले जाण्याची शक्यताच अधिक असू शकते. परंतु लेखिकेने असा कुठलाही असमतोल येऊ न देता हे लेखन केलेले आहे. या लेखनात त्यांच्या प्रगल्भ साहित्यिक गुणांचे प्रतिबिंब प्रतीत झालेले आहे. त्यामुळे एक चांगले चरित्र वाचकाच्या हाती आले आहे.

डी.के. दातार यांच्या चरित्राचे लेखन हे प्रथमपुरुषी निवेदन पद्धतीने केलेले आहे. यात कल्पकतेचा भाग असा की, हे निवेदन कुणी व्यक्ती करीत नसून व्हायोलिन स्वतः हे करीत आहे. दातारांनी आयुष्यभर व्हायोलिनशी नाते जोडलेले होते. त्यांचे आयुष्य व्हायोलिनमय झालेले होते. अशा थोर कीर्ती लाभलेल्या व्हायोलिनवादकाच्या चरित्राचा निवेदक व्हायोलिन असणे ही कल्पकता अतिशय सुंदर आणि तितकी चपखल म्हणावी लागेल. दातारांना संगीताचा वारसा घरातच लाभला. वडील केशवराव आणि विष्णु दिगंबर पलुसकर हे दोघे गुरूबंधू होते. बंधू नारायण उर्फ बापू हेही संगीत शिक्षक म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचाच हा वारसा दामोदर यांच्याकडे आला. वयाच्या बाराव्या वर्षी दामोदरला व्हायोलिनवादनाची उत्तम जाण प्राप्त झाली होती. दक्षिणेतून व्हायोलिन शिकून आलेले विघ्नेश्वर शास्त्री यांच्यासारखे गुरू त्यांना लाभले. आणि तिथून त्यांचा हा व्हायोलिन वादनाचा प्रवास पुढे चढत्या भाजणीत आतंरराष्ट्रीय कीर्तीपर्यंत पोहोचला. तशी ‘शुद्धकल्याण’ ही त्यांची खास ओळख निर्माण झाली.

फिल्म डिव्हिजनने त्यांना स्वतः स्वतःशी जोडून घेतले. आकाशवाणीवर कार्यक्रम केले, एचएमव्हीसाठी काम केले, देशात, परदेशात व्हायोलिनवादनाचे अनेक जाहीर कार्यक्रम केले, अनेक चित्रपटांना संगीतसाथ केली, परंतु त्या चित्रपटक्षेत्रात ते फारसे रमले नाहीत. त्यांनी स्वतःचे स्वतंत्र असे अस्तित्व आणि स्वातंत्र्य जपले. त्यांचा शिष्यगण मर्यादित होता. आपली स्वतःची स्तुती करवून घेणे वा कुणाकडे मुद्दाम त्यासाठी ऊठबस करणे हा त्यांचा स्वभाव नव्हता. त्यांच्या एकूण स्वभावाविषयी आणि त्याच्या परिणामाविषयी लेखिकेने आस्थेने लिहिलेले आहे.

डीके यांचा जीवनप्रवास हा व्हायोलिनवादक म्हणून झाला. तेव्हा व्हायोलिनविषयी लिहिणे आवश्यक ठरते याचे भान लेखिकेने जपलेले आहे. व्हायोलिनवादन म्हणजे काय, त्याची वाजवण्याची पद्धती, त्यावरील पकड, प्रत्येकाची नावे, हे वाद्य यापूर्वी कसे आणि कुठे वाजवले जात असे त्याचा इतिहास, व्हायोलिनची कूळकथा, अशी खूपशी उपयुक्त माहिती यात दिलेली आहे.

डीकेंना त्यांच्या आयुष्यात संगीत क्षेत्रातली अनेक दिग्गजांचा सहवास लाभला. पलुस्कर, कुमारगंधर्व, लक्ष्मीकांत–प्यारेलाल, हरिप्रसाद, शंकर अभ्यंकर, अशी अनेक, जो अतिशय नितळ आणि स्नेहपूर्ण होता. त्यांनी डीकेंविषयी काढलेल्या प्रशंसेच्या उद्गारांची लेखिकेने अगत्याने या चरित्रात नोंद घेतली आहे. त्यांना मिळालेले पुरस्कार, त्यांचे सोहळे, डीकेंचे कौटुंबिक आयुष्य, त्यांची क्रिकेट, कॅरमची आवड, व्यसनापासून अलिप्त असणे, त्यांची शिस्तबद्ध अशी दिनचर्या, संगीत साधना, त्याविषयीचा त्यांचा दृष्टिकोन, असे व्यापक धांडोळा घेत या चरित्राला अधिकधिक परिपूर्ण करण्याचा केलेला प्रयत्न स्तुत्य म्हणायला हवा.

पं. कुमारगंधर्व यांनी स्वतःसाठी बनवून घेतलेले दोन तानपुरे डीकेंना भेट दिले. डॉ.शिरोडकर यांनी खास त्यांच्याकडेच शिष्यत्व स्वीकारले आणि संधी मिळाली तेव्हा लंडनहून ‘इटालियन मेकर ऑफ नेओपॉलिटन स्कूल’ या मेकचे गोल्डन वार्निश लावलेलं लाखो रुपये किमतीचे व्हायोलिन भेट म्हणून आणले. या भेटीचा प्रसंग मजेशीर आहे.

व्हायोलिन हे निवेदक म्हणून डीकेंविषयी निवेदन करीत असताना स्वतःविषयी देखील तितकेच हळूवारपणे भावना व्यक्त करते. या निवेदनातला तरलपणा आणि आशयातले हळवेपण यातून साकारलेला हा चरित्रग्रंथ लेखिकेच्या सृजनाचा उत्तम नमुना म्हणता येईल. शीर्षकांची योजना करताना रागदारीची घेतलेली सोबत ही कल्पना आशयाच्या गाभ्याला फुटलेल्या कोवळ्या फांद्यासारखी अनुरूप ठरलेली आहे.

या ग्रंथांची निर्मिती अतिशय सुंदर आणि तितकीच आकर्षक पद्धतीने केलेली आहे. डबलक्राऊन साईजमध्ये असलेले या ग्रंथात रंगीत फोटो जोडलेले आहेत. ज्यातून डीके यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडण्यास मदत होते. मुखपृष्ठावर डीकेंची संगीतात समाधी लागल्याची भावमुद्रा साकारलेली आहे. विशेषतः या ग्रंथाचा निवेदक असलेले व्हायोलिन जे डीकेंच्या संपूर्ण प्रवासात कंठस्थ स्थानी होते, ते इथे कंठाशी विराजमान झालेले आहे. सतीश भावसारांची ही ही सगळीच कल्पकता मनोमन भावणारी आहे.

**मूल्य ४०० रु. सवलतीत २५० रु.**




# ग्रंथपान

**जय भीम लाल सलाम**
**संपादन संदीप काळे**



**सामाजिक न्यायातंर्गतचा छायाप्रकाश**

'सामाजिक न्याय हा विषय आज चर्चेसाठी का घेतला? व्हाय वुई आर दी डिस्कशन ऑफ सोशल जस्टीस? असा कोणता काळ आलेला आहे की, यावर आपल्याला चर्चा करणे भाग पडलेलं आहे? असं कोणतं पर्यावरण निर्माण झालेलं आहे की, आपण सामाजिक न्यायाचा विचार करायला बसलेलो आहोत? अशी कोणती राजनीती आलेली आहे की, जिनं सामाजिक न्यायावर एकत्रितपणे चर्चा करायला आपल्याला भाग पाडलेलं आहे? जी परिस्थिती समजावून तुम्ही घेतलीत तर मग सामाजिक न्यायावर चर्चा का घडते आहे आणि ती अजून घडायला पाहिजे, याची तुम्हाला खात्री पटेल.'

'सामाजिक न्याय' हा विषय नुसता राज्यशास्त्रानुसार शिकण्याचा वा शिकविण्याचा नाही, तर तो पाळायचा, अमलात आणायचा आणि राज्य त्या संकल्पनेवर उभे आहे याची खात्री पटवण्याचा विषय आहे. न्याय केला असा म्हणून चालत नाही, न्याय झाला असे दिसले पाहिजे, असे न्यायालयाच्या भाषेत सांगितले जाते. मग तो न्याय सिव्हिल आहे की क्रिमिनल, याची चिकित्सा नंतर. आपण समाजात वावरत असू तर प्रत्येकाच्या मूलभूत हक्काचे रक्षण झाले पाहिजे. केवळ घटनेत ही कलमे असून भागणार नाही, ती जपण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. डॉ. बाबासाहेबांनी घटनादत्त अधिकार आणि हक्काची मूलभूत कलमे  आपल्यासमोर ठेवली, त्याला मोठी पार्श्वभूमी आहे, ती समजून आचरणात आणण्याची गरज अधोरेखित झालेली आहे. ती पुन्हा पुन्हा सांगण्याची गरज आजही भासते आहे, हे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार संमेलना'तून दिसून येत आहे.

'विचार संमेलना'ची संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीवर्षापासून नागपूर येथे अमलात आली. नांदेड येथे पार पडलेले हे पाचवे संमेलन. या संमेलनात 'सामाजिक न्याय' हा प्रमुख विषय ठेवण्यात आला होता. राज्यघटना, शेतकरी, श्रमिक, महिला, मुले, अल्पसंख्यांक, माध्यमे व एनजीओंची भूमिका, आंबेडकरवादी आंदोलन अशा अनेक अंगांनी या विषयावर मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. हे बहुमोल विचारांचे मोल केवळ उपस्थित श्रोत्यांपुरते राहू नये, काळाच्या धावपळीत हे विचारधन तिथेच गोठून नंतर वाऱ्यावर उडून जाऊ नये, तर ते जतन करायला हवे. त्यांचे संकलन करून त्याचा दस्तऐवज करायला हवा. सव्यासी, चोखंदळ आणि समाजभान असलेले पत्रकार, संपादक संदीप काळे यांनी ही संकल्पना कल्पकतेने मूर्त स्वरूपात साकारली. त्यांचा हा दस्तऐवज म्हणजे 'जयभीम लाल सलाम' हे पुस्तक होय.

सामाजिक न्यायाची तुलना करताना केवळ भारतातच हा विषय महत्त्वाचा ठरतो असे नाही, तर अमेरिकेतही त्याची कशी पायमल्ली केली जात आहे, याचे उदाहरण कुमार केतकर यांनी दिले आहे. अमेरिकेत असलेली तुरुंगांची यंत्रणा ही सर्वात जास्त दुष्ट यंत्रणा आहे. तेहतीस कोटी लोकसंख्येच्या देशात तीस लाख लोक तुरुंगात आहेत आणि पस्तीस लाख लोक तुरुंगाच्या वाटेवर आहेत. त्यापैकी केवळ पाच ते दहा टक्के गौरवर्णीय आहेत. उरलेले कैदी हे कृष्णवर्णीय, काळे, मेक्सीकन व एशियन आहेत. प्रज्ञा दया पवार यांनी दलित, मुस्लीम, अल्पसंख्याक समूहांवर होणाऱ्या अत्याचार व हिंसाचाराची उदाहरणे देत, न्याय नावाचं मूल्यच धोक्यात आलेलं असून सामाजिक न्यायाची स्थिती अतिशय बिघडलेली आहे, असे निदर्शनास आणून दिले आहे.

आजच्या घडीला श्रमिक, शेतकरी, आदिवासी यांच्या समस्यांची तीव्रता समजून घेण्याची आवश्यकता आहे. चळवळींना असलेले बळ जाऊन आता त्या दुर्बळ अवस्थेत आहेत. भांडवलशाही आणि सार्वजनिक संपत्तीचे खाजगीकरण याचा फारमोठा परिणाम सामाजिक जीवनावर होत असल्याचे मत कॉ. भालचंद्र कांगो यांनी व्यक्त केले. नर्मदा नदीवरील सरदार धरणामुळे या खोऱ्यात २४४ गावे आणि हजारो कुटुंबं, गुरंढोरे बाधित झालेली आहेत. तिथे व्यापक जनआंदोलन उभारून, पाय पक्के रोवून पुढे जाण्याचे आव्हान उभे राहिले आहे. त्यासाठी सर्वधर्मसमभाव, समता, न्याय, समाजवादाच्या दिशेने जाण्याचे आवाहन नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर यांनी केले. उत्तम कांबळे, संजय आवटे, प्रा. डॉ. बजरंग बिहारी तिवारी यांनीही या संमेलनात वक्ता म्हणून सामाजिक न्यायाविषयीची आपली भूमिका स्पष्ट केलेल्या आहेत.

या पुस्तकात संदीप काळे यांनी या संमेलनाच्या आयेजनाविषयी आणि संपादनाविषयीची त्यांची संपादकीय भूमिका स्पष्ट केली आहे. डॉ. बाबासाहेबांनी मराठवाड्यात केलेले शिक्षणाचे कार्य आणि त्यातून घडलेले परिवर्तन याचाही आढावा घेतला. तसेच प्रत्येक वक्त्याच्या भाषणाचे सूत्रही दाखवून दिले आहे. डॉ. श्रीपाद जोशी यांनी अशा संमेलनाच्या आयोजनामागची कल्पना विषद केली. करताना डॉ. बाबासाहेबांच्या  विश्वव्यापी विचारांचा मागोवा घेतला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधन आजच्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये सर्वाधिक उपयोगाचे आहे, याची जाणीव या विचार संमेलनाच्या माध्यमसतून व्हावी, अशी अपेक्षा डॉ. दिलीप चव्हाण यांनी व्यक्त केली.

एक चांगले विचारधन संदीप काळे यांनी आपल्या हाती सोपविलेले आहे, परंतु तसे करताना त्याला स्मरणिकेचे स्वरुप येणार नाही याची काळजी घेतली आहे. नयन बारहाते या कलावंताने अतिशय सुरेख असे मुखपृष्ठ सजविलेले आहे.

**मूल्य २५० रु.   सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**सहिष्णुतेचे बांधकाम**
**डॉ. श्रीपाद जोशी**




**पोखरणाऱ्या वृत्तीच्या गाभ्याला हात घालणारे लेखन**

'आपली राज्यघटना, तिची मार्गदर्शक तत्त्वे, यावर आधारित आपले कायदे आणि प्रत्यक्षातले आपले सामजिक वर्तन यात सुसंगती कमी आणि विसंगतीच अधिक आहे. इतरांच्या न्याय हक्कांची बिनदिक्कत पायमल्ली करून त्यांना त्यांची जागा दाखवून देण्याची, त्यांचा बदला घेण्याची भाषा बोलणारे राजकारण हे सहिष्णुतेचे बांधकाम रोखून धरण्यासाठीच सुनियोजितरित्या योजलेले राजकारण आहे. त्यातले कोणीही मग कोणत्याही जात, धर्म,पंथ, संप्रदायाचे असो, साऱ्यांचेच ते एकच समान सूत्र झाले आहे.'

डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांचा हा लेखसंग्रह आहे. 'सहिष्णू समाजाच्या निर्मितीसाठी शहीद झालेले डॉ. नरेंद्र दाभोळकर, कॉ. गोविंद पानसरे, डॉ. एम. एम. कलबुर्गी यांना' अशी ही या संग्रहाची अर्पणपत्रिका आहे. सहिष्णूतेची चर्चा प्रामुख्याने सुरू झाली ती या तिघांच्या हत्येपासून. त्यानंतर मुरूगन याने जाहीर केलेल्या लेखकाच्या मृत्यूनंतर. एखादी घटना घडल्यानंतर तिच्याविषयीची मतमतांतरे तीव्रतेने वाहू लागतात. त्याचे पडसाद आणि परिणाम गडदपणे अधोरेखित होतात. परंतु अशा घटना या काही तात्कालिक स्वरूपाच्या नसतात. त्यांची सुरुवात सुप्तपणे तर कधी उघडपणे खूप अगोदरपासून झालेली असते. या घडण्याला कुणी एक नाही तर, संपूर्ण समाज उघड्या डोळ्यांनी पाहात असतो, जे घडते ते त्या डोळ्यांना सहन होत नाही, इतके सलत राहते. परंतु त्या विरोधात आवाज उठवण्याचे, विरोध करण्याचे जे धैर्य दाखवण्याची गरज असते, तिथे मात्र हा समाज डोळ्यांवर झापड ओढून, ओठांना कुलूप लावून अलिप्त राहतो. या अलिप्त राहण्याला लेखक बधीरपणाची उपमा देतात. समाज आज बधिरावस्थेत वावरत असल्याचा दिसत आहे, हे वास्तव आहे. पाण्याच्या पृष्ठभागावर शेवाळं साचावे आणि त्याच्याखाली चाललेली उलथापालथ बिनदिक्कत सुरू राहावी, असे वास्तव.

आपण राष्ट्रीय ऐक्याचा एक भाग आहोत, त्याचे स्थैर्य टिकवले पाहिजे, आपली सामाजिक जाणीव अबाधित ठेवून सांप्रदायिक सौहार्द टिकवले पाहिजे. जातीधर्मात तेढ निर्माण करून स्वार्थ साधण्यापेक्षा आपातला विश्वास वृद्धिंगत करायला हवा, भारतीय राज्यघटनेने घालून दिलेले सूत्रांचे पालन सगळे मिळून करूया, असे कुणालाच का वाटत नाही? आणि याला कुणी छेद देत असेल तर त्या विरोधात आपण आवाज एकत्रितपणे उठवणार आहोत की नाही, ही लेखकाची तगमग आहे. देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून लढा दिला गेला परंतु आज अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी पुन्हा लढा देण्याची वेळ आली आहे. पुस्तकावर बंदी, लेखकाचा अपमृत्यू, सत्ताकेंद्रांना धक्का लावू पाहणाऱ्यांच्या हत्या, जनहितार्थ बोलणेसुद्धा देशद्रोहात बसवणे, हे चित्र कोणत्या सहिष्णुतेचे आहे? निवडणुकीत घडणारे प्रकार, संस्था स्थापन करून त्याआड चालणारे एककेंद्री कारभार, जातीचे राजकारण, माध्यमांचा वापर आपल्या सोयीसाठी आणि सोयीने करणे, राजकारणाचे वर्चस्व, अशी अनेक क्षेत्रे आहेत ती आज समाजावर अधिकार गाजवत आहेत. त्यांच्याकडे लेखक आपले लक्ष केंद्रीत करू पाहात आहेत. या क्षेत्रांच्या अंतरंगात उतरून त्यांची लक्तरे उतरवू पाहात आहेत. त्याचवेळी ते काही उपायात्मक गरजांकडे लक्ष वेधू पाहतात. प्रश्न आहेत तशी उत्तरेही आहेत, याचे भान जागृत करतात. काही ठिकाणी ते आव्हान स्वीकारण्याची गरज व्यक्त करतात आणि राज्यकर्त्यांना इशाराही देण्यात पुढाकार घेताना दिसतात.

या संग्रहात समावेश झालेले लेख हे यापूर्वी वेगवेगळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. परंतु ते एकत्रित स्वरुपात संग्रहित झाल्याने त्यांना एक भक्कम असे एकसंघ स्वरूप प्राप्त झाले आहे. हे लेख विविध विषयांवर असून त्यांच्यात विविधता आहे. ही विविधता समाज, राजकारण, धर्म, राज्यघटना, सहिष्णूता, माध्यमे, राज्यकर्ते, वर्चस्ववादी वृत्ती, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आपचा उगम, अशा विषयांशी निगडीत आहे. या विषयांना आलेले आजचे स्वरूप, त्यांची पूर्वपीठिका, त्यात सहभागी असलेल्या वृत्ती आणि एकूण व्याप्ती पाहता, त्यांना पेलण्याचे मोठे आव्हान सर्वच लेखकांसाठी आहे. डॉ. जोशी यांनी ते पेलले आहे. नाठाळ आणि लगाम नसलेल्या घोड्याला आवर घालणे आव्हानात्मक असते परंतु अशक्य नसते. लेखकाने अशक्य या शब्दालाच लगाम घातला आहे असे म्हणता येईल. बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कार्लमार्क्स, हॅरॉल्ड लास्वेल, मेलवीन डे फ्लेऊर यांच्यासारख्या अनेक मान्यवरांच्या संदर्भाचे दाखले त्यांनी दिलेले आहेत. त्या त्या विषयाची अभ्यासपूर्ण अशी मांडणी केलेली आहे. समाजशास्त्रीय भान केवळ लेखकाने बाळगण्याचे साधन नाही, ते समाजानेही बाळगले पाहिजे, सत्ताधीशांनी बाळगले पाहिजे, ही अपेक्षाही व्यक्त करीत नाहीत, तर तिचा आग्रह धरतात. चौकट मोडण्यापेक्षा ती मोडणार नाही याची खबरदारी घेतली तर प्रश्नांचा जन्मच होणार नाही. यासाठीचे प्रयत्न काय असावेत, याची उत्तरे या लेखांमधून मिळतात. तसेच एखाद्या विषयाकडे पाहताना दृष्टी किती चौफेर आणि चौकस असावी याचे उदाहरण समोर ठेवले आहे. डॉ. श्रीपाद जोशी यांच्या विचारात आरपार जाणवणारा स्पष्टपणा आहे. अभ्यास आणि निरीक्षण यांचा प्रत्यय प्रत्येक लेखातून येतो. भाषेचा समृद्धपणा, कसदार प्रगल्भता, निर्भिडपणे विषयाला भिडण्याची वृत्ती, वाक्यांचा पल्लेदारपणा, यामुळे हा संग्रह एक चांगले पुस्तक वाचल्याचे समाधान तर देतोच, परंतु लेखकाने लेखन कसे करावे, याचा आदर्शही समोर ठेवतो.

नयन बारहाते यांनी मुखपृष्ठ साकारताना बांधकामातला आकृतीबंध समोर ठेवला आहे, शीर्षक आणि आशयाशी नाते सांगणारा. परंतु अगदी सहजपणे रंगांचे योजन केले आहे, पक्षीय सत्ता दाखवणारे. अंतर्मुख व्हावे आणि व्वा अशी दाद द्यावी, असे हे मुखपृष्ठ झाले आहे.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**